सोहनी यांचे वाड्यांत राहात असतांना कै. श्रीविष्णुबोवा जोग यांचा संबंध आला. आमचे माऊसबंधु कै. श्री. माधवराव देशमुख यांचेकडे ते येत असत. चि. सोनोपंत कै. बोवांकडे ज्ञानेश्वरी ऐकण्यास जाऊं लागले. त्यांच्या व कै. वासुदेवराव देशमुख, आमचे दुसरे माऊसबंधु यांच्या प्रोत्साहनानें नगरकराचे तालमींत जाऊन त्यांनीं जोर, बैठका, कुस्तीच्या व्यायामाचें शिक्षण घेतलें. दिवसेंदिवस वै. जोग महाराज – ज्यांस आम्हीं 'बोवा' म्हणून हांक मारीत असूं – यांचा ज्यास्त ज्यास्त संबंध आला व ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, नाथभागवत, विचारसागर इत्यादि ग्रंथांचें त्यांचें अध्ययन वै. बोवांचे देखरेखीखालीं झालें. वै. बोवांचे चि. सोनोपंतावर अत्यंत प्रेम होतें. ब्रह्मचारी राहून भागवत धर्माचा प्रचार करण्याची इच्छा वै. बोवांचे शिकवणीचाच परिणाम होय. वै. बोवा नेहमीं म्हणत कीं भागवत धर्माचे प्रचाराचें माझें कार्य माझे पश्चात् सोन्या (सोनोपंत) एकटाच करील. ही वै. बुवांची भविष्यवाणी खरी झाल्याचें आपण सर्व पाहात आहोंच.

संत तोचि जाणा जगीं। दया क्षमा ज्याचे आंगीं॥
लोभ अहंता नये मना। जगीं विरक्त तोची जाणा॥
इहपर लोकीं सुखीं। शुद्धज्ञान ज्याचे मुखीं॥
मिथ्या कल्पना मागे सारा। तोचि उघडा ज्ञानेश्वरा॥

श्रीमुक्ताबाई

सर परशुरामभाऊ कॉलेजचे वारकरी प्रिन्सिपॉल

प्रा. शंकर वामन दांडेकर

लेखकः—कै. " साधुदास "

सुशिक्षित व दूरपरिचित मंडळींना सामान्यतः 'प्रो. दांडेकर' या नांवानें व अशिक्षित व निकटपरिचित मंडळींना 'सोनोपंत मामा' किंवा 'मामा' या नांवानें ठाऊक असलेले प्राध्यापक शंकर वामन दांडेकर हे जून १९४५ मध्यें नुकतेच पुण्याच्या सर परशुरामभाऊ कॉलेजचे एकमतें प्रिन्सिपॉल निवडण्यांत आले हा योग विश्व-विद्यालयीन शिक्षणक्रमाच्या इतिहासांतील एक अत्यंत कौतुकास्पद घटना होय. पाश्चात्य विद्याप्रधान शिक्षणक्रम आणि भारतीय संस्कृतिप्रधान नैष्ठिक आचार यांचा विसंवाद असण्याचें वास्तविक कारण नाहीं, विरोध असण्याचें तर नाहींच नाहीं; पण आज वर्षानुवर्षे वस्तुस्थिति मात्र अशी आहे कीं, कॉलेजमधून पदवी घेऊन बाहेर पडलेला पंडित आणि सनातनी नित्यक्रम या दोहोंचें साहचर्य एका व्यक्तींत सहसा आढळूंच नये! फार तर एखादा स्नानसंध्याशील पदवीधर आढळून येणें ही क्वचित् शक्य गोष्ट झाली असेल; पण अशिक्षित वारकऱ्यांच्या जमावांत निरूपणास उभा राहणारा एखादा टाळकुट्या पदवीधर सांपडणें, आणि तो एखाद्या कॉलेजच्या मुख्या-ध्यापकपदावर विराजमान होणें ही कल्पना बहुधा असंभाव्यच मानली गेली असती!

प्रो. दांडेकर यांचा जन्म ठाणें जिल्ह्यांतील केळवें–माहीम या गांवीं सन १८९६ सालीं एका सुखवस्तु घराण्यांत झाला. प्राथमिक शिक्षणक्रम संपवून ते फर्ग्युसन कॉलेजमध्यें गेले आणि सन १९१७ सालीं तत्त्वज्ञान हा विषय घेऊन बी. ए. झाले. या वेळीं त्यांना 'प्रल्हाद सीताराम पटवर्धन' शिष्यवृत्ति मिळाली. सन १९१९ सालीं ते एम्. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. प्रा. दांडेकर यांचा जात्याच तत्त्वज्ञाना-कडे ओढा असल्यामुळें आणि त्यांतच विद्वद्वर्य प्रो. रामचंद्र दत्तात्रय रानडे यांच्यासारख्या तत्त्वज्ञशिरोमणि शिक्षकाचा सहवास लाभल्यामुळें त्यांच्या जीवनक्रमाला जें एक विशिष्ट वळण लागलें तेंच पुढें वळावत जाऊन अखेर कायम झालें. प्रो. रानड्यांच्या शिफारसीवरून सर परशुरामभाऊ कॉलेजच्या मंडळींनीं प्रो. दांडेकरांना आपल्या संस्थेचे आजीव सभासद होण्याविषयीं पाचारण केलें आणि त्यांनीं त्या सूचनेला आपली संमति दिली. पुढच्याच वर्षीं ते त्या संस्थेला मिळाले आणि प्राध्या-पकाचें काम करूं लागले. सन १९४० सालीं त्यांना मुंबईच्या रामनारायण रुईया कॉलेजमध्यें बोलावण्यांत आलें. तेथें सुमारें साडेचार वर्षें व्हाइस प्रिन्सिपॉल म्हणून

काम केल्यावर त्यांना प्रिन्सिपॉल नेमण्यांत आलें. यापुढें सेवानिवृत्त व्हावें असे विचार त्यांच्या मनांत घोळत होते. इतक्यांत सर परशुरामभाऊ कॉलेजचे प्रिन्सिपॉल प्रो. करमरकर हे निवृत्त झाले आणि त्यांच्या जागीं प्रो. दांडेकर यांची एकमुखानें निवड करण्यांत आली. इतक्या प्रभावी लोकमतापुढें त्यांना हार खावी लागली आणि त्या योजनेस अखेर त्यांनीं आपली संमति दिली.

प्रो. दांडेकरांच्या जीवनास आध्यात्मिक वळण लागण्यास प्रो. रानडयांचा सहवास हें जसें एक कारण झालें, तसेंच कै. विष्णुबोवा जोग या वारकरी सत्पुरुषाचा सहवास हेंहि आणखी एक कारण झालें. सन १९०८ सालच्या सुमारास प्रो. दांडेकर पुण्यांत शिक्षण घेऊं लागले त्या वेळीं जोगमहाराजांचें वास्तव्य पुणें येथेंच होतें. तेव्हांपासून प्रो. दांडेकर हे त्यांच्याकडे जाऊं येऊं लागले, आणि जोगमहाराजांच्या प्रभावी निरूपण-शैलीनें त्यांच्या मनाची पकड घेतली. हा सहवास उत्तरोत्तर वाढत गेला, प्रो. दांडेकरांनी जोगमहाराजांचें रीतसर शिष्यत्व पतकरून वारकरी संप्रदायाची दीक्षा घेतली, आणि सुप्रसिद्ध कै. बंकटस्वामींप्रमाणेंच ते जोगमहाराजांचे एकनिष्ठ शिष्य म्हणून गणले जाऊं लागले. पुढेंपुढें तर जोगमहाराजांची या शिष्यावर पूर्ण मर्जी बसली आणि ते त्यांच्या घरीं भोजनासहि राहूं लागले. सन १९२० सालीं जोगमहाराजांनीं देह ठेवल्यावर प्रो. दांडेकरांनीं त्यांच्या पुण्यतिथीचा उत्सव साजरा करण्याचा उपक्रम केला, तो अद्याप निर्बाध चालू आहे. जोगमहाराजांच्या पश्चात् कै. बंकट-स्वामी आणि प्रो. दांडेकर हे वारकरीसंप्रदायाचे दोन मोठे आधारस्तंभ होऊन राहिले. बंकटस्वामी नुकतेच ब्रह्मीभूत झाल्यामुळें ही जबाबदारी आतां मुख्यत्वें प्रो. दांडेकर यांच्याच शिरावर येऊन पडली आहे.

प्रो. दांडेकर हे वारकरी आहेत. पंढरीच्या दोन्ही वाऱ्या आज केक वर्षे ते नियमानें करीत आहेत; पण उच्च दर्जाचा शिक्षणसंस्कार त्यांना लाभलेला असल्यामुळें, सामान्य वारकरी मंडळींत गैरसमजामुळें किंवा अज्ञानामुळें जे कांहीं दुराग्रह रूढ झाले आहेत त्यांना त्यांच्याजवळ बिलकुल थारा मिळत नाहीं. उदाहरणार्थ, रामदासीसंप्रदायविषयीं वारकरी लोकांच्या मनांत जी एक प्रच्छन्न तिरस्कारबुद्धि असते, ती प्रो. दांडेकरांना मुळींच संमत नसून, ते समर्थांना, तुकाराम ज्ञानेश्वरांप्रमाणेंच अत्यंत पूज्य मानतात. ते स्वतः वारकरी पद्धतीचें निरूपण किंवा कीर्तन करतात आणि ज्ञानेश्वरी, दासबोधादि ग्रंथांवर प्रवचनेंहि करतात. हीं कीर्तनप्रवचनें किती रसाळ आणि उद्बोधक असतात याचा अनुभव महाराष्ट्रांत आणि अन्यत्रहि सहस्त्रावधि लोकांना येत असल्यामुळें त्यांविषयीं वेगळें लिहिण्याचें कारण नाहीं. एकाद्या मोठ्या शहरांत काय किंवा एकाद्या खेड्यांत काय, 'मामां'चें निरूपण उभें राहिलें म्हणजे तें ऐकण्यास श्रोत्यांची बेसुमार गर्दी जमते,

आणि त्या गांवांतील भजनी मंडळींचा ताफा मामांच्या साथीला दुतर्फा उभा राहतो—हा देखावा पुष्कळांना परिचित झालेला आहे. प्रो. दांडेकरांच्या निरूपणाचा विशेष म्हणजे भाविकपणा आणि तर्कशुद्ध विचारसरणी यांचा त्यांत उत्कृष्ट मिलाप झालेला आढळतो. पौराणिक आख्यानें आणि कथा यांतील रूपकात्मक भागाचा ते जेव्हां उलगडा करूं लागतात, तेव्हां श्रोत्यांच्या सद्गदित वृत्तीबरोबरच त्यांच्या मतीलाहि एक नवी स्फूर्ति मिळाल्यावांचून राहात नाहीं.

कीर्तनप्रवचनांच्या पटांगणावर सोनोपंत मामांना जें यश लाभलें आहे, त्याच्याच ताडीचें यश त्यांनीं कॉलेजच्या पीठावरहि पैदा केलें आहे. त्यांचा स्वभाव गोड, मनमिळाऊ आणि दिलदार असल्यामुळें कॉलेजमधील वातावरणांत सामान्यतः आढळणाऱ्या मतभेदजन्य पक्षोपपक्षांचा विश्वास त्यांना संपादन करतां आला. अशा प्रकारचा स्वभाव, निरपवाद आचरण, खोल अभ्यास, आकर्षक स्पष्टीकरणशैली आणि प्रेमळ रसवंती या सर्वांचा संच त्यांच्याजवळ एकत्रित झाला असल्यामुळें विद्यार्थी वर्गालाहि ते अत्यंत प्रिय होतात यांत नवल नाहीं. राजकीय चळवळींत ते प्रत्यक्ष भाग घेत नाहींत; पण अबोल राहून देशहिताला पोषक असणाऱ्या गोष्टी यथाशक्ति व यथामति ते आचरणांत आणतात. ते नित्य खादीचीं वस्त्रें पेहरतात, म्हणून वाटल्यास त्यांना काँग्रेसचे अनुयायी म्हणतां येईल, आणि ते हिंदुधर्माचे आणि हिंदुत्वाचे निष्ठावंत उपासक आहेत म्हणून त्यांना हिंदुमहासभेचे अभिमानीहि म्हणतां येईल. सर्वच राजकीय पक्षांत त्यांचे मित्र आढळतील, किंबहुना त्यांना जगमित्र म्हटलें तरी अतिशयोक्ति होण्याचा संभव नाहीं.

प्रो. दांडेकर ब्रह्मचारी आहेत हें प्रसिद्ध आहे, आणि त्यांचें ब्रह्मचर्य अट्टल निंदकाच्याहि जिभेला एकदम खीळ घालील इतकें प्रखर आहे. अर्थात् त्यांचा स्वतःचा असा प्रपंच नाहींच; पण एक बंधु आणि त्यांचे दोन पुत्र असा प्रपंच त्यांनीं आपलाच मानला आहे. हे बंधु आणि पुतणे तिघेहि वकील असून चांगले मिळवते आहेत. मात्र यावरून प्रो. दांडेकरांचा प्रापंचिक खर्च बेताचा असून त्यांनीं चांगला संग्रह केला असेल असें कोणी अनुमान काढील तर तें चुकीचें होईल. त्यांच्याकडे येणारा इष्टमित्रवर्ग, अतीत-अभ्यागत, याचक आणि स्वतःचा वारंवार होणारा प्रवास या सर्वांपायीं त्यांचा खर्च बेसुमार होत असतो, आणि खऱ्याखोट्या कसल्याहि याचकाला विमुख पाठवायचें नाहीं हा तर त्यांचा बाणा आहे. अर्थात् या वृत्तीचा परिणाम काय होत असेल, हें सांगावयास नकोच. प्रो. दांडेकर भोळे नाहींत; पण भिडस्त नक्कीच आहेत; आणि अंधश्रद्ध नाहींत, पण अत्यंत भाविक आहेत. ते एकटे सहसा सांपडावयाचे नाहींत; चारदोन मंडळींचा गराडा त्यांच्याभोंवतीं असावयाचाच. "My door is open to all, but none is specially invited" हा त्यांनींच आपला खाक्या सांगून

ठेवला आहे. त्यांतील तत्त्व खरें असलें तरी त्यांची साधी राहणी, उच्च विचारसरणी, प्रेमळ स्वभाव, प्रसन्न मुद्रा आणि दानप्रवृत्ति हीं सर्वच आपापल्यापरीनें निमंत्रण-पत्रिकांचें कार्य अविरत करीत असतात !

प्रो. दांडेकरांच्या निरूपणाच्या पेशाला संगीताची जोड अवश्य असल्यामुळें त्या विषयाची त्यांनीं थोडीफार माहिती करून घेतली आहे. इतर ललितकलांचेहि ते शोकीन नसले तरी रसिक खास आहेत. पण त्यांच्या जिवनावर एकंदरींत आध्यात्मिक तत्त्वज्ञानाची छाप पडलेली असल्यामुळें त्यांची दिनचर्या बहुतेक आध्यात्मिक व्यवसायांनींच व्यापलेली असते. त्यांनीं जें लेखन केलें आहे, तें बहुतेक सर्व आध्यात्मिक स्वरूपाचेंच आहे. ज्ञानकोशांत **वारकरी पंथाविषयीं** लिहिलेला लेख त्यांचाच आहे. प्रो. रानडे यांच्या 'मिस्टिसिझम् इन् महाराष्ट्र' या ग्रंथांत '**एकनाथाचें भागवत**'. या विषयावर आलेलीं सुमारें ३० पानें प्रो. दांडेकर यांनींच लिहिलेलीं आहेत. प्रो. रानडे यांनीं 'आध्यात्मिक ग्रंथ' या नांवाच्या मालेंत जीं चार पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत त्यांपैकीं संतवचनामृत, ज्ञानेश्वरवचनामृत आणि तुकारामवचनामृत यांवर प्रो. दांडेकर यांनीं टीपा दिल्या आहेत. कै. वंकटस्वामींनीं संपादिलेल्या **ज्ञानेश्वरीचा** बहुतेक भाग प्रो. दांडेकर यांनींच तयार केला आहे. चित्रशाळेनें तुकारामबुवांचा प्रसिद्ध केलेला **गाथा** सोनोपंतांनींच तयार केला आहे. लोकशिक्षण मालेमार्फत प्रसिद्ध झालेला '**ज्ञानदेव चरित्र, ग्रंथ व तत्त्वज्ञान**' हा ग्रंथ आणि वादविवेचन मालेमार्फत प्रसिद्ध झालेला '**ईश्वरवाद**' हे दोन्ही ग्रंथ यांनींच लिहिले आहेत. यांखेरीज कितीतरी पुस्तकांना त्यांनीं प्रस्तावना, पुरस्कार, चार शब्द वगैरे लिहून भूषित केलें आहे. या सर्व लिखाणांतून प्रो. दांडेकरांच्या आध्यात्मिक विचारांचा एक अखंड ओघ प्रतीत झाल्यावांचून राहात नाहींत.

तत्त्वज्ञान या विषयाचे प्राध्यापक, लेखक आणि निरूपणकार हरिदास या तिन्ही दृष्टींनीं प्रो. दांडेकर यांनीं केलेली कामगिरी बहुमोल आहे हें तर खरेंच, पण भारतीय तत्त्वज्ञानाचें उपासनात्मक जें एक अंग आहे, तें त्यांनीं स्वतः आचरून बहुजनसमाजाला पटवून दिलें, यांत त्यांचें खरें वैशिष्ट्य आहे. कांटप्रभृति अन्यधर्मीय तत्त्वज्ञ आणि भारतीय तत्त्वज्ञ या सर्वांनींच आपापल्यापरीनें हें दृश्य जग, त्याची नियामक कोणीतरी शक्ति, तिचा मानवी जीवनाशीं संबंध इत्यादि विषयांचा विचार केला आहे. पण परधर्मीय तत्त्वज्ञांची ईश्वरविषयक कल्पना श्रद्धाप्रधान असल्यामुळें त्यांचें मतप्रतिपादन तर्कवाद आणि बुद्धिवाद यांवरच मुख्यतः आधारलेलें असतें. यामुळें विचार आणि उच्चार एवढ्यावरच त्यांचें मतप्रतिपादन थांबतें. आपलें म्हणणें अनुभवानें सिद्ध करण्याची हाव ते धरीत नाहींत. पण भारतीय—विशेषतः भगवद्गीतेचें—तत्त्वज्ञान विचार व उच्चार एवढ्यावरच न थांबतां, आचारानें त्याचा

खरेपणा प्रचीतीस आणून देण्याची धमक दाखवितें हा त्याचा विशेष होय. परधर्मीयांची मुक्तीची कल्पना कोणतीहि असो, ती श्रद्धाप्रधान म्हणजे मरणोत्तर सिद्ध व्हावयाची असें गृहीत धरावयाचें असतें. याच्या उलट भारतीय तत्त्वज्ञान "**ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनंतरम्**" अशी हमी देतें. "**याचि जन्मीं याचि डोळा, भोगेन मुक्तीचा सोहळा**" अशी भारतीय तत्त्वज्ञानाची प्रतिज्ञा असून, तीं सिद्ध होण्यास त्यानें विचार आणि उच्चार यांना उपासनात्मक आचाराची जोड दिली आहे. या उपासनेचें स्वरूप काय, याच्या तपशिलांत शिरण्याचें हें स्थळ नव्हे. तथापि एवढें सांगणें अवश्य आहे, कीं भरतखंडांतील सर्व साधुसंत या उपासनेच्या बळानेंच सिद्धकोटीला पोचले आहेत. वारकरी संप्रदाय, समर्थ संप्रदाय किंवा अन्य एखादा संप्रदाय, या सर्वांनीं उपासनेचें महत्त्व सारखेंच लेखलें आहे आणि तिचें निष्ठेनें अनुष्ठान विहित मानलें आहे. अलीकडच्या सुशिक्षित समाजांत तत्त्वज्ञान किंवा आध्यात्मदृष्टि जवळजवळ लुप्त होत चालली असून, जडवादांत जीवितसाफल्य मानण्याकडे प्रवृत्ति वळावत चालली आहे. अशा स्थितींत प्रो. दांडेकर यांनीं स्वतः प्रखर निष्ठापूर्वक उपासक होऊन, सुशिक्षित व अशिक्षित अशा दोन्ही प्रकारच्या समाजाच्या मनोभूमिकांवर फार मोठ्या प्रमाणांत तत्त्वज्ञानाच्या या आचारात्मक अंगाची उपयुक्तता रुजविण्याचें व्रत चालविलें आहे; याकरितां त्यांना द्यावे तेवढे धन्यवाद थोडेच आहेत.

भारतीय तत्त्वज्ञानाच्या या आचारात्मक उपासनेलाच समर्थांनीं '**परमार्थ**' असें नांव दिलें आहे. सत्समागम व ब्रह्मसाक्षात्कार हीं दोन त्याचीं मुख्य लक्षणें मानलीं गेलीं आहेत. यांपैकीं 'ब्रह्मसाक्षात्कार' होतो कीं नाहीं हें न पाहतां बाह्य भपक्याला भुलणें, हा सामान्य मनुष्यस्वभाव असल्यामुळें सत्समागमाच्या नांवाखालीं बुवाबाजीचा धंदा नेहमीं तेजींत चालत आला आहे. बुवाबाजी चालविण्यास लागणाऱ्या सर्व गोष्टी अनुकूल असूनहि प्रो. दांडेकरांनीं तसल्या मोहास बळी न पडतां स्वतःचा आचार निर्मळ ठेवला आहे, एकहि शिष्य केला नाहीं आणि 'महाराज' म्हणवून घेण्याची हाव धरली नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. असला तत्त्वनिष्ठ, आचारसंपन्न पंडित प्रिन्सिपॉलच्या जागीं निवडून सर परशुरामभाऊ कॉलेजच्या चालक-संस्थेनें स्वतःचा गौरव वाढविला आहे. प्रो. दांडेकर या मानाच्या स्थानावरून आपली कामगिरी अधिकच यशस्वी करतील अशी अपेक्षा आहे.*

(* हा लेख '**मनोहर**' मासिकाचे आगस्ट १९४५ चे अंकांत आलेला आहे. तो छापण्याची परवानगी दिल्याबद्दल आम्ही '**मनोहर**' चे संपादकांचे अत्यंत आभारी आहों).

प्राचार्य दांडेकरांच्या आठवणी

लेखकः—प्रा. रामचंद्र कृष्ण लागू

शिक्षण प्रसारक मंडळीच्या न्यू पूना कॉलेजमध्यें मीं १९१८-१९ सालीं इंग्रजी शिकवायला आरंभ केला. त्यानंतर दोन वर्षांनीं प्राचार्य दांडेकर संस्थेला येऊन मिळाले. तत्त्वज्ञान हा त्यांचा विषय, आणि तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणूनच संस्थेनें त्यांना आपले आजन्म सभासद करून घेतले. वास्तविक पाहिलें तर तत्त्वज्ञान आणि इंग्रजी या दोन विषयांचा परस्पर असा फार थोडा संबंध. पण प्राचार्य दांडेकरांना ज्ञानेश्वरीचें वेड (म्हणजे ध्यास, छंद या अर्थीं, तुकारामाला पांडुरंगाचें वेड होतें तसें) आणि मलाही ज्ञानेश्वरीविषयीं वाटत असलेलें अपरिमित प्रेम. ज्ञानेश्वरी हेंच आमच्या स्नेहाचें आरंभस्थान.

१९२०-२१ सालीं पुण्यास कविसंमेलन भरलें होतें. त्या निमित्तानें मीं "ज्ञानेश्वरींतील उपमा" या विषयावर एक निबंध वाचला. पुढें जेव्हां प्राचार्य दांडेकरांनीं ज्ञानेश्वरांचें एक छोटेंसें चरित्र लिहिलें तेव्हां आम्ही ज्ञानेश्वरींतील अलंकारांची चर्चा केली. इतर कवी अलंकार वापरतात ते त्यांच्या काव्यशरीराचीं भूषणें होत. ज्ञानेश्वरींतील उपमा रूपक वगैरे अलंकार ज्ञानेश्वरांच्या काव्याचीं अंगभूत लेणीं. ज्ञानेश्वरांच्या भावनांच्या आणि कल्पनांच्या दिव्य तेजानें हीं अंगभूत लेणीं उजळलेलीं असतात. शरिरावर बाहेरून चढविलेलीं भूषणें निराळीं आणि भावनेच्या उसळीबरोबर कल्पनेच्या पोटीं जन्मास आलेलीं भूषणें निराळीं. सूर्यपुत्र कर्णाला जशीं जन्मतांच कवचकुंडलें प्राप्त झालीं होतीं, तशींच हीं ज्ञानेश्वरींतील उपमा रूपक इत्यादि ज्ञानेश्वरीचीं कवचकुंडलें. ज्ञानेश्वरींतील अलंकारांच्या प्रभेनें आपले डोळे दिपून जातात ते यामुळेंच. अशा प्रकारें आम्ही थोडा वेळ बोललों. ज्याची चिरंतर स्मृति राहावी असें हें बोलणें.

प्राचार्य दांडेकरांची ज्ञानेश्वरीवरील श्रद्धा म्हणजे त्यांच्या जीवनाचें सारसर्वस्व. ज्ञानेश्वरीनें त्यांचें अंतर्बाह्य जीवन व्यापून टाकलें आहे. ख्यातनाम इंग्रजी लेखक मेकॉले यानें पॅरॅडाइज् लॉस्ट या काव्यासंबंधीं जें म्हटलें आहे तेंच विधान ज्ञानेश्वरीविषयीं प्राचार्य दांडेकरांना करतां येईल. समजा कीं एखाद्या दैवी आपत्तीमुळें पॅरॅडाइज् लॉस्ट हा ग्रंथ अजिबात लुप्त झाला आणि त्याची एकही प्रत कुठें उपलब्ध होऊं शकली नाहीं, तरी आपल्याला हा सर्व ग्रंथ मुखोद्गत असल्यामुळें आपण त्याचें पुन-

रुज्जीवन करूं शकूं असा मेकॉलेला आत्मविश्वास वाटत होता. तसेंच एखाद्या दुर्दैवी घटनेमुळें ज्ञानेश्वरी हा ग्रंथ अजीबात नाहींसा झाला तर प्राचार्य दांडेकरांना ज्ञानेश्वरी मुखोद्गत असल्यामुळें ते लुप्त झालेल्या ज्ञानेश्वरीचें पुनरुज्जीवन करूं शकतील.

कुठें कांहीं दृष्टान्त द्यायचा झाला, एखाद्या विद्वान् वक्त्याची ओळख करून द्यायची झाली तर प्राचार्य दांडेकरांना ज्ञानेश्वरींतील ओव्या आठवतात. दोन वर्षांपूर्वीं प्राध्यापक रा. द. रानडे यांच्या ववतृत्वाची श्रोत्यांना कल्पना यावी म्हणून त्यांनीं ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायांतील एक ओवी म्हणून दाखविली–"**का मेघांचें आंग झील। दिसे वारेनि जैसें जाईल। परी वर्षती नवल। घणवट तें॥** मेघांचा आकार पाहिला तर हलका, वाऱ्यानें उडून जाईल असा. पण वृष्टि सुरू झाली कीं सरीवर सरी कोसळतात. प्राध्यापक रानडे यांचें ववतृत्व असेंच. दिसायला कृश अशी त्यांची शरीरयष्टि, पण त्यांनीं एकदां का बोलायला सुरुवात केली कीं मग त्या वक्तृत्वाच्या महापुराला कोण बांध घालूं शकणार! अत्यंत समर्पक असा हा दृष्टान्त हें कोणालाही न सांगतां समजण्यासारखें आहे.

प्राध्यापक रा. द. रानडे यांची ओळख करून देणाऱ्या या आरंभींच्या भाषणांत प्राचार्य दांडेकरांनीं अभिमानानें सांगितलेली एक गोष्ट येथें नमूद करावीशी वाटते. सहजासहजीं, भाषणाच्या ओघांतच सांगितलेली ही गोष्ट. पण ती सांगणाऱ्याचा आवेश आणि आनंद यांचें चित्र आजही माझ्या डोळ्यांपुढें उभें आहे. प्राचार्य दांडेकर म्हणाले, "इंग्लिश लोकांच्या दृष्टीनें शेक्सपिअरचीं नाटकें हा आपल्या राष्ट्राचा अनमोल ठेवा होय. एका इंग्रजी लेखकानें तर असें म्हटलें आहे कीं आम्हांला आमचा शेक्सपिअर असला म्हणजे झालें. जगांतील इतर वाङ्मयांत कांहीं अत्युत्कृष्ट ग्रंथकार असतीलही. परंतु आम्हांला पाहिजे तितका आनंद शेक्सपिअरच्या ग्रंथांत लुटायला मिळतो". प्राचार्य दांडेकरांच्या मतें आम्हां हिंदु लोकांना ज्ञानेश्वरीविषयीं हेंच म्हणतां येईल; आमची ज्ञानेश्वरी आम्हांला असली म्हणजे झालें. इतर वाङ्मयांत उत्कृष्ट ग्रंथ असतील, तथापि ज्ञानेश्वरीच्या वाचनांत आम्हांला हवा तितका आनंद लुटायला मिळतो. प्राचार्य दांडेकरांच्या अनुभवाची ही गोष्ट, तेव्हां साहजिकच त्यांनीं ती आवेशानें आणि आत्मविश्वासानें सांगितली.

प्राचार्य दांडेकरांचें भाषण ऐकण्याचा हा माझा पहिला प्रसंग. पांच सहा मिनिटेंच ते बोलले. पण या छोटयाशा भाषणांतही मला त्यांच्या प्रभावी वक्तृत्वाचा प्रत्यय आला. ह. भ. प. दांडेकरांचें भाषण म्हणजे संथपणें वाहणारा नदीचा प्रवाह. येथें कुठें खळखळ नाहीं, मळमळ नाहीं. सर्व कांहीं शांत आणि प्रसन्न. आपल्या मनांत असलेला आशय व्यक्त करायला आवश्यक तेवढाच शब्दांचा उपयोग. आपलें म्हणणें श्रोत्यांना नीट समजावें एवढ्यापुरतेच दाखले द्यायचे. जिवाची आटापीट नाहीं, नटवेपणा नाहीं. आपण आपल्या वक्तृत्वानें श्रोतृवृंदाला कसें झुलवीत आहों अशा

प्रकारची जाणीव नाहीं. आणि ही जाणीव नसल्यामुळें दांडेकरांचें वक्तृत्व इतकें परिणामकारक होतें.

१९३३ सालीं मीं न्यू पूना कॉलेज सोडलें (हल्लींचें एस्. पी. कॉलेज). तेव्हां प्राचार्य दांडेकरांना माझ्याबद्दल वाटत असलेल्या आदराची मला प्रचीति आली. मीं राजीनामा पाठविला हें त्यांना समजल्यावरोबर ते माझ्याकडे आले आणि म्हणाले, "आपण आपला राजीनामा परत घ्यावा असें मला वाटतें. आम्ही कोणत्याही पक्षाचे असलों तरी आपण संस्थेंत काम करीत रहावें अशी आमची इच्छा." जवळजवळ अर्धा तास ते बोलत होते. त्यांच्या कळकळीचा आणि त्यांच्या प्रत्येक शब्दांत दिसून येणाऱ्या माझ्या विषयींच्या निर्व्याज स्नेहाचा माझ्या मनावर फार परिणाम झाला. ही सुद्धां अशा प्रकारची आठवण कीं जिचा मला कधींही विसर पडणार नाहीं.

आणखी एक अगदीं अलीकडची स्मृति. माझ्या एका स्नेह्याच्या सुशील सत्प्रवृत्त कन्येला महाविद्यालयांत उपसर्ग होऊं लागला. कोणाच्या कसल्याही भानगडींत न पडणारी साधी, सरळ अशी ही मुलगी. परंतु भर्तृहरीनें म्हटल्याप्रमाणें–'मृगमीनसज्जनानां निष्कारणवैरिणो जगति ।.' मीं ही गोष्ट प्राचार्य दांडेकरांच्या कानांवर घातली, आणि त्यांनीं गाजावजा न करतां, अगदीं शांतपणें हें प्रकरण निकालांत काढलें. एखाद्या स्थितप्रज्ञासारखी त्यांची वर्तणूक. रागावणें नाहीं, जाजावणें नाहीं, चडफडणें नाहीं, आणि हातीं घेतलेलें कार्य सिद्धीस जाईपर्यंत त्याच्यावरची दृष्टि ढळूं द्यायची नाहीं असा मनाचा खंबीरपणा.

ज्ञानेश्वरी अनेक लोक वाचतात. परंतु ज्ञानेश्वरीच्या शिकवणुकीचा संस्कार जर त्यांच्या मनावर झाला नाहीं तर त्यांचें तें वाचन आणि पठण "बोलणें फोल झालें । डोलणें वायां गेलें "–अशांपैकींच. योगी अरविंदांच्या म्हणण्याप्रमाणें गीता नुसती वाचून किंवा गीतेचें पठण करून फारसें कांहीं साधणार नाहीं—You must live the Geeta. हरएक बाबतींत, आपल्या नित्याच्या साध्यासुध्या व्यवहारांत आणि कृतींत गीतेच्या थोर उपदेशाची साक्ष पटायला हवी. आपलें भाषण आणि वर्तन जणूं काय ज्ञानेश्वरीचें चालतेंबोलतें रूपच होय अशी जेव्हां जनतेला खात्री पटेल तेव्हां आपल्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाचें सार्थक झालें असें म्हणतां येईल.

प्राचार्य दांडेकरांनीं अशाच प्रकारें ज्ञानेश्वरींतील भक्तिमार्ग आत्मसात् केला आहे. ज्या भागवतधर्माचा ज्ञानेश्वरांनीं पुरस्कार केला त्याचे ते निःसीम अनुयायी आहेत. नामस्मरण, प्रवचन, भगवद्गुणसंकीर्तन, हें प्राचार्य दांडेकरांच्या जीवनाचें ध्येय. "जयांचिये वाचे माझें आलाप । दृष्टि भोगी माझेंची रूप । तयाचें मन संकल्प । माझाचि वाहे ॥" या ज्ञानेश्वरांच्या शब्दांनीं प्रा. दांडेकरांच्या दैनंदिन आचारांचें आणि विचारांचें वर्णन करतां येईल.

तथापि परमार्थसाधना करीत असतां प्राचार्यांनीं जगाकडे पाठ फिरविली नाहीं. रानावनांत जाऊन तपस्या केली नाहीं. तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून, महाविद्यालयाचे प्रमुख म्हणून, अंगावर पडेल ती जबाबदारी पत्करून त्यांनीं ती उत्कृष्ट रीतीनें पार पाडली. आणि दांडेकरांच्या वृत्तीचा विशेष गुण हा कीं निरलसपणें ईश्वरेच्छया आपल्या वांट्याला आलेलें कर्तव्य बजावीत असतां त्यांनीं आपल्या पारमार्थिक ध्येयाला लेशमात्रही मुरड घातली नाहीं, किंवा आपल्या मनाला मानमान्यतेचा, अहंतेचा अथवा ममत्वाचा स्पर्श होऊं दिला नाहीं. जगांत राहूनही " पांथस्थ घरासी आला । प्रातःकाळीं उठोनिया गेला । तसें असावें संसारी । " या एकनाथांच्या उपदेशाचा जणूं कांहीं आदर्श अशा रीतीनें त्यांनीं आपली वागणूक ठेवली.

प्राचार्य दांडेकरांच्या सहवासांत असणाऱ्या व्यक्तींना आपण एका उच्च, पवित्र आणि मंगलमय वातावरणांत वावरत आहों असें, वाटतें. येथें दुरितांना, दुर्वासनांना, दुष्ट विचारांना थारा मिळायचा नाहीं याविषयीं त्यांची खात्री झालेली असते. मला तर प्राचार्य दांडेकरांना पाहिलें कीं " छंद हरिच्या नामाचा । शुचिर्भूत सदा वाचा " या तुकारामांच्या वचनाची आठवण होते. प्राचार्य दांडेकरांना जे लोक भेटायला जातात आणि त्यांच्याशीं विचारविनिमय करतात त्या सर्वांना दांडेकरांच्या संगतींत असतांना आपल्या मनांतील किल्मिष निघून गेलें, आपल्या भावना धुऊन स्वच्छ झाल्या असा अनुभव येतो. सूर्यप्रकाशांत अंधकाराचा आणि सर्व प्रकारच्या जीवजंतूंचा नाश होतो. सूर्यप्रकाशांत स्नान करणें म्हणजे एखाद्या पवित्र तीर्थाला भेट देणें होय. सत्पुरुषांच्या दर्शनाचेंही हेंच फल. आणि पुन्हां " घरींचियां उजेड करावा । पारिकियां अंधार करावा " असा येथें भेदभाव नाहीं. प्रा. दांडेकरांना भेटायला गेलेल्या लोकांना " हे विश्वचि माझें घर । ऐसी मति जयाची स्थिर " । या ओवींत ज्ञानेश्वरांनीं सांगितलेल्या समत्वबुद्धीचा प्रत्यय येतो.

सर परशुरामभाऊ कॉलेजचें हें भाग्य कीं इतके दिवस त्याला प्राचार्य दांडेकर प्रमुख म्हणून लाभले. प्राचार्य दांडेकर प्रमुख असतांना महाविद्यालयाची सर्व दिशांनीं उन्नति झाली. एका दृष्टीनें महाविद्यालयांतील प्राध्यापकांची आणि छात्रगणाची उंची वाढली. प्राचार्यपद विभूषित करणाऱ्या अनेक व्यक्ति आपल्या पाहाण्यांत येतात. क्वचित् काळीं आपल्याला असा एखादा पुरुष भेटतो कीं ज्याच्या निर्मल चारित्र्याच्या परिमलानें त्याच्या सभोंवतीं असणारें सर्व जग दरवळून जातें. प्राचार्य दांडेकर अशा पुरुषांपैकींच एक होत असें म्हणणें म्हणजे वस्तुस्थितीचें यथार्थदर्शन करून देणें होय.

सन्तरायास–

कविः—वसन्त सन्तु पाटील, बी. ए.

(जाति : शुभवदना)

आठवतां मूर्ति तुझी वपु पुलकित झालें !
सन्तराज ! प्रेमभरें नयन सजल झाले ? ॥ ध्रु० ॥

मन्मनिचें तिमिर गहन
बघतां तुझ जाय विरुन
तेजःकणिं अंतरंग तेजोमय केलें ! ॥ १ ॥

हास्य तुझें पुण्य धवल
गङ्गेचें जणु तें जल
करुनि तिमिरहरण हृदय मङ्गलमय केलें ॥२॥

सदुपदेशसौरभयुत
शब्दफुलें तूं उधळित
जीवनिं तव ध्येय हेंच, सौरभमय केलें ॥ ३ ॥

मदिय हृदय-वाटिकेंत
स्मृतिची तव वेल फुलत
नित्य वितरिं गन्ध, सुभें, नन्दनवन केलें ॥ ४ ॥

मुक्त होशि सेवेंतुन
म्हणुनि येई ऊर भरुन,
कोण अतां तुजसमान संतवचन बोले ! ॥ ५ ॥

" चन्द्र तूं कलङ्कहीन,
सविता तूं तापहीन "
नमन सद्गुरो, तुजसी फिरुनि फिरुनि केलें ॥ ६ ॥

" पुष्पसंगें मातीस वास लागे "

लेखकः—प्रो. डॉ. पी. व्ही. घारपुरे,
एम्. डी. (मुंबई), डी. टी. एम्. एच्. (लंडन)

सोनोपंतांचा व माझा परिचय जरी जवळजवळ ४० वर्षांचा असला, तरी त्यांतलीं थोडींशींच वर्षे सन्निध अशीं गेलीं आहेत. वर्षांतून ४–५ वेळां तरी आम्ही अजून भेटतों. भेटी होतात त्या कधीं कारणपरत्वें वा कधीं सहज अशाच असतात. लहानपणीं अपरिपक्व मनःस्थितींत झालेला निकट संबंध व सहवास फक्त परिस्थितीवर अवलंबून होता. 'यथा काष्ठं च काष्ठं च समेयातां महोदधौ..." अशापैकीं हें प्रकरण मानिलें पाहिजे. आठवणी येतील असे प्रसंग येण्यास ग्राह्य व ग्राहक दोन्ही एका विवक्षित भूमिकेंतले लागतात. सोनोपंत अगदीं लहानपणापासून शांत स्वभावाचे, त्यांचा व इतरांचा संघर्ष क्वचित् व्हावयाचा, मग आठवणी कसल्या काढाव्या हा माझ्यापुढें मोठाच प्रश्न पडला आहे!

'बाप मेला', 'बाईल मेली', 'माता गेली' म्हणून तुकारामबुवांना जसा आनंद झाला, तसाच सोनोपंतांना 'हा शिक्षणसंस्थेचा संसार सुटला म्हणून' 'मोकळे झालों' असं वाटून आनंदच झाला असणार; असं मी तरी कल्पूं शकतों. यापुढें परमेश्वरचिंतनास सर्वतोपरीं वाहून घ्यायला ते स्वतंत्र झाले आहेत. अशावेळीं फार गंभीर विचार कशाला मनांत आणा ?—असं मनांत येतं. त्यांना निरोप देतांना चार मौजेच्या गोष्टी आठवल्या तर कां एकत्र करूं नयेत ?

मी सोनोपंतांचा सहाध्यायी खरा, पण वर्गबंधु नाहीं. माझे वडील बंधु ती. बापूसाहेब घारपुरे (सोनोपंतांच्या लहानपणचा 'घाऱ्या') हे त्यांचे वर्गबंधु. माझा व सोनोपंतांचा सहाध्यायी असा संबंध कुठें आला हें पुढें येईल. सोनोपंतांच्या घराण्याबद्दल माझ्या अंतःकरणांत आदर सदैव वसत आहे. त्यांच्या वडील बंधूंच्या (श्री. बाबुराव यांच्या) औदार्यावांचून मी डॉक्टर झालों नसतों इतकं लिहिलं तरी पुरें! सोनोपंतांचें आगमन पुण्याला कैक वर्षांपूर्वी झालं. सदाशिव पेठेंतल्या सोहोनी यांच्या वाड्यांत ते प्रथम कांहीं वर्षे विद्याभ्यासाकरितां रहात होते. त्याच दिवसांत (१९०६–१९०७ असेल) मीं माझे वडीलबंधूंचें 'शेपूट' म्हणून लुडबूड करीत त्या घरीं जाऊं लागलों. नंतर हें दांडेकर कुटुंब राहुरकरांचे घरांत राहावयास आलें. त्याच घरासमोर नाईकांच्या वाड्याच्या उत्तरेस व सदाशिव पेठच्या (ब्राह्मणांच्या) हौदाच्या दक्षिणेस गोखल्यांचे वाड्यांत (गोखले हे माझे चुलते दत्तक गेलेले) आम्ही दोघे भाऊ राहात असूं. आमचे वडील महूला नोकरी करीत असत. आम्हां भावांचं नातं

कांहीं वर्षं एकमेकांचें ‘ पालक ’ असं होतं. सोनोपंतांच्या कुटुंबांतील सर्व व्यक्तींच्या सहवासाचा पगडा आम्हां दोघांच्या मनावर बसला. सोनोपंतांच्या वडील बंधूंनीं आपल्याकडे आम्हां सर्व बालगोपालांचें पालकत्व घेतलं, व कुरकुर करीत का होईना आम्हीं तें मानलं.

ह. भ. प. विष्णुबुवा जोग (आम्ही सर्व त्यांना नुसतं बुवा म्हणत असूं) आम्हां सर्वांस परमेश्वरवत् वाटत. ते आम्हां सर्वांस प्रेमानं अगदीं एकेरी नांवानं हांक मारीत. बहुतेक नांव न घेतां ‘ पोऱ्यो ’ म्हणत. किती सुटसुटीत हांक, पण त्यांत मातृ-पितृप्रेम एकवटलेलं असे ! या थोर साधुपुरुषाचा सहवास घडला हीच खरी घटना पुढचा इतिहास ठरवूं शकली. आज जो अधिकार सोनोपंतांना प्राप्त झाला आहे, त्याचा उगम चाळीस वर्षांपूर्वीं झाला. बुवांच्या सहवासांत आम्हां सर्वांना कांहीं ‘व्यसनं’ लागलीं. तीं व्यसनं ज्यांना कायम लागलीं असे सोनोपंत एकच. देवाचं भजन करणं, पोथीपुराण वाचणं व श्रवण करणं, आळंदी, पंढरपूर, देहू, आदींची नियमित वारी करणं, तालमींत जाऊन शरीर कमावणं, पाण्यांत डुंबणं, किती तरी अशा गोष्टी स्पष्टपणें आठवतात.

सोनोपंतांचें वर्णन करण्यास मी पात्र नाहीं. मला एक गोष्ट आठवते. सोनोपंतांचे एक आप्त व आम्हां दोघांचे एक स्नेही एकदां म्हणाले He does not deserve to be by his side हें वाक्य स्पष्ट केलेंच पाहिजे. हे गृहस्थ सोनोपंतांचा व माझा एकत्र फोटो होता, त्याचेकडे पाहात म्हणाले. पहिला He, मी व दुसरा सोनापंत. त्यांचं म्हणणं खरं होतं. त्यांनीं त्यांतला माझा फोटो फाडून पण टाकला ! अर्थात् सोनोपंतांना हें आवडलं नसणार, कारण ते सर्वांवर सारखं प्रेम सदैव करणारे !!

नूतन मराठी विद्यालयांत आम्ही सर्वच मित्रमंडळी होतों. सोनोपंत माझ्यापुढें एक वर्ष होते. ते माझ्याहून वयानं सहा महिने वडील आहेत. एकमेकांच्या सर्व व्यवहारांत रोजच्या रोज एकत्र येत असूं म्हणून तर मैत्री टिकली. बुवा सांगत कीं, याला लग्नीं ग्रह तेच असावे लागतात. परीक्षेनंतरच्या सुट्टींत कुंडल्या पाहून गणित करून, पास कीं नापास पाहात बसण्याचा आम्हां सगळ्यांनाच नाद लागलेला असे. अभ्यास बेतांचा मग ग्रहावरच भरवसा जास्ती. असो. याकाळीं माझे बंधु सोनोपंतांचे जानी दोस्त. कुठें कांहींतरी बिघडलं व माझे बंधूंस खो बसला, व रिकाम्या जागीं मी बसलों व मी सोनोपंतांचा बालमित्र बनलों.

शाळेंतल्या आयुष्यांतले गमतीचे प्रसंग बरेच आहेत. तीन चार आणे शेराचे मोठेमोठे अंजीर मंडईच्या मागच्या बाजूस बसून शेर शेर एकेकानं रोज खाणं, वाटेंत कुशाबाच्या गुऱ्हाळांत एक आण्याचा तांब्याभर रस पिणं, पोट भरलं नाहीं तर वर एक नारळ व लोणी खडीसाखर खाणं, वगैरे ते दिवस निराळे होते. हल्लींसारखी अन्नान्नदशा

नव्हती! सदाशिव पेठेच्या हौदावर पन्नास पन्नास घागरी देणं, कपडे धुऊन स्वच्छ करून चापून चोपून घडया घालणं, असे अनेक उद्योग आम्हांला असत.

माझ्या आधीं सोनोपंत कॉलेजांत गेले. मी मध्यंच पुण्याच्या B. J. Medical School मध्यें एक वर्ष गेलों; व त्यामुळें सोनोपंतांच्या व माझ्यांत शिक्षणक्रमाच्या दृष्टीनें आणखीच अंतर पडलं. 'व्यसनेषु सख्यम्' या न्यायानं आम्ही उभयतां कॉलेजचे विद्यार्थिदशेंत (मी F. Y. Arts व ते B. A. मध्यें) असे देशमुखांच्या झोपडींत रहायला गेलों. तिथें वर्षभर आम्हीं काढलं, हा माझ्या आयुष्यांतला फारच रम्य असा काळ मला वाटतो. याच काळांत मी सोनोपंतांचा सहाध्यायी झालों म्हणानात? मी रात्रीं ८ ते २ वाजेपर्यंत व सोनोपंतांना उठवून निजे. झोंपडींत रात्रभर दिवा असे सदा. या दिवसांतल्या कांहीं आठवणी सांगतां येतील. एकच सांगतो. त्यावरून सोनोपंतांना विनोद माहीत नाहीं असं कुणी म्हणणार तरी नाहीं. मी त्याकाळीं चहाबाज होतों. दर दोन तासांनीं एक कप चहा पीत असे. पाणी न तापवितां दूध उकळून चहा करायचा माझा रिवाज असे. एके रात्रीं मी चहा करीत होतों. 'स्टोव्ह' विझला व मी स्वस्थ बसलों. सोनोपंतांनीं विचारलं, "'आप्पा' कां रे थांबलास कां?" मीं उत्तर दिलें, "अरे चहा टाकला, पावडर खालीं बसेतों थांबायला लागतं. तुला तें कळायचं नाहीं." यावर सोनोपंत म्हणाले, "हात्तेच्या, मग आधीं पावडर टाक व वर दूध ओत म्हणजे झालं." कितीतरी वरीलसारखे प्रसंग मी लिहूं शकेन, असं आतां वाटूं लागलं आहे, पण संपादकांनीं संधि दिली त्याचा दुरुपयोग करणें बरं नाहीं, म्हणून हात आखडता घेतों.

सोनोपंतांच्या नांवावरून एकदां झालेला विनोद लिहावा कीं नाहीं हा मोठा विचार पडला होता. असत्य नाहीं व अप्रिय पण नाहीं, मग संकोच कां करा? म्हणून पुढची आठवण लिहून हा लेख संपवितों. सोनोपंतांच्या नात्यांतली एक तरुण स्त्री हिंगण्यास शिकत असे. सोनोपंतांच्या वडील भगिनींनीं त्यांना तिला पत्रांतून कांहीं मजकूर लिहिण्यास सांगितलें. पत्र लिहिलं तेव्हां सोनोपंत नुकते कॉलेजांत जाऊं लागले असावेत असं मला स्मरतं. सोनोपंतांनीं पत्र लिहिलं व योग्य वेळीं त्याचं उत्तर पण आलं. सोनोपंतांच्या नांवावरून विनोद झाला. त्या स्त्रीनं उत्तरांत मायना लिहिला तो असा—'चिरंजीव सौ. सोनूस नमस्कार.' सोनोपंतांनीं सही करतांना नुसतं 'सोनू' असं लिहिलं होतं. 'आपला' अगर 'आपली' लिहिलं नाहीं त्याचा हा परिणाम!

असो! सोनोपंतांबद्दल मनांत वसत असलेले सर्व भाव एकत्र झाले. कागदावर टांक ठेवून जसं उतरलं तसं लिहिलं आहे. सोनोपंतांच्या सहवासांत त्यांच्या व माझ्या न कळत माझा फायदा झाला हें खरं. समाजसेवा हेंच ज्याचें ब्रीद, अशा वारकरी पंथाचे सोनोपंत नेते आहेत. ईश्वरानें त्यांचे महत्कार्याकरतां त्यांना उदंड आयुरारोग्य द्यावें अशी प्रार्थना करून हा आठवणींचा लेख संपवितों.

श्री शंकर-शांकरी

लेखकः-पंडित पांडुरंग शर्मा, आळंदी देवाची

समुत्पत्तिः पद्मारमणपदपद्मामलनखात्
निवासः कंदर्पप्रतिभटजटाजूटभवने।
अथायं व्यासंगो हतपतितनिस्तारणविधौ
न कस्मादुत्कर्षः तव जननि जागर्ति जगति ॥ १ ॥

श्रीजगन्नाथराय पंडित

समाजांत सन्मानाचें स्थान ज्यांस पूज्यबुद्धिपूर्वक मान्यवरांकडून मिळतें, व त्या सन्मानाची श्रेणी 'गुणाः पूजास्थानम्' या न्यायानें, ज्यांची सतत वाढत जाते, त्यांच्या उत्कर्षाचीं निदानें पंडितराजांनीं आपल्या लहरींत मोठ्या चातुर्यानें एकत्र गोविलेलीं आहेत. त्या कारणांचा एकत्र समुच्चय जेथें संभवतो, त्या विभूतीचा उत्कर्ष उत्तरोत्तर वाढत्या प्रमाणानेंच व्हावयास पाहिजे, असा श्री पंडितांचा निश्चित केलेला निष्कर्ष आहे. प्रथमतः कुलाची विशुद्धता, त्यांत जन्मलेल्या पुरुषांच्या गुणांच्या चांगल्या प्रकारें रुजण्यास आवश्यक असलेली भूमिका तयार करून देते व पोषकही होते. विशुद्ध आचाराची परंपरा अनेक पिढ्यांतून चालत आलेल्या कुळांत महनीय विभूतींचा अवतार संभवतो, असा प्राचीनांनीं ठाम सिद्धान्त केलेला आहे. याशिवाय वंशांत विशेष श्रेष्ठ विभूति अवतरावयाची तर त्याचा दर्जाही फार वरच्या पातळींतील असावा लागतो. "जें कुळ नीतीच्या मार्गानें चालतें, सत्यानें पवित्र झालेलें बोलतें, आणि जें पाहणें असेल तें शास्त्रदृष्टीनें पाहातें, ज्या कुळांत वेद हे जागृत दैवत असतें, शास्त्रविहित आचरण हाच ज्याचा व्यापार आहे व सारासार विचार हाच ज्याचा सल्लामसलत देणारा प्रधान आहे, ज्या कुळामध्यें चिंता ईश्वराचीच एकनिष्ठ पत्नी झालेली असते आणि ऋध्यादिक या ज्याच्या घरांतील देवता आहेत, अशा रीतीनें ज्या कुळांत आपल्या पुण्याईच्या कमाईनें सर्व सुखाचा व्यापार वाढविला आहे, त्या कुळांत तो सुखानें जन्म घेतो, असें संतांचे सिद्धान्त स्पष्टपणें सांगत आहेत. ज्या कुळाची एवढी महती असते तेथेंच विभूतींच्या जन्माचा योग येतो.

माहीमच्या दांडेकर घराण्याची दया, दातृत्व व दानत या गुणांविषयीं ख्याति सर्वांच्याच ऐकण्यांत आहे. त्या घराण्यांत सर्व चाजूंनीं थोर म्हणतां येतील असे महनीय पुरुष एकत्रच झाले. आचार्य दांडेकरांचे पिताजी शुद्ध सत्त्वानें मूर्तिमंत पुतळे

होते. त्यांनीं जन्मांत परद्रव्य—परस्त्रीस स्पर्श केला नाहीं. प्रारंभींच पत्नी वारली तरी आमरणांत खडतर व्रतानें ब्रह्मचर्य पाळलें. 'किसीका दिल् दुखाना नहीं' हा त्यांचा बाणा होता. त्यांच्याकडे आलेले याचक विन्मुख गेल्याचे कोणीही सांगूं शकत नाहीं. अपत्यांवर जसें निरुपचार प्रेम, तसेंच आपल्या आश्रितावर व संबंधीयांवरही होतें; व ते अकृत्रिम असें, असें त्यांचा सहवास लाधलेले लोक सांगतात. स्वभावतःच त्यांचा ओढा सदाचरणाकडे होता. त्यांत त्यांना सहधर्मचारिणीही त्यांच्याशीं छत्तीस गुण जमलेली जुळल्यानें 'रत्नं समागच्छति कांचनेन' या सुभाषितास अनुरूप त्यांचा संसार सर्व बाजूंनीं सजलेला होता. आचार्यांच्या ततः किम् स्तोत्रांतील 'शरीरं सुरूपं तथा वा कलत्रं यशश्चारुचित्रं धनं मेरुतुल्यम्' असें वर्णन वै. वामनराव दांडेकरांना सोळा आणे लागत होतें. त्यांत विशेष एवढाच होता कीं तेही ईश्वरपरायण होते म्हणून 'मनश्चापि लग्नं हरेरंघ्रिपद्मे' असा त्या स्तोत्रातील पाठ कल्पावयास हरकत नाहीं. वै. वामनरावांची पांच अपत्यें, पैकीं रा. विष्णुपंत, बी. ए., एलएल. बी. हे माहीम पालघराला वकिली करितात. तेही वै. विष्णुबोवांच्या संबंधानें वारकरी वृत्तीचे असून, शिवाय ते कायदेकौन्सिलांतील कार्यकर्ते, पुढारी व राष्ट्रीय वृत्तींचे देशभक्त आहेत. शुद्धबीजाचिया पोटीं। फळें रसाळ गोमटीं॥ या संतप्रणीत सिद्धान्ताची सिद्धि, वै. वामनरावांच्या सर्व अपत्यांच्या विशुद्ध, विचारी व सात्विक जीवनक्रमानें विशेष विशद केलेली आहे.

श्री व सरस्वती यांचा समुच्चय साधारणतः दुर्लभच असतो. ह्या नियमास दांडेकर कुंटुंब एक मोठा अपवाद आहे. विशेष वैभवसंपन्न असतांनाही, विद्यावंत व्हावें म्हणून विद्येच्या माहेरघरीं—पुण्यांतच—या कुटुंबानें प्रारंभापासून वसति केली. त्यांत सदाचरणाचा आदर्श असलेले, ब्रह्मचर्याचे भूषण होऊन बसलेले, ज्ञानेशांची वाग्गंगा जिव्हेवर नाचती नांदविणारे, तेजस्वी वृत्तींचे व कारुण्याची केवल मूर्तीच असे शोभणारे, वै. विष्णुबोवा जोग यांच्या संगति, सहवास व स्फूर्ति यांचा लाभ त्यांस लाधला. बोलण्यांत, चालण्यांत, विनोदांत व शिकवणींत विष्णुबोवांसारख्या सज्जनाकडून आलेल्या वाग्सुमनांचा सहजासहजीं नित्य संबंध येत गेल्यानें, विचार व आचार यांची सर्व घडण व उभारणी त्याच मालमसाल्याची बनली. श्री. विष्णुपंत ऊर्फ बाबूराव यांचे धाकटे बंधू प्राचार्य शंकरराव होत. प्राचार्यांची त्यांच्यासंबंधीं 'ज्येष्ठबन्धुः पितुःसमः' अशी खरीखुरी भावना होती, व श्री. विष्णुपंतांचा प्रा. शंकररावांच्या पूर्व आयुष्यावर उपकारक असा परिणाम झाला. शुक्लेंदुवत् वाढणारा हा वृक्ष लोकोपकारक असा होत राहिला. वडील बंधूस-बाबूरावांस रत्नास जसा कांचनाचा योग यावा तसाच सार्थत्वानें, कनिष्ठ बंधूंचा-सोनोपंतांचा-योग झालेला आहे, व तो योग्य रीतीनें उभयतांनींही टिकविलेला आहे. थोरले बंधूंशीं पितृत्वाच्या नात्यानें प्रा. सोनोपंतांची वागणूक आहे, व

श्री. बाबूरावांनीं वात्सल्यप्रेमाचा परिपोष तितक्याच चढत्या प्रेमानें करण्याचें व्रत दृढतेनें पाळलें आहे.

या भावंडांना मातेचें लालन फार दिवस लाधलें नाहीं. परंतु त्या उणिवेनें त्यांच्या नशिबानें त्यांस तशी कसलीच अडचण भासण्याचा प्रसंग त्यांच्यावर आला नाहीं. 'सुखानि दुःखान्यनुभूय शोभते' य प्रमाणें दुःखांतील सुखानें ती उणीव सर्वांशानें सावरली, ती अशी कीं – श्री. बाबूरावाहून वडील असलेल्या प्रा. सोनोपंतांच्या भगिनी ती. काशीमाई कर्वे यांनीं पोटच्यांत व पाठच्यांत रेसमात्रही आवडनिवड केव्हांही केली नाहीं. त्यामुळेंच त्याच माता म्हणून सोनोपंतांच्या लालनपालनकर्त्या खरोखरीच्याच ठरल्या. 'काशीतलवाहिनी गंगा'. या माउलीची धर्मश्रद्धा, नीतिमत्ता, सदाचार फारच उच्च दर्जाचा असल्यानें, त्याचा चांगलाच ठसा त्यांच्या बंधुवर्गावर व पुत्रवर्गावर उमटला. अर्भकावस्थेपासून ही सर्व मंडळी या पवित्र वातावरणांत वाढली. त्यांत या बाईचें ज्ञानेश्वरीवरील प्रभुत्व व प्रेम यांचें बाळकडू प्राचार्यादिक भावंडांस मौंजीबंधनाच्या वयापासून मिळालेलें. तेव्हां तो त्यांचा सहज स्वभाव होऊन राहिलेला आहे. या सर्वोत्तम जोपासनेचा यांस सतत लाभ झाल्यानें लोकोत्तर गुणांचें तें कुटुंब माहेरघर बनलें. स्नान-संध्या, सोवळें-ओवळें, नैवेद्य वैश्वदेव, देवपूजा व भजन हे नित्याच्या भोजनाइतकेंच नियमितपणें त्यांचेकडून होऊं लागून ते आतां त्यांचा कायमचाच आचार होऊन बसलेला आहे. ही धर्मश्रद्धाच त्यांच्या महनीय उत्कर्षाचा पाया होय. प्राचार्य दांडेकरांच्या सात्विक स्वभावामुळें ते सुवर्णाप्रमाणें सर्वांस लहानपणापासून हवेसेंच वाटत. ती त्यांची आकर्षकशक्ति शेवटपर्यंत वाढत राहिली व तिनें त्यांचा परिवार अपरिमितच वाढविला. 'होवा वाटे जना । तुका म्हणे साठी गुणा ॥' या न्यायानें त्यांच्या सदाचाराला त्यांनीं मोठ्या परिश्रमानें व खडतर तपश्चर्येनें उत्तमोत्तमगुणांची जोड कमावून दिली. ते चुकून देखील आजन्म दुर्गुणाच्या वाऱ्यासहि उभे राहिलेले नाहींत. वे. विष्णुबुवांच्या नित्य साहचर्यानें इंद्रियास रिकामा ळळा देण्याचें त्यांच्या स्वप्नांतही त्यांस शिवलें नाहीं. ज्ञानदेवीसारख्या अपूर्व ग्रंथाची शिकवण, पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या दृष्टीची भर घातली असतां कशी सुशोभित दिसते, तें तोलण्याच्या हौसेनें त्यांची तत्त्वज्ञानाकडे ओढ लागली. श्री. जोगासारख्या, तज्ज्ञांकडून ज्ञानेश्वरी, म. म. श्रीधरशास्त्री पाठकांसारख्यांकडून कठोपनिषदादि वेद-वाङ्मय, वे. ह. भ. प. वंकटस्वामिसारख्यांकडून वारकरीय व्याख्यानशैली, आणि निंबाळनिवासि शास्त्रपरनिष्णात प्राध्यापक रानडयांसारख्यांकडून तत्त्वज्ञान लाभण्याची संधि, पूर्व सुकृताच्या सामर्थ्यानें समुच्चयपूर्वक साधल्यानें, प्राचार्य सोनोपंतांनीं आपल्या आयुष्याचें खरोखरीच सोनें केलें. त्यांनीं गीताभाष्यादिकांचा स्वतंत्रतया केलेला व्यासंग तर त्यांच्या भक्तिपर्यंतीय ज्ञानाचें एकांगित्व पार पुसून, त्यांचे त्या विषयावरील सव्यसाचित्व सिद्ध करितो. त्यांची चिकित्सक नजर, त्यांचें अचूक तर्ककौशल्य व असाधारण विषयविवेचनशैली

ह्यांनीं त्यांच्या तपश्चर्येच्या तेजास चांगलीच चमक आणलेली आहे. त्यांनीं स. परशुरामभाऊ कॉलेजचें धुरीणत्व चांगल्याप्रकारें पार पाडलें. त्याप्रमाणेंच वारकरी शिक्षणसंस्था व वै. जोगांचे पारमार्थिक कार्यक्रमही उत्तम तऱ्हेनें चालू ठेवले आहेत. बोलणारास लिहितां येत नाहीं किंवा लिहिणारा वक्ता होत नाहीं, ही विष्णुशास्त्रीय उणीव यांनीं सव्यसाचित्वानें भरून काढलेली प्रत्ययास येते.

ह. भ. प. सोनोपंतांचें प्रचंड पाठांतर, प्रमाणें देण्याचें प्रसंगावधान, युक्तियुक्त उदाहरणांनीं प्रमेय पटविण्याची हातोटी हीं सर्वच कांहीं असामान्य आहेत. यांचा गजवर्जांत जसा कार्यक्रम सफाईनें पार पडूं शकतो तसे ते एकांताचेही भोक्ते आहेत. देहूनजीकच्या श्रीतुकोबापादप्रसादानें पवित्रित झालेल्या प्रसरांत पारायणें करीत यांनीं दिवसचे दिवस घालविलेले आमच्या अद्याप डोळ्यापुढें दिसत आहेत. यांच्या गुरूपासून यांनीं ब्रह्मचर्याचा जसा धडा घेतला तसा असत्यभाषणाचा अभाव, परद्रव्य परनारीचा विटाळ, व्रतस्थता व वैराग्यशीलता आणि निर्भिडपणा ह्यांही गुणांस आपली मनोभूमिका योग्य तशी कमावून तींत हे गुण त्यांनीं उत्तमप्रकारें रुजविले. मानामागें नांद्या होऊन फिरण्याचें तर त्यांच्या परंपरेस वावडेंच आहे. तसेच ते पक्षान्धतेपासून अलिप्त आहेत. वै. साखऱ्यांच्या पुण्यतिथीचा प्रसंग हे साजरे करीत तर वे. देशमुखां-कडेही हजेरी देत. यांची व्याख्यानगंगा फेडित पापताप, पोषित तिरींचे पादप सग-रोद्धारांचे पारमार्थिक प्रपंच करून अनायासें आत्महित साधित साधित, सर्व तीर्थांचा राजा समुद्र—परमपद—प्राप्त करून घेत आहे, हें सर्वांत कौतुक करण्यासारखें त्यांचें महनीय कृत्य आहे.— 'आत्मक्रीड आत्मरतिः क्रियावानेष ब्रह्मविदां वरिष्ठः'

परमार्थी असूनही प्राचार्य दांडेकर व्यवहारास विन्मुख राहिले नाहींत. त्यांनीं आपल्या आयुष्यक्रमानें प्रवृत्तिनिवृत्तींचा जो मेळ घातला तो 'विरुद्धा द्या हात धरिती' ह्या त्यांच्या पारंपरिक ब्रीदास धरूनच आहे. जतकर असोत अगर मतकर असोत, झालें लोभाचें मांजर। हिंडवितें दारोदार॥ याचा शिंतोडाही आपल्याकडे उडता कामा नये, अशी दक्षतेची जागरूक वागणूक त्यांनीं येथपर्यंत मोठ्या बाणेदारपणानें पाळलेली आहे. 'काळ सार्थक केला त्यांनीं' असेच उद्गार त्यांच्या चरित्राकडे पाहिलें असतां, कोणाच्याही तोंडून आलेच पाहिजेत, अशी बंदोबस्तीची शिस्तशीर वागणूक त्यांनीं ठेविली. त्यांच्या संगतीनें अनेकांना सुविचार समजला. त्यांनीं वारकरी वाङ्मयास आपल्या पैलू पाडण्याच्या कौशल्यानें तेजस्वी रूपांत जनतेपुढें ठेविलें आहे. त्यांनीं तत्त्वज्ञानावर प्रबंध लिहिले, ज्ञानकोशाकरितां प्रबंध पाठविले, प्रसादांतून उपदेशाचा वर्षाव केला, व इकडे कीर्तनें, व्याख्यानें, प्रवचनें व कॉलेजांतील लेक्चरें हे सर्व कांहीं कार्यक्रम अबाधित सतत साधले, ही सर्व कार्यक्षमता तपाशिवाय सुसाध्य होत नाहीं. ती यांनीं सांगतेनें साधली यांतच यांच्या मोठेपणाचें बीज सांठविलेलें

आहे. 'जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले' ह्याची तर खूण त्यांच्या आचरणांत पदोपदीं प्रत्ययास येतें. हें त्यांच्या सहवासांतील स्वजनांस उत्तम प्रकारें अनुभवास येत आहे. यांच्या या शास्त्रपूत आचारानें यांच्याविषयीं 'कुलं पवित्रं जननी कृतार्था' असेच उद्गार यांच्या गुणप्रकर्षामुळें सज्जनांच्या मुखांतून सहजच बाहेर येतात. यांनीं आपल्या निरपेक्ष दातृत्वानें विद्यादानांत प्राचीन कुलगुरूंना स्पर्धा करावी लागेल अशी महनीय पदवी मिळविली आहे. त्यांच्या परिपक्व ज्ञानाचा, परिणत अनुभवाचा व त्यांच्या सोज्वळ तपःसामर्थ्याचा आम्हां भारतीयांना व वारकरी वैष्णववीरांना वारंवार वाढत्या श्रेणींत निरंतर लाभ व्हावा. 'तुका म्हणे आतां उरलों उपकारापुरता' अशा त्यांच्या शेष आयुष्याचा आमच्या उद्धाराचे कामीं पुरेपूर उपयोग व्हावा म्हणून पंढरीश पांडुरंगानें त्यांस मार्कंडेयाचें आयुष्य द्यावें व ज्ञानेश्वरांचें हृदय त्यांच्यांत उत्तरोत्तर विकसित होत जाऊन, 'विश्व स्वधर्म सूर्ये पाहो' अशी आमची आशा आहे. ही प्रार्थनायुक्त पुष्पांजलि आम्ही शंकर-स्वरूपीं विश्वेश्वरचरणीं वहात आहोंत, ती त्यांनीं 'पत्रं पुष्पं' न्यायानें रुजू करून घ्यावी इति शम्.

अर्भकाचे साठीं। पंतें हातीं धरिली पाटी॥
तैसे संत जगीं। क्रिया करूनि दाविती अंगीं॥
बालकाचे चाली। माता जाणूनि पाऊल घाली॥
तुका म्हणे नाव। जनासाठीं उदकीं ठाव॥

'तानन्तरेण निपतेत् क्व नु मत्प्रणामः ।'

कु. श्री. अर्जुनवाडकर, बी. ए. (ऑनर्स)

असंशयं धन्यजनुर्जनो यो दूराद् विवस्वानिव भूरितेजाः ।
सहस्रलक्षाधिकयोजनेभ्यस्तेजः सरीसर्ष्टि जगद्धिताय ॥ १ ॥
तथाऽप्यपूर्वो महिमा स कोऽपि यतात्मवीर्यस्य जनस्य तस्य ।
यस्य प्रकाशं लभतेऽवकाशं प्राप्तुं न दूरादितरोऽपि लोकः ॥ २ ॥
यदेष सङ्घट्टयाति स्वबाहू अस्तङ्गताशेषविदूरभावः ।
भुजैर्जनानां हितभाजनानां भक्तौ विभोराहितगौरवाणाम् ॥ ३ ॥
न तद् विचित्रं महितो यतोऽस्य निवृत्तिनाथानुज आर्यवृत्तः ।
गीतामृतं देवगिरः प्रदेशाद् यः प्रापयत् प्राकृतभूप्रदेशम् ॥ ४ ॥
शताब्दषट्कं परिपीयमानान्यद्याप्यनूनानि वचोऽमृतानि ।
श्रीज्ञानदेवीन्दुकलास्रुतानि यः पाययत्यत्र जनानजस्रम् ॥ ५ ॥
सुधारसगर्भां गिरमस्य पुण्यां श्रुत्वा सकृच्छ्रीहरिकीर्तनेषु ।
निश्चेतसः पल्लविताः भवन्ति, सचेतसां तत्र कथैव कीदृक् ! ॥ ६ ॥
यस्य स्थिरा दृक् परिशोधयन्ती, स्फुटोत्तरश्मश्रु मुखं प्रसन्नम् ।
शरीरयष्टिर्नितरामुदारा, सम्पश्यतां कर्षति मानसानि ॥ ७ ॥
प्रसक्तचेताः परकार्यसिद्धौ स्वकार्यसिद्धौ विगतादरो यः ।
व्रतं चरत्युग्रतरं तदेव देवव्रतेनाभिविमृष्टपूर्वम् ॥ ८ ॥
चिराय सोऽयं सुबहून् विनेयानध्याप्य यावद् विहितार्थता स्यात् ।
स्थानादितो यात्यधुना प्रवेष्टुं महत्तरं सार्वजनीनमायुः ॥ ९ ॥
शुभे तदस्मिन् समये किमन्यदाशासनीयं यदयं विधत्ताम् ।
विशुद्धवृत्तं परिशुद्धवृत्तः स्वबन्धुवर्गं, त्रिदिवं च देशम् — ॥ १० ॥
अनार्यजुष्टं तिमिरस्य पृष्ठं न यत्र मृष्टं विजहाति तेजः ।
गुर्वी समृद्धिर्विपुला च शान्तिर्यत्रानुबन्धेन पदं प्रशिष्टः ॥ ११ ॥
यत्रानखाग्राग्रशिखं वपूंषि व्याप्य स्थितः स्नेहरसः सदैव ।
महत्तमं लोकविभूषणं च यत्र स्थितं प्रश्रयवृत्तिमत्त्वम् ॥ १२ ॥
ज्ञानद्रुमो यत्र च सार्वकालं समृद्धशाखः फलपुष्पभारैः ।
न जातु विद्यासरितः प्रवाह उच्छुष्कपात्रत्वमुपैति यत्र ॥ १३ ॥
निर्भीकता यत्र पदं प्रशास्ति नाश्रीयते यत्र परावलम्बः ।
यत्र प्रधानं कृतिरेव सूत्रं शीलं च यत्रोच्चवसितादभिन्नम् ॥ १४ ॥

शान्तिश्चिरं जगति सिध्यति सौहृदाच्चेत्
तस्योद्भवः सुचरितैकनिबन्धनश्चेत् ।
तत्रादरोऽपि च सतामुपदेशतश्चेत्,
तानन्तरेण निपतेत् क्व नु मत्प्रणामः ? ॥ १५ ॥

प्राचार्यदाण्डेकराणां जीवनरहस्यम् ।

—नैष्ठिकं ब्रह्मचर्यम्—

लेखकः—प्रा. के. ना. वाटवे

मया खलु १९१९ तमे खिस्ताब्दे, फर्ग्युसन महाविद्यालयसमीपं 'वैदिकाश्रमे' निवसता, अस्मत्पुरोवर्तिनि विद्यार्थिवसतिगृहे वसन् एम्. ए. परीक्षामुत्तितीर्षुः कश्चन प्रौढो विद्यार्थी दृष्टः । तत्प्रथमालोकक्षणादारभ्य संजातकुतूहलेन मया वितर्कितम् । यदहो विद्यार्थिसाधारणेऽप्यस्मिन् किमपि असाधारण्यं अंतर्हितं असंशयं वर्तते इति । तथाहि आङ्ग्लशासनवशात् सर्वथा परिवर्तितेऽपि आधुनिकविद्यार्थिजीवने, वेषभूषायां विपर्यस्तायां, आचारधर्मेषु विकृतेषु, अध्ययनपद्धतौ विभिन्नायां, भाषायामपि रूपान्तरितायां, बहूलीभूते स्वतिरस्कारे, विवृद्धे च परकीयादरे, किं बहुना, आङ्ग्लमयीभवनोद्यते निखिलेऽपि विद्यार्थिजने अयमेव एकः अपरिवर्तितः, अविपर्यस्तः अविकृतश्च प्राचीनगुरुकुलछात्रवृत्तिबीजमिव आर्यसंस्कृति–प्रत्युज्जीवनाशया धात्रा विनिर्मितोऽलक्ष्यत । स गोष्पदाकारां शिखां शिरसि अवहत् । भालं चन्दनविलिप्तमकरोत् । अधारयत्कण्ठे तुलसीमणिमालाम् । शुभ्रेण विनीतेन च स्वकीयेन वेशेन न केवलं बाह्यां किन्तु अन्तर्गतामपि हृदयशुद्धिमदर्शयत् । पाश्चात्यतत्त्वज्ञानाध्ययनेन सह वैदिकं तत्त्वज्ञानमपि सादरमभ्यस्यत् । ज्ञानेश्वर–नामदेव–एकनाथ–तुकारामादीनां भागवतानां भक्तिसुधास्यन्दिनीं देश्यां वाणीं कण्ठगतामकरोत् । तारुण्येऽपि इन्द्रियसंयमं, मतिमत्तायामपि विनयं, शक्तौ च क्षमामेवाविरकरोत् । ब्रह्मवर्चसेन प्रकाशमानं तमवलोक्य प्राचीनं ब्रह्मचर्याश्रमं नवीनतामिवापन्नं अमन्यन्त विस्मितान्तरङ्गाः तत्सहाध्यायिनः ।

समारब्धाभिजिज्ञासेन मया शङ्कर वामन दाण्डेकरेति तस्य नाम पश्चादवगतम् । न च बाल्यादेव लौकिकेषु विषयेषु विरक्तः, गृहीतभागवतधर्मदीक्षः, स्वदेश-स्वधर्म-स्वभाषासेवायां समर्पितसर्वस्व आसीदित्यपि ज्ञातं मया । तदाप्रभृति तस्मिन् वर्धमानेन तत्सुहृद्भावं च प्रायेण समीपस्थेन मया तस्य जीवनं अवयावत् सुनिपुणमवलोक्यते । तत् सर्वावस्थासु एकरूपं, एकसूत्रबद्धत्वादविक्रियं किन्तु महाभारतमिव प्रतिपर्वं सौन्दर्यं गरिमाणं च पुष्णत्प्रचलति । इमे एव प्राचार्याः दाण्डेकराः

शिक्षण–प्रसारक–मंडलीं स्वीयया दीर्घया सभक्तिकया च सेवया चरितार्थां विधाय अधुना निवृत्तिं वाञ्छन्ति। एतस्मिन्नवसरे कृतार्थं तेषां जीवनं सरहस्यं मीमांसितं चेत् तदौचित्यावहमेव स्यादिति मन्ये।

यत्सूत्रबद्धं, यत्प्रेरितं यन्नियंत्रितं च तेषां जीवनं तन्नैष्ठिकं ब्रह्मचर्यमेव। आमरणं ब्रह्मचर्याश्रममाश्रित्य विवाहादिकं च विवर्ज्य यद् वेदाध्ययनव्रतस्य परिपालनं नाम क्रियते वर्णिना, तन्नैष्ठिकं ब्रह्मचर्यमिति स्मर्यते। तादृशं ब्रह्मचर्यं दाण्डेकरमहाभागैः चर्यते इति जानन्ति सर्वे तद्विदः। परं अर्थान्तरेणापि तेषां जीवने ब्रह्मचर्यमेव निबन्धनत्वेन दृश्यते। परोपकरण-रूपायाः तपस्यायाः बलेन ते स्वार्थं दूरीकृत्य ब्रह्मभूयाय प्रयतन्ते। कर्मणा, मनसा, वाचा सर्वभूतहिते रतास्तपस्विनो ब्रह्मसारूप्यं प्राप्य ब्राह्मीं स्थितिमास्थिता एव मन्तव्याः। मनःस्थैर्य-पूर्वकं चरितं एतादृशं ब्राह्मं व्रतं अर्थान्तरेण नैष्ठिकं ब्रह्मचर्यमेव जायते। प्रथमं स्मार्तं ब्रह्मचर्यं केवलं साधनरूपमेव। एतद्वितीयं तु साध्यरूपम्। किं वा तपसः, त्यागस्य, ज्ञानस्य, वैराग्यस्य, वेदाध्ययनस्य वा फलम्? परमेश्वररूपिण्याः ब्रह्मापरपर्यायायाः जनतायाः सेवा, तद्द्वारा च परमेश्वरसारूप्यं ब्रह्मभूयं वा–एतदेव तत्फलत्वेन अवगच्छन्ति साधवः। एतादृशं ब्रह्मचर्यं दाण्डेकरैर्यथाशक्ति, यथाबुद्धि अहर्निशं च त्यागपूर्वकं परिपाल्यते इति जानते परिचिताः।

शिक्षणप्रसारकमण्डल्याः विविधासु संस्थासु शिक्षकत्वं, प्राध्यापकत्वं, चालकत्वं चाङ्गीकृत्य शिक्षिताः सन्मार्गे च स्थापिताः परःसहस्राः विद्यार्थिनः, भागवतधर्मदीक्षां गृहीत्वा हरिकीर्तनद्वारा उपदिष्टाः संख्यातीता जनाः। विविधलेख-ग्रंथादिप्रकाशनेन प्रज्वालितो ज्ञानदेवस्य ज्ञानमयः प्रदीपः। आचाण्डालं सौहार्दमातन्य आचरितमेकनाथचरितम्। सुलभां बहुजनसमाजमनोहारिणीं हरिकीर्तनपद्धतिं चावलम्ब्य अनुसृतः तुकारामोपदेशमार्गः। एवं शास्त्रार्थानां आचयेन, परेषां आचारे स्थापनेन, स्वयं च आचरणेन इमे दाण्डेकराः प्राचार्याः यथार्थनामानः शोभन्ते। निवृत्तेः ऊर्ध्वमपि एतेषामिदं नैष्ठिकं ब्रह्मचर्यव्रतं अखण्डितमेव विवृद्धगुणं भवेदिति द्रढीयान्मे विश्वासः। दाण्डेकरमहाभागानां इदं नैष्ठिकब्रह्मचर्यसूत्रबद्धं जीवनं जनानामधुना उपदेशतां गतं दृश्यते। तैत्तिरीयोपनिषदि 'अथ यदि ते कर्मविचिकित्सा वा वृत्तविचिकित्सा वा स्यात्। ये तत्र ब्राह्मणा विमर्शिनः। युक्ता आयुक्ताः। अलूक्षा धर्मकामाः स्युः। यथा ते तत्र वर्तेरन्। तथा तत्र वर्तेथाः।' इत्युक्तरीत्या दाण्डेकराणामपि आचारोऽस्मिन् काले आदर्शभूतः सन् सुचिरं लोकान् सन्मार्गं प्रदर्शयतु इत्याशास्य विरम्यते।

दाण्डेकरगुणप्रशस्तिः ।

कविः—प्रा. अनन्त गणेश जावडेकर, एम्. ए., बडोदा युनिव्हर्सिटी, बडोदा

दाण्डेकरकुले जातो यो विभाति सुवर्णवत् ।
सुवर्णशुद्धचारित्र्यात्सोनोपंतः प्रकीर्तितः ॥ १ ॥

अग्निः शोधयाति स्वयं हि सकलं
धूमादशुद्धोऽपि स- ।
चानन्दं वितनोति शीतलकरः
सोऽपि स्वयं दुःखितः ॥
मित्रत्वात्प्रददाति पुष्टिमरुणोऽ-
सौ शत्रुणा ग्रस्यते ।
पूर्णत्वात्खलु शङ्करस्य चरितं
केनापि नो तुल्यते ॥ २ ॥

वक्तृत्वे च बृहस्पतिर्ननु पुन-
श्चार्वाकवादी क्वचित् ।
संसारीव हि शिक्षणप्रसरणे
स ब्रह्मचारी पुनः ॥
नृणां संघटकस्तथा हरिकथा-
सङ्कीर्तने नारदः ।
पाश्चात्याध्ययने कृते सति पुन-
र्नात्मास्य लिप्तः कदा ॥ ३ ॥

हृत्पद्मे यस्य गोविन्दो जिह्वाग्रे च सरस्वती ।
ज्ञानेशः करमध्ये च चिरंजीयात् स शङ्करः ॥ ४॥

३०-१-५१



प्राचार्य दांडेकर—महाराष्ट्राचें एक चालतं बोलतं आश्चर्य

लेखक—प्रो. श्री. वा. काळे, एम्. ए. (मुंबई), ए. एम्. (कोलंबिया)



मोठ्यांचा मोठेपणा तशीच परिस्थिति उद्भवल्याशिवाय समजून येत नाहीं, किंवा बऱ्याच उशीरानं येतो असं त्यांचे चरित्रकार सांगतात. आणि त्यांच्या सांगण्यांत पुष्कळसं खरंही असतं. पण मला वाटतं प्राचार्य दांडेकर याला अपवाद आहेत. त्यांच्या सहवासांत घालविलेले कांहीं क्षणहि ही व्यक्ति अलौकिक आहे याची मनाला साक्ष देतात. त्यांचं व्यक्तिमत्त्व अमुक एका परिस्थितीनंच किंवा कालांतरानं लक्ष्यांत येण्याइतकं साधं नाहीं याची तत्काळ खात्री पटते. आठ नऊ वर्षांपूर्वी मीं त्यांना पहिल्याप्रथम जेव्हां पाहिलं, तेव्हां आपल्या तत्त्वज्ञानपर व धार्मिक वाङ्मयांत ठिकठिकाणीं ज्याची महति गाइली आहे असा एक देवमाणूस किंवा दैवी विभूतिच भेटली असं वाटलं मला.

अर्थात्, आपल्या समाजांतून विभूतिपूजा नाहींशी झाली पाहिजे असं मलाहि वाटतं. पण विभूतिपूजा आणि विभूतिदर्शन यांत मी फरक करीन. विभूतिपूजा ही केव्हांही वाईट; पण विभूतींच्या गुणांचं दर्शन हें केव्हांही चांगलंच. विभूति-दर्शनाचा काल संपला असं आजही म्हणतां यायचं नाहीं, व तो कधीं संपेल असं मला वाटत नाहीं.

प्रा. दांडेकर यांना मी विभूति कां म्हणतों याची तार्किक चर्चा न करतां, त्यांच्या विभूतिमत्वाचीं एकदोन उदाहरणं इथं द्यावींशीं वाटतात. त्यांच्याविषयीं एकदोन शब्दचित्रं रेखाटा असं मला सांगितलं तर मी त्याकरितां प्राचार्य दांडेकर एखाद्या कीर्तनास सुरुवात करतात तेव्हां, आणि कीर्तनाची समाप्ति झाल्यावर ते पुन्हां सभोंवतालच्या मित्रमंडळाशीं हास्यविनोद करण्यास सुरुवात करतात तेव्हां, असे दोन प्रसंग निवडीन. या दोन प्रसंगीं प्राचार्य कसे दिसतात व कसे वागतात, याचं सहज निरीक्षण केलं तरी त्यांनीं आपल्यापुढं कोणता ध्येयवाद ठेवला असला पाहिजे, व त्यांत किती संपूर्णपणें यशस्वी झाले असले पाहिजेत याची कल्पना येते. कीर्तनाच्या अगोदर त्यांनीं एखादी कॉलेजच्या प्राध्यापक वर्गाची सभा संपवली असेल, किंवा एखाद्या रुग्ण मित्राची किंवा वार-कऱ्याची पूसतपास करून ते आले असतील. हजारों कामं असणार त्यांना. पण एकदां का पूर्वींचे कांहीं अभंग होऊन त्यांनीं कीर्तनाचें सूत्र हातीं घेतलें, व 'सुंदर तें ध्यान' या अभंगानें कीर्तनास सुरुवात केली, कीं ते व्यावहारिक जगांतून पारमार्थिक जगांत इतक्या लीलेनें प्रवेश करतात व त्याशीं एकरूप होतात कीं

होईना, पण प्रेम, मैत्री, सहकार्य, या सात्विक प्रवृत्ति जागृत होतात, मनाला एक प्रकारचं समाधान मिळतं आणि तें पुष्कळ काळ टिकतं. मोठीं माणसं हीं आपल्या-भोंवतीं शांतता व सहकार्य यांचं वातावरण सहजगत्या निर्माण करतात; त्यांच्यामुळं माणसं तोडण्याच्याऐवजीं जोडलीं जातात, याचा अनुभवही मला कित्येकदां प्राचार्य दांडेकर असलेल्या एखाद्या बैठकींत चाललेल्या संभाषणावरून आला. पैशांनीं जें समाधान विकत घेतां येणार नाहीं, असं समाधान संतांच्या संगतींत व त्यांच्या वाङ्मयाच्या परिशीलनामुळं होतें, असं कित्येकदां प्राचार्य दांडेकर स्वतःच म्हणतात. पण त्यांच्या म्हणण्याच्या सत्यतेचा उत्कृष्ट पुरावा त्यांच्या भेटीनं वाटणाऱ्या समाधानावरूनच खास मिळेल.

व्यवहार अन् परमार्थ या दोन ध्रुवांचा त्यांच्या जीवनांत झालेला मनोहर मिलाफ, व आपल्यासभोंवतालच्या व्यक्तींना अन् एकंदरींत सर्वसामान्य समाजाला खऱ्या-खुऱ्या शांततामय वातावरणाचा अनुभव आणून देण्याचं त्यांच्या ठिकाणीं असलेलं सामर्थ्य, या दोन गोष्टींवरूनच मी प्रा. दांडेकर यांना विभूति असं म्हणतों. त्यांच्या मोठेपणाचें रहस्य कशांत आहे हें कळणं कठिण. कारण, प्राचार्य दांडेकरांच्या विभूतिमत्त्वास असंख्य पैलू आहेत व त्यांतील प्रत्येक लाखमोलाचा आहे. आजतरी "आश्चर्यवत् पश्यति कश्चिदेनं आश्चर्यवद्वदति तथैव चान्यः" या उक्तीप्रमाणं प्राचार्य दांडेकर हे महाराष्ट्राचें एक चालतं बोलतं आश्चर्य आहेत यांत शंका नाहीं.

आपल्या कीर्तनप्रवचनांतून किंवा व्याख्यानांतून त्यांना सर्वसामान्य जनतेला कोणता संदेश द्यावयाचा असतो? या प्रश्नाचं उत्तर शोधण्यापूर्वीं त्यांच्या कीर्तनाचे किंवा प्रवचनाचे कोणते भाग पडतात हें आपण पाहूं. त्यांच्या निरूपणांतील पहिला भाग म्हणजे तात्त्विक चर्चेचा—जगाचं स्वरूप काय? तें सत्य कीं मिथ्या? ईश्वर, जीव, जग यांचा संबंध; ज्ञान व कर्म नि भक्ति यांचं तुलनात्मक महत्त्व; कर्माचीं चांगलींवाईट फलं इ. प्रश्नांचा असतो. दुसरा आणि तितकाच महत्त्वाचा भाग म्हणजे ही तात्त्विक चर्चा अज्ञ जनतेलाही सुगम करून सोडण्याकरितां ते जे दृष्टान्त, अनुरूप गोष्टी, नर्म विनोद वापरतात त्यांचा. यांत त्यांच्या कीर्तनशैलीचं मुख्य रहस्य साठविलेलं असतं. त्यानंतर ते आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यिर्थ्रे दाखल उपनिषदं, पुराणं, ज्ञानेश्वरी, तुकारामाची गाथा, भागवत, दासबोध, तसेंच पाश्चात्य तत्त्वज्ञ, यांचे जे समर्पक आधार उद्धृत करतात, तोही एक स्वतंत्र भाग म्हणतां येईल. शिवाय, कीर्तनप्रसंगींचं भजन, संगीत, हरिनामाचा 'पुंडलिक वरदा हरिविठ्ठल, ज्ञानदेव तुकाराम' वगैरे जयघोष, हा या प्रसंगाचा रसपरिपोषक, व आनंदसंवर्धक म्हणतां येईल.

अशा रीतीनें (१) तात्त्विक चर्चा (२) दृष्टान्त (३) आधार (४) संगीत अन् घोष, हे मीं प्राचार्य दांडेकर यांच्या कीर्तनांतील चार महत्त्वाचे विशेष सांगितले. पण, हें सर्व बाजूला काढलें तरी, कीर्तनाच्या निमित्तानं त्यांनीं सर्वसामान्य जनतेला जी

होईना, पण प्रेम, मैत्री, सहकार्य, या सात्विक प्रवृत्ति जागृत होतात, मनाला एक प्रकारचं समाधान मिळतं आणि तें पुष्कळ काळ टिकतं. मोठीं माणसं हीं आपल्या-भोंवतीं शांतता व सहकार्य यांचं वातावरण सहजगत्या निर्माण करतात; त्यांच्यामुळं माणसं तोडण्याच्याऐवजीं जोडलीं जातात, याचा अनुभवही मला कित्येकदां प्राचार्य दांडेकर असलेल्या एखाद्या बैठकींत चाललेल्या संभाषणावरून आला. पैशांनीं जें समाधान विकत घेतां येणार नाहीं, असं समाधान संतांच्या संगतींत व त्यांच्या वाङ्मयाच्या परिशीलनामुळं होतें, असं कित्येकदां प्राचार्य दांडेकर स्वतःच म्हणतात. पण त्यांच्या म्हणण्याच्या सत्यतेचा उत्कृष्ट पुरावा त्यांच्या भेटीनं वाटणाऱ्या समाधानावरूनच खास मिळेल.

व्यवहार अन् परमार्थ या दोन ध्रुवांचा त्यांच्या जीवनांत झालेला मनोहर मिलाफ, व आपल्यासभोंवतालच्या व्यक्तींना अन् एकंदरींत सर्वसामान्य समाजाला खऱ्या-खुऱ्या शांततामय वातावरणाचा अनुभव आणून देण्याचं त्यांच्या ठिकाणीं असलेलं सामर्थ्य, या दोन गोष्टींवरूनच मी प्रा. दांडेकर यांना विभूति असं म्हणतों. त्यांच्या मोठेपणाचें रहस्य कशांत आहे हें कळणं कठिण. कारण, प्राचार्य दांडेकरांच्या विभूतिमत्त्वास असंख्य पैलू आहेत व त्यांतील प्रत्येक लाखमोलाचा आहे. आजतरी "आश्चर्यवत् पश्यति कश्चिदेनं आश्चर्यवद्वदति तथैव चान्यः" या उक्तीप्रमाणं प्राचार्य दांडेकर हे महाराष्ट्राचें एक चालतं बोलतं आश्चर्य आहेत यांत शंका नाहीं.

आपल्या कीर्तनप्रवचनांतून किंवा व्याख्यानांतून त्यांना सर्वसामान्य जनतेला कोणता संदेश द्यावयाचा असतो? या प्रश्नाचं उत्तर शोधण्यापूर्वीं त्यांच्या कीर्तनाचे किंवा प्रवचनाचे कोणते भाग पडतात हें आपण पाहूं. त्यांच्या निरूपणांतील पहिला भाग म्हणजे तात्त्विक चर्चेचा—जगाचं स्वरूप काय? तें सत्य कीं मिथ्या? ईश्वर, जीव, जग यांचा संबंध; ज्ञान व कर्म नि भक्ति यांचं तुलनात्मक महत्त्व; कर्मांचीं चांगलींवाईट फलं इ. प्रश्नांचा असतो. दुसरा आणि तितकाच महत्त्वाचा भाग म्हणजे ही तात्त्विक चर्चा अज्ञ जनतेलाही सुगम करून सोडण्याकरितां ते जे दृष्टान्त, अनुरूप गोष्टी, नर्म विनोद वापरतात त्यांचा. यांत त्यांच्या कीर्तनशैलीचं मुख्य रहस्य साठविलेलं असतं. त्यानंतर ते आपल्या म्हणण्याच्या पुष्टिदाखल उपनिषदं, पुराणं, ज्ञानेश्वरी, तुकारामाची गाथा, भागवत, दासबोध, तसेंच पाश्चात्य तत्त्वज्ञ, यांचे जे समर्पक आधार उद्धृत करतात, तोही एक स्वतंत्र भाग म्हणतां येईल. शिवाय, कीर्तनप्रसंगींचं भजन, संगीत, हरिनामाचा 'पुंडलिक वरदा हरिविठ्ठल, ज्ञानदेव तुकाराम' वगैरे जयघोष, हा या प्रसंगाचा रसपरिपोषक, व आनंदसंवर्धक म्हणतां येईल.

अशा रीतीनें (१) तात्त्विक चर्चा (२) दृष्टान्त (३) आधार (४) संगीत अन् घोष, हे मीं प्राचार्य दांडेकर यांच्या कीर्तनांतील चार महत्त्वाचे विशेष सांगितले. पण, हें सर्व बाजूला काढलें तरी, कीर्तनाच्या निमित्तानं त्यांनीं सर्वसामान्य जनतेला जी

शिकवण दिली तिचं महत्त्व माझ्या मतानं फार मोठं आहे. आणि या ठिकाणीं ती शिकवण माझ्या समजुतीप्रमाणं संक्षेपानं देण्याचा विचार आहे.

(अ) पहिला प्रश्न असा कीं, तत्त्वज्ञानाचा या आधुनिक जगांत खरोखरी कांहीं उपयोग आहे का ? प्राचार्य दांडेकरांच्या मताप्रमाणं, तत्त्वज्ञान हें आजही माणसाला भाकरीइतकंच महत्त्वाचं आहे. त्याचा मुख्य उपयोग बुद्धीचं समाधान नसून, मनुष्यावर जे कठिण प्रसंग वेळोवेळीं उद्भवतात, त्यावेळीं भावनेच्या पुरांत त्यानं वाहून न जातां, स्वतःच्या, समाजाच्या किंवा जागतिक प्रश्नाकडे जास्त आस्तिक्य बुद्धीनं, व निःपक्षपाती दृष्टीनं पहावं, हा आहे.

(ब) समजा, तत्त्वज्ञानाच्या अभ्यासानं मनुष्याची बुद्धि ही अधिक स्थिर झाली, तरी त्यानं पुढं काय करावं ? तत्त्वज्ञानाचा अभ्यास करूनच केवळ माणसाला सर्व शोकप्रसंगांतून निर्धास्त बाहेर पडतां येईल का ? अर्थातच नाहीं. ईश्वराची भक्ति ही ईश्वरज्ञानाहून अधिक सोपी, अधिक फलदायक, आणि खऱ्या अभ्युदयनिश्रेयसाची किंवा पारमार्थिक आनंदाची पायरी आहे. म्हणून देवाच्या दर्शनाचा ध्यास ठेवून त्याची नेहमीं भक्ति करावी, अशी प्राचार्य दांडेकरांची शिकवण त्यांच्या कीर्तनांतून दिसून येते.

(क) ज्ञानापेक्षां सामान्य माणसांस भक्ति हा मार्ग अधिक सोपा. पण मग त्यानं व्यवहार आणि भक्ति यांची सांगड कशी घालावी ? कारण व्यवहार म्हणजे अर्थप्राप्ति, आप्तेष्टांशीं बरेवाईट संबंध, गृहस्थाश्रमाचीं सर्व सुखदुःखं आलींच. या सर्व घोळामध्यें माणसाला नुसती देवभक्ति जरी म्हटली तरी, ती अप्रामाणिक न ठरतां करणं कशी शक्य आहे ? याला उत्तर एकच 'you cannot tell till you try' हेंच तें उत्तर होय. भक्तिमार्गावर मनुष्यानं प्रगति केली, तर त्याला व्यवहारांतील अडचणी या केवळ मनानं कल्पिलेला बागुलबोवा होता हें कळून येईल.

(ड) या सर्व साधनेला दोन गोष्टींची जरूर आहे हें इथं स्पष्ट केलं पाहिजे. एक म्हणजे शुद्धबुद्धि. प्रत्येक अंगीकृत कार्यामध्यें मनुष्यानं आपला भाव शुद्ध ठेवणें जरूर आहे, म्हणून दांडेकरीय तत्त्वज्ञानामध्यें बुद्धीच्या कसरतींपेक्षां अंतःकरणाच्या शुद्धतेस अधिक महत्त्व आहे. बुद्धीची नैसर्गिक देणगी लाभली म्हणजे सर्व कांहीं आलं असं नाहीं. नाहींतर बुद्धीच्या कुशाग्रतेबरोबर त्या त्या व्यक्तीची नैतिक पातळीही वाढलेली दिसली असती, अन् हिटलर, मुसोलिनी किंवा गांबेल्स निर्माण झाले नसते. भक्ति ही जर प्रकाश अशी कल्पना केली, तर शुद्धभाव ही प्रकाश देणाऱ्या दिव्याची स्वच्छ काच म्हणतां येईल. दोन्हींची आवश्यकता दिव्याला तितकीच.

भक्तिमार्गावरील साधना फलद्रूप होण्यास प्राचार्य दांडेकर ज्याला Fatalistic म्हणतात अशा विचारसरणीचीही कांहीं आवश्यकता असते. त्यांच्या तत्त्वज्ञानांत

'योगायोग' या कल्पनेस फार महत्त्व आहे. आधुनिक शास्त्रीय परिभाषेत त्यांच्या या मतासच 'Chance Hypothesis' असं दुसरंही नांव देतात. मनुष्यानं 'Do or Die' ही मनोभूमिका ठेवून, शुद्धबुद्धीनं अन् देवावर हवाला ठेवून कोणतीही कृति करावी. पण त्याचे परिणाम मात्र योगायोगानं होणाऱ्या परिणामापेक्षां विशेष निराळे होतील असें समजूं नये. Fatalism चे जे टीकाकार आहेत, त्यांची मुख्यतः चूक होते ती मनुष्याची संस्कारक्षमता लक्ष्यांत न घेतल्यामुळें. प्रत्येक मनुष्यानं जणूं कांहीं या जगांत त्याच्या संस्कारांप्रमाणं एका विवक्षित गाडीचं तिकीट काढलेलं असतं. या गाडीबरोबर त्याला, एकदां आंत बसलं, म्हणजे ठिकाणापर्यंत गेलंच पाहिजे. त्याला स्वातंत्र्य एवढंच त्यानं गाडींत साफ अज्ञानाची पथारी पसरून झोंप काढावी, किंवा जागं राहून, वनश्रीचं कौतुक करावं, किंवा सहप्रवासी लोकांशीं चार क्षण सुखानं घालवावे.

(इ) या सर्व विवेचनावरून कोणी भक्तिमार्ग हा फारच सोपा आहे, अशी कल्पना करून घेईल तर तेंही चुकीचं होईल. भक्तिमार्गानं देवप्राप्ति होणं हें "बोलाचाचि भात" इतकं सोपं नाहीं. कधीं कधीं हा मार्ग असमाधानाचीं वादळं, कष्टाचे डोंगर, व हताशतेचीं अरण्यं यांतूनही जाईल. तरी पण या विकट मार्गावरील कांहीं स्थळं हीं तितकींच रम्य अन् मनोहारी आढळून येतील. नित्यनियमानें ज्ञानेश्वरी, गाथा, भागवत यांचं मनन, दुसऱ्यांना मार्ग दाखविणाऱ्या संतांची संगति, किंवा भजन-तीर्थयात्रा इत्यादि, या विकट मार्गावरील हिरवळीच्या जागा आहेत. कोणी कष्टाच्या कल्पनेनं मार्गे फिरतील, तर कांहीं मध्येंच लागलेल्या हिरवळीच्या जागेवर समाधान मानून पुढच्या पल्ल्यावर निघतील. पण प्रथम तरी प्रत्येकानं भक्तिमार्गाचा आसरा घेऊन, असा चान्स् घेण्याचं कर्तव्य बजावलं पाहिजे, असं त्यांच्या शिकवणीचं माझ्या मतें सार आहे. असा चान्स स्वतः प्राचार्य दांडेकरांनीं आपल्या जीवनांत निस्सीम देवभक्ति, पराकाष्ठेचा स्वार्थत्याग, संसाराविषयीं संपूर्ण उदासीनता यांचा अवलंब करून घेतला, व त्यांत त्यांना किती भरघोस यश मिळालं हें आज सर्व महाराष्ट्राच्या परिचयाचं आहे. प्राचार्य दांडेकरांपासून स्फूर्ति घेऊन, असाच चान्स् आतांपर्यंत— हजारों नव्हे— लक्षावधि भक्तांनीं आणि त्यांच्या शिष्यांनीं घेतला असेल. हे सर्व भक्तिमार्गाचे अनुयायी आज प्राचार्य दांडेकरांना धन्यवाद देत आहेत. उभा महाराष्ट्रही अशी परंपरा निर्माण केल्याबद्दल प्राचार्य दांडेकरांचा गौरव करीत आहे. प्राचार्य दांडेकर यांना संपूर्ण आयुरारोग्य लाभो आणि भक्तिमार्गाचा संदेश देशाच्या कानाकोपऱ्यांतून पोचवण्याचें सामर्थ्य त्यांना मिळो—हीच या प्रसंगीं ईश्वरापाशीं प्रार्थना !

प्रभुजी तुमच्या –

कविः—प्रभाकर खिडवे, साहित्य विशारद (बी. बी. ए.)

प्रभुजी तुमच्या गीतांत रंगुं द्या
आज आमुची वीणा
आणिक तुमच्या चालींत चालुं द्या
अमुचा नवीन तराणा ॥ ध्रु० ॥

इथेंच आतां नका थांबवूं
अमुच्या मार्गी दिंडी
अपार क्षितिजांच्या मर्यादा
थिटया भासतिल पायीं
तीं पदचिन्हें होति अम्हांला
जीवनांत जन्मखुणा ॥ १ ॥

अशीच तुमची ध्वजा असूं द्या
समोर अमुच्या पुढती
शब्दांचें अन् साद उठूं द्या
गभीर या अवकाशीं
आज ना उद्यां धुंडीत तुम्हांला
येईल मूर्ख शहाणा ॥ २ ॥

तुमचीं स्वप्नें जीवित अमुचें
भविष्यांत फुलणारें
तुमचीं वचनें वेद आमुचे
अनंतांत टिकणारें
प्रभुजी तुमच्या कार्यात लाभुं द्या
शांतीचें दान जना ॥ ३ ॥

गुरुवर्य प्राचार्य दांडेकर यांचीं प्रवचनें व कीर्तनें

लेखकः—श्री. स. के. नेऊरगांवकर, सिटी इंजिनिअर, पुणें कार्पोरेशन.

मनुष्य देह ऐसा निध। साधली ते साधे सिद्ध।
करोनि प्रबोध। संत पार उतरले

श्री तुकाराम महाराज

गुरुवर्य दांडेकर हे महाराष्ट्राला दोन रीतींनीं सुपरिचित आहेत. सर परशुराम-भाऊ (पूर्वींचें न्यू पूना) कॉलेजचे प्राध्यापक व प्राचार्य म्हणून त्यांची माहिती महाराष्ट्रांत आहेच; परंतु त्याच्यां कितीतरी पटीनें अधिक अशी त्यांची कीर्ति, ज्याला वारकरी संप्रदाय म्हणतात, त्या पंथाचे एक सुशिक्षित ख्यातनाम पुढारी म्हणून खेडोपाडींसुद्धां पसरलेली आहे. बहुसंख्य समाजांत त्यांचें नांव 'सोनोपंत मामा' म्हणून मोठ्या आदरानें उच्चारलें जातें. ही जी त्यांची कीर्ति सर्वत्र पसरली आहे, त्याला मुख्य कारण म्हणजे महाराष्ट्र व त्याचे बाहेरही त्यांचीं होत असलेलीं प्रकट प्रवचनें व कीर्तनें. आजतर त्यांच्या विद्वत्ताप्रचुर, रसाळ व प्रासादिक वाणीनें सर्वांना वेड लावलें आहे. त्यांच्या गौरवपर जो कॉलेजच्या मासिकाचा अंक निघत आहे, त्यासाठीं त्यांच्या प्रवचनकीर्तनाबद्दल मीं कांहीं लिहावें अशी माझे मित्र प्रा. रानडे यांनीं सूचना केल्यावरून, गेलीं चवदा वर्षें त्यांचीं प्रवचनें व कीर्तनें ऐकण्याचा जो मोठा भाग्यानें सुयोग आला त्यानुसार खालील मजकूर लिहीत आहें. अर्थात् 'आकाश गिवसावे। तरी त्याहूनि थोर होआवे' या न्यायानें, गुरुजींच्या गंभीर व सखोल व्याख्यानाचा परामर्ष माझ्यासारख्या मतिमंद माणसानें घेणें कधींच शक्य होणार नाहीं. परंतु ज्यांनीं त्यांचीं कीर्तनें-प्रवचनें ऐकलीं त्यांना स्मृति-जागृतीचा आनंद द्यावा, व इतरांना त्याबद्दल कांहीं कल्पना द्यावी हाच हेतू या सेवा म्हणून अंगिकारलेल्या कार्यांत आहे. प्राचार्य दांडेकर यांचें प्रवचन, कीर्तनाच्या स्थळकाळासंबंधीं माहिती इतरत्र दिलेली आहे म्हणून त्याच्या स्वरूपाकडे वळूं. प्रथम प्रवचनें व कीर्तनें म्हणजे काय हें सांगून त्यांतील वैशिष्ट्यें काय आहेत हें पाहूं:—

प्रवचनें:—श्रीमद्भगवद्गीतेवर श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं मराठी भाषेंत जी अलौकिक टीका लिहिली आहे ती ज्ञानेश्वरी या नांवानें सुप्रसिद्ध आहे. ज्ञानदेवांनीं जरी आपल्या-

कडून ती आबाल सुबोध करण्याचा प्रयत्न केला, तरी सातशें वर्षांपूर्वीच्या भाषेचा जुनेपणा व मूळच्या अध्यात्म विषयाचें काठिण्य या दृष्टीनें ज्ञानदेवांचें हृद्गत ज्ञानेश्वरी एकट्यानें वाचूं जाणाऱ्यांस समजत नाहीं. त्यासाठीं ते समजावून सांगणारा जाणता मनुष्य लागतो. ज्ञानदेवांनीं ज्या ओव्या लिहिल्या त्याचें स्पष्टीकरण करणें म्हणजे गीतेच्या मूळ श्लोकांतील कोणत्या पदावर ज्ञानदेवांनीं कोणतें व्याख्यान केलें आहे, त्याचें मर्म काय आहे, भगवंताचा गूढ अभिप्राय ज्ञानदेवांनीं कसा प्रगट केला आहे, हें सांगण्याचें कार्य ज्ञानेश्वरी प्रवचनकार करीत असतो. क्वचित् प्रसंगीं प्राचार्य दांडेकर एकनाथी भागवतावरही प्रवचन करतात. परंतु सर्वसाधारणपणें त्यांचीं प्रवचनें ज्ञानेश्वरीवरच असतात. प्रवचनास गीतेंतील एखादा श्लोक घेऊन त्या श्लोकांतील प्रत्येक पदाचा अर्थ समजावून सांगून (ज्यास ते धांवता भावार्थ म्हणतात) नंतर तो श्लोक ज्या अध्यायांत आला आहे, ज्या प्रसंगानें आला आहे, श्लोकाला काय स्थान महत्त्व आहे त्यासंबंधीं स्पष्टीकरण करून, ज्ञानेश्वरमहाराजांनीं जें व्याख्यान केलें आहे त्यांतील कांहीं ओव्या ते यथावकाश सांगतात. श्लोकांप्रमाणेंच ओवीचा प्रथम भावार्थ सांगून त्या ओवींतील शब्दाचें मोल, त्याचप्रमाणें ज्ञानदेवांनीं असें व्याख्यान इतरत्र कोठें व कसें केलें आहे, त्यांतील साम्य काय आहे, याचें स्पष्टीकरण केलें जातें व तें फार विद्वत्ताप्रचुर रीतीचें असतें. उदाहरणार्थ 'जे विषयासी तिळांजळी देऊनि' यावर व्याख्यान करतांना विषय म्हणजे कोणते, त्यांना तिळांजळी देणें म्हणजे काय, तिळांजळी शब्द वापरण्यांत ज्ञानदेवांना काय म्हणायचें आहे, विषयांना तिळांजळी देणें कां जरूर आहे, हा सर्व भाग ते श्रोत्यांच्या मनांत बिंबेल अशा कुशाळपणें हलके हलके सांगतात. अशा रीतीनें एक ओवी संपली कीं, दुसरी ओवी सांगतांना पहिल्या व दुसऱ्या ओवीचा कांहीं संबंध असल्यास (व तो बहुधा असतोच) तो सांगून, ज्ञानदेवांनीं विवरण करतांना दिलेल्या उपमा दृष्टान्त (यांनीं ज्ञानेश्वरी कोंदून भरलेली आहे) याचें मर्म व वैशिष्ट्य, व तीन चार दृष्टान्त असल्यास ते चढते कसे आहेत हें तौलनिक दृष्टीनें सांगणें हें त्यांचें वैशिष्ट्य आहे. व्याख्यान संपण्याचे पूर्वी (बहुधा एक तासांत तें संपतें) आपण सांगितला त्यांतील महत्त्वाचा भाग दोन तीन मिनिटांत पुनः सांगतात.

कीर्तनें:– श्रीज्ञानदेव, श्रीएकनाथ, श्रीनामदेव व श्रीतुकाराममहाराज या महाराष्ट्र वारकरी संतकवींच्या अभंगांपैकीं एखादा अभंग निरूपणास घेऊन कीर्तन करण्याची त्यांची पद्धत आहे. श्रीतुकाराममहाराज यांच्याच अभंगावर बहुतेक कीर्तनें होतात. याचें कारण बहुधा असें असावें कीं, श्रीतुकाराममहाराज यांचे अभंग जितके बहुजनसमाजाच्या तोंडीं बसले आहेत तितके इतर संतांचे नाहींत. ज्ञानदेवांचे अभंग बहुधा मोठे, व कळण्याला अधिक कठिण आहेत. याशिवाय ज्ञानदेवांच्या अभंगांचें स्पष्टीकरण करण्यासाठीं प्रमाणें म्हणून त्यांच्या मागून आलेले नामदेव, तुकाराम यांच्या अभंगाचीं कडवीं देणें गौणच असतें. हेंही

एक कारण असावें. नाथषष्ठीला, नामदेवांच्या व ज्ञानदेवांच्या पुण्यतिथीचे दिवशीं त्या त्या संतांचे अभंग घेतात.

कीर्तनाची पद्धत वारकरीपंथाची, म्हणजे मृदुंग व श्रुति लावून टाळघोषांत निरूपण करणें. 'कृष्ण विष्णु हरि गोविंद। या नामांचे निकट प्रबंध। माजी आत्मचर्चा विशद। उदंड गाती' असें जें ज्ञानदेवांनीं बहुधा पंढरपुरांतील वाळवंटांतील कीर्तनाचें वर्णन केलें आहे तीच पद्धति वारकरी मंडळींनीं चालविली आहे. प्रथम 'रामकृष्ण हरि'चें भजन, नंतर 'रूप पाहता लोचनीं' हा अभंग म्हटल्यावर, ज्या अभंगावर निरूपण करावयाचें तो अभंग म्हणून, त्यावरील व्याख्यानास ते सुरुवात करतात. आजूबाजूला बसलेल्या श्रोत्यांखेरीज ज्यांना 'टाळकरी' म्हणतात अशी पंचवीसापासून दोनशेंपर्यंत मंडळी सभोंवतीं उभीं असतात व विषयाच्या स्पष्टीकरणार्थ म्हणून गाथ्यांतील कडवीं कीर्तनकारांनीं म्हटलीं, की 'टाळकरी' मंडळी ती भजनाच्या चालीवर व टाळ-मृदुंगाच्या निनादांत एकाच वेळी म्हणून मोठा रस निर्माण करतात. याशिवाय मधून मधून नामाचें भजन व मध्याला मूळ अभंगाच्या कडव्याचें सुस्वर चालीवर ह. भ. प. गोपाळराव रिसबूड यांचें गाणें होतें.

कीर्तनाच्या निरूपणाची पद्धत ज्ञानेश्वरींतील व्याख्यानासारखी मुद्देसूद व टापटिपीची असते. ज्या प्रसंगानिमित्त (जन्मतिथि, पुण्यतिथि वगैरे) कीर्तन असतें त्याचें महत्त्व प्रथम सांगून, ज्यांचा तो अभंग आहे त्यांचा अधिकार प्रसंगविशेषीं सांगतात. नंतर कीर्तनाचा अभंग कोणत्या पर (नाम, स्थिति अथवा कीर्तनपर) आहे व तो कोणत्या परिस्थितींत महाराजांनीं केलेला असावा, याचा ते विचार करून काढलेला स्वतःचा तर्क सांगतात. वास्तविक हेंच काम फार बिकट आहे. एका दृष्टीनें विचार केला तर ज्ञानेश्वरी ही गाथ्यापेक्षां सोपी आहे, कारण ज्ञानेश्वरीच्या ओव्यांच्या वर व खालीं गीतेचे श्लोक असल्यामुळें, ज्ञानदेव कशावर व्याख्यान करतात हें थोड्या फार अभ्यासानें कळतें. परंतु तुकाराममहाराजांच्या अभंगांना तसें कांहींच मागें पुढें नसल्यामुळें, महाराजांनीं हे अभंग कोणत्या परिस्थितींत लिहिले हें त्याशीं वक्ता थोडा फार समरस झाल्याशिवाय कळणें अशक्यच आहे. महाराजांच्या संपूर्ण अभंगांतील कडव्यांचा विचार करून, व त्यांच्या तत्सम इतर अभंगांचा ज्यांचा अभ्यास आहे व महाराजांच्याप्रमाणें ज्याचें मन ईश्वरनिष्ठ आहे त्यांनाच हें शक्य आहे. हा प्रासंगिक विचार सांगून अभंगांतील सर्व कडव्यांचा (बहुधा चार असतात) ते भावार्थ सांगतात. हें सांगतांना पहिल्या कडव्यांतून दुसरें, दुसऱ्यांतून तिसरें, तिसऱ्यांतून चवथें कसें निघालें, हें सांगण्याची त्यांची हातवटी अलौकिक आहे. तसें म्हटलें तर तुकाराममहाराजांच्या एकेक कडव्याचा अर्थ सांगणें कांहीं मोठें अवघड काम नाहीं; परंतु त्यांचा एकमेकांशीं काय संबंध आहे हें सांगणें तितकेंच अवघड आहे. हा अन्योन्य संबंध समजल्याशिवाय अभंगाची खरी गोडी समजत नाहीं. उदाहरणार्थ,

'भक्त ऐसे जाणा जे देहीं उदास।' या अभंगांतील तीन कडव्यांत भक्ताचें वर्णन करून, शेवटचें कडवें 'तुका म्हणे सत्य कर्मा व्हावें सहाय। घातलिया.भय नरका जाणें॥' असें आहे. या शेवटच्या कडव्याचा निवळ अर्थ सहज समजण्यासारखा आहे. परंतु वरील तीन कडव्यांतील भक्ताच्या लक्षणांचा व शेवटच्या कडव्यांचा काय संबंध आहे हें खोल अभ्यासाशिवाय समजणें अशक्य आहे. प्राचार्य दांडेकर याची संगत खालीलप्रमाणें लावतात:– 'भक्ताची स्थिति अशी आहे कीं त्याचा सहायक प्रत्यक्ष भगवान् उभा आहे. त्यामुळें तुम्ही त्याच्या परमार्थांत कां आड येतां, तुम्ही त्याला सहाय्य करा, आड आलांत तर नरकाची प्राप्ती होईल.' तुकारामहाराजांच्या अभंगांचा खोल व्यासंग असल्याशिवाय एखादा मराठी भाषेचा प्राध्यापक आहे एवढ्यानेंच त्याला गाथा समजेल असें नाहीं. याप्रमाणें भावार्थ सांगितल्यावर, पुनः ते प्रथम कडव्यांचें मर्म विस्तारानें सांगण्याकरितां त्यावर सामान्य श्रोत्याच्या मनांत उत्पन्न होणारी शंका घेऊन, व त्याचें निरसन करून प्रतिपाद्य विषयाचें महत्त्व समजावून सांगतात. असें समाधान केल्यानें श्रोता निःशंक होतो. 'तरीच जन्मा यावें दास विठ्ठलाचें व्हावें' असा विषय असला तर विठ्ठलाचे दास कां व्हावें? एऱ्हवीं दास होण्यांत कमीपणा आहे, मग विठ्ठलाचे झाले तरी आहेच आहे! विठ्ठल म्हणजे काय? या जन्मांतच दास कां व्हावें? नाहीं झालें तर काय तोटा होईल? वगैरे प्रश्नांचीं समाधानकारक उत्तरें आपणांस या निरूपणांत सांपडतील. महाराजांच्या म्हणण्याला ज्ञानेश्वरींत कसा व कोठें आधार आहे (याला मिळवणी म्हणतात) हें सांगून व शेवटीं 'ज्ञानेश्वरमाउली–तुकाराम' भजन होऊन व नंतर आरती होऊन कीर्तन संपतें. असें कीर्तन बहुधा दोन तास चालतें. पंढरपूर, आळंदी किंवा देहू येथें रसिक श्रोते असतात त्या ठिकाणीं अडीच तासापर्यंत याची मर्यादा वाढते. गुरुवर्यांच्या प्रकृतीला यापेक्षां अधिक वेळ कीर्तन करण्याचा शीण सहन होत नाहीं, म्हणून क्वचित् प्रसंगीं त्यांना एखादा विषय सविस्तर सांगावयाचा असल्यास त्याच अभंगावर दोन दिवस कीर्तन करून तो विषय ते संपवितात. कीर्तन संपण्याचे वेळीं मुख्य मुद्यावर भर देऊन 'शुद्ध आचरणानें रहा व बनेल तितकें भगवंताचें भजन करा' असें श्रोत्यांना कळकळीनें सांगण्यास ते चुकत नाहींत.

गुरुवर्य दांडेकर हे तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक असल्यामुळें पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या मतासंबंधीं उल्लेख, पुणें मुंबईस इंग्रजी शिकलेली कांहीं मंडळी श्रोतृवर्गांत असतांना होतो. असें करतांना पाश्चात्यांतील श्रेष्ठ म्हणून गणले गेलेल्या तत्त्वज्ञानाच्या कितीं तरी पुढें आपले संतकवी गेलेले आहेत, हें श्रोत्यांच्या मनावर बिंबवणें हा एकच उद्देश असतो. अभंगांतील कडव्यांत दृष्टान्त असले कीं ते दृष्टान्त, अथवा वेदान्ताची प्रक्रिया श्रोत्यांना नीट समजावी म्हणून, व्यवहारांतील प्रसंग घेऊन गोष्टी सांगण्याची त्यांची पद्धत आहे. वै विष्णुबुवा जोगमहाराज हे त्यांचे गुरुजी. त्यांच्या मुखांतून त्यांनीं श्रवण केलेले; तसेंच अनेक कीर्तनांत 'आमचे बुवा असें म्हणत किंवा गोष्ट सांगत तो मी

तुम्हांला सांगतों' असें म्हणून जोगमहाराजांनीं सांगितलेली गोष्ट ते मोठ्या उल्हासानें सांगतात. जोगमहाराजांच्याबद्दल त्यांचे ठिकाणीं असलेली नितांत भक्ति श्रोत्यांना वारंवार दिसून येते. या गोष्टी सांगण्यांत श्रोत्यांपैकीं अज्ञ-अशिक्षित लोक असतील त्यांना गूढ विषय समजण्यास मदत व्हावी हाच उद्देश असतो. ज्याला playing to the gallery म्हणतात असे होऊं देत नाहीं. 'सूर्य अंधारालागीं रिघो का भलतिये सुरंगी' या ओवीवर, सूर्यउपासक व सूर्याची भेट खंडाळ्याच्या घाटांत झाली ही गोष्ट; किंवा 'या देहाची हे दशा। आणि आत्मा तो येथ ऐसा' यावर गादी घेऊन जाणारा व घोड्यावर बसणारा प्रवासी ही गोष्ट; अथवा 'ते अज्ञान ज्ञानीं निमालिया। ज्ञाने कीर्तिमुखत्व केलियां' या ओवीवर काळ्या व पांढऱ्या घारींची गोष्ट; किंवा 'जयाचिये द्वारीं सोन्याचा पिंपळ' यांत सोनें म्हणजे सुख हें सांगताना 'म्हातारी मेली तिचें सोनें झालें' याबद्दलची गोष्ट, अशा गोष्टी श्रोत्यांचे आठवणींत आहेत. शहरी कॉलेज विद्यार्थ्यांना प्रथम प्रथम गोष्टी ऐकतांना चमत्कारिक वाटतें, परंतु त्याचा अभंग किंवा ओवीशीं संबंध कसा आहे हें कळल्यावर त्यांचें समाधान होतें. पुष्कळ वेळां ते दृष्टान्त अगोदर समजावून देऊन, मग दार्ष्टान्त सांगतात व तो त्यामुळें चटकन् समजतो. दांभिक व ढोंगी लोकांवर त्यांचे कीर्तनांत टीका केली जाते. मठ, शिष्य, शिष्यिणी करणाऱ्या भोंदु बुवांची चांगलीच हजेरी कीर्तनांत घेतली जाते. पैसेवाले व इस्टेटी करणारे घमेंडनंदन लब्धप्रतिष्ठित यांचेबद्दल त्यांना तिटकारा आहे.

त्यांच्या कीर्तनांत दिसून येणारा विनोद हा त्यांच्या विद्वत्तेला शोभेल अशा उच्च पातळीवर केलेला असतो. कै. शिवरामपंत परांजपे छापाचीं वाक्येंही कधीं कधीं दिसतात. हिटलर बरोबर चर्चिल यांना असुरी संपत्तीचे म्हणण्यास ते कमी करीत नाहींत. जग जिंकणारा नेपोलियन जोसेफाइनपुढें लाळ घोटत होता, असें म्हणून विषयी लोकांतच त्याची गणना केली जाते. उलट स्वार्थत्यागी व गीताप्रेमी असे आपले पुढारी लो. टिळक, म. गांधी, सेनापति बापट यांचा ते आदरानें कीर्तनांत उल्लेख करतात. अश्लील शब्द तर त्यांचे व्याख्यानांत औषधालाही सांपडणार नाहीं. एखादा शृंगारिक शब्द अथवा वाक्य मुळांत असलें तर 'अर्थ स्पष्ट' म्हणून सफाईनें त्यावरून पुढें सरकतात.

कीर्तन अथवा प्रवचन करतांना आपल्यापुढें बसलेला श्रोतृवर्ग कोणत्या प्रकारचा आहे हें पाहून, त्याप्रमाणें कीर्तनास अभंग घेऊन निरूपण करण्याची ते काळजी घेतात. एऱ्हवीं कीर्तनाला न जाणारे, पण वार्षिक गणपति-उत्सवाचे करमणुकीचे कार्यक्रमांत कीर्तन काय आहे म्हणून ऐकण्यास श्रोते आले कीं, गीतेंतील 'एतान्यपि तु कर्माणि' किंवा 'पत्रं पुष्पं फलं तोयं' हे श्लोक अथवा 'हेचि थोर भक्ति आवडते देवा' असे अभंग घेऊन खरी भक्ति म्हणजे काय याकडे श्रोत्यांचें लक्ष

ते वेधतात. अशा वेळीं उपनिषदें वगैरेंतील प्रमाणें ते कधींही सांगणार नाहींत. वर्णाश्रमधर्माचा दिवसेंदिवस अवमान होत आहे; देवपूजा, अतिथिपूजा, परोपकार यांचा अभाव याकडे श्रोत्याचें लक्ष वेधणें हा त्यांचा हेतु असतो. कामनिक भावनेनें देवाची भक्ति करणारे म्हणजे संसारांत देवाला राबवणारे, व सत्यनारायणाची पूजा मोठ्या भपक्यानें करणारे यांचे दोष ते वारंवार कीर्तनांत सांगतात. समाजांतील व्यंगें नाहींशीं व्हावीं, लोक सामर्थ्यवान्, देवावर खरी श्रद्धा ठेवणारे व्हावेत, या हेतूनें समाजांतील दोषांचें आविष्करण मोठ्या खुबीनें त्यांचें निरूपणांत केलें जातें. ही टीका सर्वसाधारण वर्ग डोळ्यापुढें ठेवून केलेली असते, विशिष्ट व्यक्तीला उद्देशून कधींच नसते.

कीर्तन–प्रवचनांत निरूपणास घेतलेले विषय प्रसंगानुरूप संतवर्णनपर, कीर्तन, नाम, पंढरीमाहात्म्य, किंवा अद्वैत वेदान्तपर असे असतात. परंतु भर कर्मापेक्षां ज्ञानावरच असतो. अंधळ्या रीतीनें केलेली उपासना अथवा कर्म मुक्तामाला पोच-विण्याऐवजी घातालाच कारण होतें. अंधळ्याला गरुडाचे जरी पंख प्राप्त झाले तरी त्यांत त्याचा घातच आहे, तसें ज्ञानाशिवाय सत्कर्म निरर्थक होत. जांवईबुवांनीं मेजावर शाई सांडली, परंतु सासऱ्यास वाटलें आपल्या मुलानें सांडली, म्हणून मुलाला रागें भरणारा सासरा खरी गोष्ट कळल्यावर कसा खजिल होतो, ही गोष्ट सांगून ज्ञान बदललें कीं क्रिया बदलते असा सिद्धान्त सांगतात. त्यांच्या कीर्तनांत भक्ति अथवा कर्म यांचें निरूपण ज्ञानाच्या भूमिकेवरूनच केलेलें असतें; पण तें ज्ञानाचें बोलणें रूक्ष नसतें, तर रसाळपणें केलेलें असतें. ज्ञानाला महत्त्व देण्याचें कारण, प्राचार्य दांडेकरांचे अंगीं अद्वैत वेदान्त पूर्णपणें बाणला आहे. त्यांना कधीं दुःखी, कधीं डोक्याला हात लावून बसलेले, त्यांच्या तोंडून हळहळीचे अथवा निराशेचे उद्गार निघाले आहेत असें, कधींच कोणीं पाहिलेलें नाहीं. गुलाबाच्या फुलाप्रमाणें ते सदा प्रसन्न आनंदी असतात. सर्वदा नित्यतृप्त व अंतःकरणभरित अशी जीवाच्या मूळच्या अवस्थेची त्यांच्या ठिकाणीं सदा जागृति असते. त्यामुळें आपणांस ज्या साधनद्वारां हा आनंद प्राप्त झाला त्या साधनावरच ते भर देत राहणार. याचा अर्थ ते भक्तीला गौण स्थान देतात असें नव्हे, तर त्या भक्तीला ज्ञानाची बैठक पाहिजे एव-ढाच अर्थ आहे. प्रवचनांतही 'निर्मानमोहा जितसंगदोषाः' 'ईश्वरः सर्वभूतानाम्' 'महात्मानस्तु मां पार्थ' हे श्लोक त्यांचे विशेष आवडते आहेत. ते स्वतः पूर्ण वैराग्य-संपन्न असल्यामुळें निरूपणांत वैराग्यावरच जोर दिलेला असतो. बायकामुलें, घरदार, पैसा याबद्दल लोकांची स्नेह व आसक्ति कशी कमी होईल अशाच तऱ्हेचें त्यांचें विवेचन असतें. संसारांतील गोष्टी रंगवून आधींच असलेला संसाराचा रंग श्रोत्यांच्या मनांवर उठविणाऱ्या आधुनिक हरिदासांच्या हातवटीचा गंधही त्यांचे कीर्तनांत शोध-णें शक्य नाहीं. याचे उलट बायको मेली, पोर मेलें, असे शब्द, किंवा 'फुटो येईल

अंतकाळीं । प्राणप्रयाणाचे वेळीं । राहती निराळी । रांडा पोरें सकळ ।' अशीं वाक्यें त्यांच्या व्याख्यानांत ऐकावयास मिळतात, त्यामुळें संसारांत गुरफटलेल्या श्रोत्याला अस्वस्थता प्राप्त होते, पण जी खरी गोष्ट आहे ती सांगितलीच पाहिजे.

अशा प्रकारें त्यांच्या कीर्तनप्रवचनाची घाटणी आहे. इतर प्रवचन-कीर्तनकारांच्या (त्यांना मी कमी लेखतों असें नाहीं) व गुरुवर्यांच्या कीर्तनांत एक मोठा फरक आहे व तो म्हणजे प्राचार्य हे कॉलेजांत विद्यार्थ्यांना अनेक वर्षें शिकवत असल्यामुळें आपला विषय मुद्देसूद, ठाकठीकपणें, योग्य अवकाशांत संपविण्याची कला त्यांना साध्य झालेली आहे. त्याशिवाय मठ्ठ विद्यार्थ्यापासून स्कॉलर विद्यार्थ्यापर्यंत उपयोगी पडेल, अशा रीतीनें व्याख्यानाची मांडणी करण्याचें अवघड कामही त्यांना अवगत असल्यामुळें त्यांचें कीर्तनही आबाल सुबोध तसेंच तज्ज्ञ मंडळींना प्रसन्नता देणारे असतें. याशिवाय त्यांची शब्दयोजना मोजकी व मार्मिक असते; ज्ञानदेवांनीं म्हटल्याप्रमाणें 'तुकोनी घेतली मोतिये जैसी' याप्रमाणें. प्रमाण म्हणून संस्कृतांतील किंवा प्राकृतांतील ओवी अथवा अभंग घेतले तर ते अगदीं लागू पुरतेच. 'जैसी नाव स्त्रिया बाळां । तोयतरणी' एवढाच उत्तरार्ध घेतील, पूर्वार्धाचा संबंध नसल्यास तो घेणार नाहींत. विषय शक्य तितका सरळ सुबोध व श्रोत्यांच्या गळीं उतरेल, अशा तऱ्हेनें हळुवारपणानें मांडणी ठेवून ऐकणाराची उत्कंठा वाढती ठेवून व्याख्यान संपवतील, कधीं कंटाळवाणें होणार नाहीं. श्रोत्याची नाडी त्यांचे नेहमीं ताब्यांत असते 'ज्ञानाचें बोलणें । आणि येणे रसाळपणे । आता पुरे कोण म्हणे । आकर्णितां ॥' असेंच श्रोत्यांना वाटावें. उपक्रम, भावार्थ, व्याख्यान, उपसंहार हीं सर्व रेखीव व आटोपशीर व्याख्यानाचीं निरनिराळीं अंगें एकमेकाशीं चिकटवलीं तर एक सुंदर प्रमाणबद्ध मूर्ति डोळ्यापुढें उभी राहते.

प्राचार्यांच्या कीर्तनांत, ऐकणाराला संसारांतील अज्ञानजन्य मोह व स्नेह यापासून दूर करून शाश्वत गोष्टीकडे नेण्याचें, व श्रोत्यांच्या चित्तावर श्रीहरीची मूर्ति ठसविण्याचें मुख्य कार्य करावयाचें असतें. ज्यांच्या वाङ्मयावर व्याख्यान करावयाचें त्या ज्ञानदेवाचें अथवा श्रीतुकाराममहाराजांचें म्हणणें काय, हें वक्त्याला चांगलें समजलें तरच तो श्रोत्यांना तें नीट समजावूं शकेल. एकदां असेंच बोलणें निघालें असतां प्राचार्य म्हणाले 'नवीन अभंगावर कीर्तन करण्यापूर्वी त्याचा विचार दोन दोन वर्षेंपर्यंत माझ्या डोक्यांत घोळत असतो. त्याचा नीट विचार समाधानपूर्वक झाला म्हणजेच मग मी तो कीर्तनाला घेतों, व प्रत्यक्ष त्यावर कीर्तनें करतांना पुढें आणखी विचार सुचतात'. म्हणून त्यांचीं सर्व प्रवचनें व कीर्तनें हीं एका धाग्यांत ओवलेली सुविचारांची माळ आहे. त्यांच्या व्याख्यानाचें टिपण केलें तर तो एक उत्कृष्ट निबंध तयार होतो.

येथपर्यंत प्राचार्यांच्या कीर्तनांतील वैशिष्ट्याचा विचार झाला. त्यांचीं कीर्तनें

व प्रवचनें तर उत्तमच आहेत; परंतु आचार्यांच्या मध्यें विशेष कांहीं असेल तर त्यांच्या पाठीमागें एक मोठी लोकांची आदराची भावना आहे; आपण जें कीर्तन ऐकत आहोंत ते एका साधु पुरुषाच्या मुखांतून ऐकत आहोंत, ही ती भावना. 'शुक मुखे करावें श्रवण' असें वचन आहे, व शुकासारखें कडकडीत ब्रह्मचर्य आचार्यांच्या ठिकाणीं वसत आहे. विद्वत्ता, विवेक, वैराग्य, परोपकार, अमानित्व, अदंभित्व, शौच, तप, स्वाध्याय, ईश्वरानुसंधान अशा अनेक दैवी संपत्तीच्या गुणांचा त्यांचे ठिकाणीं मिलाफ झाला आहे. त्यांचेकडे पाहिलें म्हणजे 'कीं गुणकुसुमांची माळा। हे घेऊनि मुक्ति वाळा। वैराग्य निरपेक्षाचा गळा। गिंवसित असे।' या ज्ञानदेवांच्या ओंवीची आठवण होते. या त्यांच्या गुणांचें वर्णन करूं गेल्यास लेखाची मर्यादा ओलांडल्यासारखें होईल. त्यांच्या मुखांतून पडणारीं वाक्यें अनुभवजन्य आहेत. तीं नुसतीं तत्त्वज्ञान विषयावरील दिलेलीं व्याख्यानें नाहींत. ज्ञानेश्वरी व गाथा यांतील तत्त्वें त्यांनीं बुद्धिसामर्थ्यावर समजावून घेतलीं असलीं तरी त्यांतील प्रमेयें 'करिती प्रतिती गम्य। आइकोनी जे' यांत म्हणल्याप्रमाण, स्वतःच्या अनुभवाच्या कसावर घासून घेतलीं आहेत. 'अनुभवे आले अंगा' व नंतरच ते या जगा देतात. आत्मप्रचीति हा तर त्यांच्या व्याख्यानांतील मुख्य खांब आहे. इतके गुण जरी अंगीं असले तरी, ते व्याख्यानांत स्वत: कधीं त्यांचा अहंतेनें उच्चार करणार नाहींत. फार काय, त्यांच्या प्रवचनकीर्तनाची सूचना वर्तमानपत्रांत दिली तर ती त्यांना आवडत नाहीं. कीर्तनांतही, मला साक्षात्कार झाला, असे उद्गार आढळणार नाहींत.

भावनेचा फाजील आविष्कारही त्यांचे कीर्तनांत दिसणार नाहीं. कीर्तनाच्या सुरुवातीस अर्धा मिनिट भगवंताचें ध्यान करतील तेवढेच; याचा अर्थ त्यांचे ठिकाणीं भावनाच नाहीं असें मात्र नाहीं. भावना नसती तर आज त्यांच्या व्याख्यानाची जी पकड श्रोत्यांवर बसली आहे ती तशी बसतीना. फक्त ही भावना बुद्धीच्या ताब्यांत आहे म्हणून ती मर्यादेबाहेर जात नाहीं. त्यांच्यांतील भावनेचा आविष्कार फार सूक्ष्म आहे, 'तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ' या गीतेंतील १६ व्या अध्यायांतील शेवटच्या श्लोकावरील ज्ञानदेवांच्या ओंवीवर निरूपण करतांना, ज्ञानदेवांचा तत्कालिक वैदिकांनीं केलेला छळ व त्याचें पर्यवसान, त्यांच्या वडील व मातोश्री यांना घ्यावयास लागलेल्या देहान्त प्रायश्चित्तांत कसें झालें, हा प्रसंग सांगून, इतका छळ झाला असतांनाहि ज्ञानदेवांनीं वेदाबद्दल यत्किंचितही अनादर न दर्शवितां, 'नाहीं श्रुति परौति। माउली जगा' असे नितांत आदराचे उद्गार काढले आहेत—हा ज्ञानदेवांचा मोठेपणा वर्णन करतांना आचार्यांच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिलेले श्रोत्यांनीं पाहिले आहेत. लढाईचे वेळीं रेशनिंगच्या सबबीवर सरकारनें पंढरपुरास जाणारी पालखीच बंद केली, या गोष्टीचा समाचार आचार्यांनीं कीर्तनांत घेऊन, 'आज शेंकडों वर्षे आमचे वारकरी पंढरपूरला जातात, ते कांहीं मुंबई सरकारला विचारून त्यांच्या परवानगीनें जात नाहींत, त्यांना मदत करण्यास त्यांचे ज्ञानेश्वर माउली, तुकाराम समर्थ

आहेत; वारकऱ्यांना सरकारी मदतीची अपेक्षा नाहीं. मेहरबानीच करावयाची असली तर फक्त अडथळा करूं नका.' असे भावनापूर्ण उद्गार काढलेले पुष्कळांना स्मरत असतील. श्रीतुकोबारायांचा अधिकार वर्णन करतांना उच्च स्वरानें 'तुकिता तुळणेसी। ब्रह्म तुकासी आले। म्हणोनी रामेश्वरें चरणीं मस्तक ठेविलें।' ही त्यांची आवडती आरती म्हणतांना ते किती भावनेनें व्यापले असतात तें अनेकवेळां दिसून येतें.

असें हें कीर्तनप्रवचनाचें कार्य आज जवळजवळ तीन तपें चाललें आहे. हें कार्य ते स्वतःच्या आनंदाकरितां केवळ भगवंतप्रेमानें करीत आहेत. कीर्तनावर त्यांनीं कधीं दिडकीहि घेतली नाहीं. पैशाचे अनेक मोहाचे प्रसंग संस्थानिकांसारख्या-कडे गेले असतांना आले, परंतु 'काय दिला ठेवा। आम्हां विठ्ठलचि व्हावा' असें म्हणून, तसेच ते नजराणे परत केले. संस्थानिक, श्रीमंत लोक यांच्याकडे तें कीर्तन करतात. परंतु त्यांच्यांत भक्तीचा ओलावा असेल तरच हें त्यांचें भक्तिप्रेम वाढावें व त्याबरोबर त्यांच्या गांवांतील लोकांचेंही कार्य व्हावें, अशी दृष्टि ठेवूनच तें अशा ठिकाणीं 'पद्मपत्रमिवांभसा' असें वागतात. सामान्यतः कीर्तनकार म्हणजे तो कीर्तन करीत असतांनाच पाहावा. मागाहून त्याचे आचरणाकडे पाहण्याची सोय नाहीं असें असतें. नाहींतर 'पुराणांतील वांगीं पुराणांत' ही म्हण पडतीच ना. गुरुवर्यांचें आचरण 'जसें सांगतील तसें वागतील' असेंच आहे. निरूपणाला आचरणाची जोड असल्यामुळें सोन्यालाच जणु काय सुगंध प्राप्त झाला आहे. त्यांची वागणूक चोवीस तास उघडी आहे. त्यांचा दरवाजा सदांच उघडा आहे. भोंदुगिरीला जागाच नाहीं. बुवा ध्यानस्थ बसून जपजाप्य स्थितींत बसले असें कधींच नाहीं. प्राचार्यांना या बाह्य खटपटीची जरूरीच नाहीं, कारण अनेकजन्मसंसिद्ध अशी निर्लोभ, निर्विषय, द्वंद्वरहित अशी प्रकृति त्यांना लाभली आहे.

अनेक व्यापांमुळें त्यांना विश्रांति अशी मिळतच नाहीं. लोक त्यांना एकटे बसूंच देत नाहींत. संध्येनंतर ते कांहीं वेळ निवांत बसतात, व त्यावेळीं त्यांना उत्तमोत्तम विचार सुचतात असें ते सांगतात. कीर्तन करण्याचे अगोदर अर्धा एक तास विश्रांति घेऊन थोडी डुकली घेतली तर त्यांचें पुढील कीर्तन चांगलें तयार होतें असा त्यांचा अनुभव आहे. कीर्तनकार म्हणजे ब्रह्मांत विलीन झालेला (!) गबाळा, अशी कल्पना! याचे उलट स्वच्छ व नीटनेटका शुभ्र पोशाख केलेले, वागण्यांत वक्तशीर—इंग्रज जरी आपले शत्रु असले तरी त्यांचे गुण आपण घेतलेच पाहिजेत असें त्यांचें सर्वदा म्हणणें असतें—कीर्तन वगैरे कार्यक्रमांत ठरलेल्या वेळेचे आधीं पांच मिनिटें बिनचूक हजर, असे प्राचार्य दांडेकर आहेत.

साधुपुरुषाचें वर्णन कोठवर करावें? सहस्रावधि जीवांचें कार्य त्यांनीं केलें आहे—ज्ञानदेवांनीं म्हटल्याप्रमाणें 'फेडित पाप ताप। पोखीत तीरींचे पादप। समुद्रा जाय आप। गंगेचे जैसें॥' तसे. प्राचार्यांची ईश्वरसेवा चालू असतां 'कष्टले संसार शिणे' अशा माझ्यासारख्या असंख्य जीवांना 'विश्रांति' व सुख मिळत आहे, त्या सुखाचें वर्णन करण्यास लेखणी असमर्थ आहे. गुरुजींची सेवा म्हणून जें कांहीं लिहिलें त्यांत त्यांचें कृतज्ञतापूर्वक स्मरण करावें, व 'जन्मोजन्मीं द्यावी तुमची चरणसेवा' असें मागणें मागावें हाच एक हेतु आहे.

सौहार्दमूर्ति सोनोपंत

(लेखक— प्रो. दे. द. वाडेकर, फर्ग्युसन कॉलेज)

'परशुरामियन'च्या दांडेकर-विशेषांकासाठीं मला लेख लिहावयास निमंत्रण दिल्याबद्दल मी संपादकांचा कृतज्ञ आहें. कारण या प्रसंगानें प्राचार्य सोनोपंत दांडेकरांबद्दल माझ्या मनांत दीर्घ काळ वसत असलेला आदर व्यक्त करण्याची मला संधि मिळाली.

दांडेकरांचें नांव मीं प्रथम ऐकिलें तें मी १९२१–२२ सालीं बी. ए. च्या वर्गांत विद्यार्थी असतांना. त्यावेळीं ते, त्यावेळीं 'न्यू पूना कॉलेज' हें नांव असलेल्या स. प. कॉलेजमध्यें तत्त्वज्ञानाचें अध्यापन नुकतेच करूं लागले होते. मी त्या कॉलेजांत नव्हतों, फर्ग्युसनमध्यें होतों. पण त्याही वेळीं समकालीन विद्यार्थ्यांकडून त्यांच्या परिश्रमशील व उपयुक्त अध्यापनाची त्यांची कीर्ति आम्हां इतर कॉलेजांतील विद्यार्थ्यांच्या कानावर आली होती. न्यू पूना कॉलेज त्यावेळीं अजूनही नवीनच होतें. परंतु त्याच्या अध्यापकवर्गांत आपल्या बुद्धिबलानें व चारित्र्यसंपन्न—तेनें चमकणाऱ्या अनेक व्यक्ती होत्या, व त्यांतच दांडेकरांचा अन्तर्भाव झाला होता. विशेषतः ध्येयवादी, शिक्षण कार्यासाठीं नैष्ठिक ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा केलेली मंडळी न्यू पूना कॉलेजच्या अध्यापकवर्गांत त्यावेळीं अनेक होती, व त्यामुळें न्यू पूना कॉलेजच्या भोंवतीं एक प्रकारचें तेजोवलय निर्माण झालें होतें. या तेजस्वितेंत दांडे-करांचा कर्तृत्वभाग होताच हें वेगळें सांगावयास नको च.

माझा स्वतःचा दांडेकरांशीं जो प्रत्यक्ष परिचय झाला तो १९२७–२८ सालीं. त्यावेळीं मी माझ्या अध्यापन व्यवसायास नुकताच प्रारंभ केला होता, व त्यांत स्थैर्य लाभावें या हेतूनें, त्यापूर्वी अमळनेरास तत्त्वज्ञान मंदिरांत संशोधक म्हणून काम करीत असतांना लिहिलेला, माझा गीतेवरील निबंध प्रसिद्ध करूं इच्छित होतों. परंतु हें पुस्तक प्रसिद्ध करितांना मन थोडें कचरत होतें. असें वाटे कीं अपक्व वयांत पुस्तक प्रसिद्ध करणें हें चापल्य तर होणार नाहींना? म्हणून एखाद्या जाणत्याकडून पुस्तकाचा पुरस्कार होत असेल तर पहावा, अशा विचारानें मी माझा निबंध एक दोन तत्त्वाभ्यासी महाभागांच्या नजरेखालून घालण्याचा प्रयत्न केला. परंतु दीडशें पानांचें छोटेसें हस्तलिखित सहा सहा महिने जवळ ठेवूनही त्यांना त्याचें अवलोकन करणेंही शक्य झालें नाहीं! तेव्हां दांडेकरांची कीर्ति कानावर असल्यानें मी

त्यांच्याकडे धांव घेतली, व त्यांस, निबंधाचें हस्तलिखित वाचून योग्य वाटल्यास त्यास पुरस्कार लिहिण्याची विनंती केली. त्या वेळीं मी कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्यें अध्यापक होतों. सुमारें ८।१५ दिवसांच्या आंतच त्यांनीं आपली पुरस्कारक प्रस्तावना मला पाठविली; व तींतील विवेचक, पण उत्तेजनकारक, समीक्षण वाचूनच मीं माझा निबंधप्रसिद्धीचा विचार कायम केला, व लवकरच माझा निबंध प्रसिद्धही झाला. दांडेकरांचा मी विद्यार्थी नव्हतों, व त्यांची इतर रीतींनींहि माझी ओळख नव्हती. तरीसुद्धां केवळ सौजन्यानें एक तरुण तत्त्वाभ्यासी म्हणून त्यांनीं मला माझ्या कार्यात उत्तेजन दिलें व मला उपकृत केलें. अशा तऱ्हेचें त्यांचें सौहार्द मेला त्यांच्या झालेल्या पहिल्याच परिचयांत प्रत्यक्षांत आलें, व त्यानंतर त्यांचा माझा परिचय जो उत्तरोत्तर वाढत गेला, त्यांत तोच माझ्या मनावरील त्यांच्या सौहार्दाचा संस्कार कायम राहिला आहे.

या पहिल्या परिचयानंतर समान व्यवसायामुळें व पुढें मी पुण्यांतच फर्ग्युसन कॉलेजांत अध्यापनास आल्यामुळें, दांडेकरांशीं माझा अनेक वेळां अनेक रीतींनीं निकटचा संबंध आला आहे. त्याची समग्र हकिकत येथें देण्याचें कारण नाहीं. परंतु मुंबई व पुणें विद्यापीठांत त्यांचेबरोबर कार्य करण्याचे जे अनेक प्रसंग मला आले, त्याचा मात्र येथें सामान्य उल्लेख करीत आहें. विद्यापीठांतील कार्यात दांडेकर त्यांस नेमून दिलेलें कार्य निरलस व आस्थापूर्वक करीत असत. असें कांहीं प्रसंग आलेले आहेत कीं, त्या वेळीं कांहीं किचकट काम करावयास पुढें कोणीही व्हावयाचा नाहीं; अशा वेळीं दांडेकर, जे एरवी इतर कामांमुळें व्यग्र असल्यानें अधिक काम अंगावर घेण्यास आपणहून पुढें येत नसत, आपणहून पुढें यावयाचे व तें काम अंगावर घ्यावयाचे; व तें करावयास साहाय्य करण्यासाठीं मजसारख्या कनिष्ठ सहकाऱ्यांस बोलवावयाचे. अशा वेळीं त्यांजबरोबर काम करणें फार आनंद-दायक होई. त्या कामाची सर्व व्यवस्थापकीय जबाबदारी ते स्वतः स्वीकारावयाचे, साहाय्यकांनीं फक्त वेळेवर हजर राहून त्यांच्या देखरेखीखालीं त्यांच्या मार्ग-दर्शनाप्रमाणें काम करण्यास तयार असलें म्हणजे झालें. असें काम त्यांचे हाताखालीं मीं अनेक वेळां केलें आहे.

दांडेकरांस पोकळ वक्तृत्वबाजी करावयाचा मनापासून कंटाळा आहे. विद्या-पीठाच्या सभांतून आवश्यकतेशिवाय ते सहसा बोलावयाचे नाहींत. पण आवश्यक झालेंच तर ते खणखणीत, प्रसंगीं कटुही, बोलूं शकतात असा मला अनुभव आहे. विद्यापीठांतील जीवनांत होतकरू कार्यकर्त्यांस आपणहून आणि स्वार्थनिरपेक्ष प्रोत्साहन द्यावयाचें हें त्यांचें आचारसूत्र आहे. असे अनेक प्रसंग घडले आहेत कीं विद्यापीठीय निवडणुकांत त्यांनीं स्वतःचें ज्येष्ठत्व व उच्च पदाधिकारित्व विसरून इतर होतकरू कनिष्ठ कार्यकर्त्यांस वाट मोकळी करून दिली आहे. मला स्वतःला यां त्यांच्या आत्मलोपी मोठेपणाचा प्रत्यक्ष अनुभव अनेकदां आलेला आहे. एकदां

तर असा प्रसंग घडला कीं, मी मुंबई विद्यापीठांतील एका उच्च अधिकारी मंडळाचा सभासद असतांना माझी त्याबाबत फेरनिवडणूक होती; व त्या निवडणुकीच्या वेळीं दांडेकरांसच, त्यांनीं स्वतः उमेद्वार म्हणून उभें राहण्यास गळ घालण्यांत येत होती. त्यांनीं निवडणुकीस उभें राहण्याचें ठरविलें असतें, तर ते माझे निवडणुकींतील प्रतिस्पर्धी होणार होते. निवडणुकींत त्यांनीं उभें राहण्यांत गैर कांहींच नव्हतें; उलट, त्यांनीं तसें उभें राहणें हें, त्यांचें व्यवसायांतील ज्येष्ठत्व, एका महाविद्यालयाचें प्रमुखत्व, इत्यादि त्यांच्या उपाधींमुळें, योग्य ठरण्यास कांहींच प्रत्यवाय नव्हता. असें असतांनाही त्यांनीं त्यांस निवडणुकीस उभे राहण्याचा सल्ला देणाऱ्या सहकाऱ्यांस असें सांगितलें कीं, "वाडेकर पूर्वीपासून त्या मंडळांत लक्ष घालून उपयुक्त काम करीत आहेत. ते माझेच आहेत, व त्यांचें काम तें माझेंच काम असें मी समजतों. तेव्हां या निवडणुकीस मी उभा राहूं इच्छीत नाहीं!" पुढें मी त्या फेरनिवडणुकींत निवडून आलों; पण त्या निवडणुकीच्या वेळीं दांडेकरांच्याभोंवतीं असा प्रकार चालू होता हें मला माहित नव्हतें! पुढें एका प्रसंगानें दांडेकरांची माझी औंधांत पंतांच्या एका उत्सवांत एकान्तीं गांठ पडली असतां दांडेकरांनींच मला ही हकिकत सांगितली! दांडेकरांनीं निवडणुकीस उभें राहण्याचें ठरविलें असतें, तर ते प्रत्येक बाबतींत मला ज्येष्ठ असल्यानें माझी निवडणुकींतील उमेद्वारी चालू ठेवणें मला कठिण झालें असतें. पण मला दांडेकरांनीं यांतलें कांहींच माहित होऊं दिलें नाहीं; व निवडणुकीनंतर इतिहास सांगितला! हें त्यांचें माझ्याबद्दलचें केवढें आत्मीयत्व, हा केवढा स्वार्थत्याग, हें केवढें सौहार्द!!

असे दांडेकरांचे अनेक अनुभव आले आहेत! मीं या लेखांत केवळ एक दोन अनुभव लिहिले आहेत. पण असे अनेकांचे अनेक अनुभव आहेत. आणि त्या सर्वांतून दांडेकरांचें सौहार्द थबथबत असतें. तेव्हां दांडेकरांस 'सौहार्दमूर्ति सोनोपंत' अशी पदवी आमच्यासारख्या त्यांच्या शिष्यप्राय चाहत्यांनीं कां देऊं नये? या त्यांच्या सेवानिवृत्तीच्या प्रसंगीं परमेश्वरानें त्यांना दीर्घायुरारोग्य द्यावें व त्यांच्या सौजन्याचा प्रकाश या भारतभूमीवर अधिकाधिक पसरत जावो अशी प्रार्थना करतों.

प्राचार्य दाण्डेकर

(प्रा. नारायण पांडुरंग गुणे, प्रताप कॉलेज, अमळनेर)



मूर्ती गौर स्मितप्रफुल्ल मुख अन् डोळेहि तेजस्वि ते
शिष्यांशीं मधु बोलणें, प्रवचनीं गांभीर्य ज्ञानीपणं ।
सर्वांशीं शिशुच्या विशुद्ध हृदयें तें बोलणें चालणें
निःस्वार्थी. रचनाप्रवीण गुरु हा ज्यां लाभला धन्य ते ॥



सोन्याचा पिंपळ

लेखकः—यशवंत गोपाळ जोशी

सुमारें दहाबारा वर्षांपूर्वींची गोष्ट आहे. माझ्या वादविवेचन-मालेंतील "ईश्वरवाद" हें पुस्तक लिहिता का, म्हणून विचारण्याकरितां मी पहिल्यांदा सोनोपंत दांडेकरांच्या घरीं गेलों. तीच त्यांची माझी पहिली भेट. तोंपर्यंत मी त्यांचें नांव ऐकत होतों. पुष्कळ नांवें आपण ऐकत असतो. त्यामुळें त्या व्यक्तीबद्दल त्याच्या प्रत्यक्ष भेटीशिवायहि आपले कांहीं ग्रह निर्माण होतात. पुढें योगायोगानें किंवा प्रसंगानें त्या व्यक्तीची आणि आपली भेट होते. कित्येक वेळीं भेटींत आपलें पूर्वग्रह चकींचे ठरतात; क्वचित् बरोबर जमतात. सोनोपंत दांडेकर या नांवाभोंवतीं जें वलय आहे त्या अनुरोधानेंच माझ्या त्यांच्याबद्दलच्या कल्पना होत्या, आणि आजतागायत त्याच कल्पना सुखरूप आहेत—नव्हे वाढीस लागल्या आहेत !

त्यानंतर एक दिवस सोनोपंत दांडेकर माझ्याकडे सहज आले होते. बोलण्याच्या ओघांत मीं त्यांना सहज म्हटलें, "माझी आई आतां वृद्ध झाली आहे. आपले कीर्तन ऐकण्याचा तिला अद्याप योग आला नाहीं—पण आपलें कीर्तन ऐकण्याची तिची इच्छा आहे—तेव्हां आपलें कीर्तन जर जवळपास कुठें ठरलें—" सोनोपंत दांडेकर हंसत म्हणाले, "मग त्याकरितां येवढी यातायात कशाला, सवडीनें आपल्या घरींच येऊन कीर्तन करीन !" कोणीही एखादी गोष्ट झटकन् कबूल केली, कीं पुष्कळ वेळेला व्यवहारांत तो नकारच ठरतो. विषय झटकन् 'डावलण्यासाठीं' तो होकार असतो याचा अनुभव अनेकांना आहेच.

या गोष्टीला मध्यंतरीं दोन तीन महिने गेले आणि एक दिवस अचानक मला सोनोपंतांकडून निरोप आला, "आज रात्रीं मी आपणांकडे कीर्तनाला येणार आहें. पण माझी तब्येत बरी नसल्यामुळें कीर्तन फक्त अर्धा पाऊणतासच करीन." मीं घाईघाईनें कांहीं माणसें कीर्तनाला बोलाविलीं. आणि कीर्तन सुरू होतांच, न बोलावताहि अनेक माणसें आलीं. माझ्या घरापुढचे दोन्ही रस्ते भरून गेले. घरांतही उभे राहण्याला जागा शिल्लक राहिली नाहीं. सोनोपंतांनीं कीर्तनाला सुरुवात केली. निरूपणाकरितां त्यांनीं तुकोबाचा अभंग घेतला होता.

जयाचिये द्वारीं सोन्याचा पिंपळ। अंगीं ऐसें बळ रेडा बोले !
करील तें काय नव्हे महाराज। परि पाहे बीज शुद्ध अंगीं !॥

कीर्तन खूपच रंगलें होतें. अर्ध्या पाऊण तासाच्या ऐवजीं पावणेतीन तास कीर्तन झालें. कीर्तन संपल्यानंतर सहज आम्ही गप्पा मारीत बसलों होतों. आणि मला वाटतें त्या वेळीं माझे स्नेही श्री. के. नारायण काळे आले होते. सोनोपंतांनीं सहज थट्टेनें श्री. के. नारायण काळ्यांना विचारलें, "तुम्हाला कांहीं हें आमचें कीर्तन आवडणार नाहीं!" श्री. के. नारायण काळ्यांनीं चटकन् उत्तर दिलें, "उद्यां काय वाटेल तें सांगतां येत नाहीं. पण आतां विचाराल तर टाळ पताका घेऊन आपल्यामागें यायची तयारी आहे!"

त्या माझ्या घरीं झालेल्या सोनोपंत दांडेकरांच्या कीर्तनांतील आतां शब्दही मला आठवत नाहीं. पण निरूपणाला घेतलेला अभंग मात्र लक्षांत राहिला आहे. पण कोजागिरी पोर्णिमेच्या रात्रीं उल्हसित वृत्तीनें निसर्गाच्या सान्निध्यांत—आणि आकाशांत दिसणाऱ्या ईश्वरी चमत्कारांत जसें मन गुंतून जातें, तशी त्या रात्रीच्या कीर्तनाची आठवण अद्याप माझ्या मनांत तरंगते आहे— जयाचिये द्वारीं सोन्याचा पिंपळ!

* * *

आणि नंतर कित्येक वर्षांनीं आमचें प्रसाद मासिक निघालें. त्यांत प्रा. सोनोपंत दांडेकर संपादक म्हणून आले. त्यांचा त्यामुळें कांहींच फायदा झाला नाहीं; पण लोकांचा मात्र फायदा झाला. "अध्यात्मशास्त्राचीं मूलतत्त्वें" ही लेखमाला प्रसादमासिकामुळेंच लिहून झाली. "ईश्वरवाद" माझ्यामुळें लिहून झाला. 'प्रसाद' मध्यें प्रा. सोनोपंत दांडेकराचे अनेक लेखहि आले. आणि आतां सेवानिवृत्त झाल्यानंतर प्रा. सोनोपंत दांडेकरांनीं ज्ञानेश्वरी संपादन करण्याचें कबूल केलें आहे तें केवळ माझ्यामुळेंच. म्हणजे पाहा. प्रत्यक्ष विद्वान् असण्यापेक्षां विद्वानांच्या सहवासांत माझ्यासारखीं माणसें असणें जनतेच्या दृष्टीनें किती उपयुक्त आहे!

प्रा. सोनोपंत दांडेकरांचा आणि माझा थोडाफार सहवास झाला आहे. पण त्यामुळें सोनोपंत दांडेकरांचें मोठेंपण मला समजलें आहे, असें म्हणण्याचें धाडस मी करूं शकत नाहीं. आणि प्रसंग असे येतात कीं जेव्हां सोनोपंत दांडेकरांची आणि माझी भेट होते—तेव्हां जास्त बोलण्याचा प्रसंग मलाच येतो—तेव्हां सोनोपंत दांडेकरांनीं मला कदाचित् ओळखलें असेल पण—

पण असे कांहीं प्रसंग मला आठवतात. नुकतेच केव्हां तरी आम्ही माझ्या ऑफिसांत बोलत बसलों होतों. माझे स्नेही श्री. स. आ. जोगळेकर, श्री. त्र्यं. ग. मापट वगैरे आम्ही जवळ जवळ पांच सहा माणसें होतों. बोलण्यांत अमुक असा विषय नव्हता, पण आम्ही बोलत होतो. श्री. जोगळेकर थट्टाविनोद करीत होते. आणि चहापाण्याची कांहीं व्यवस्था आतां करावी लागणार असें मला वाटूं लागलें.

तोंच अचानक सोनोपंत तिथें आले. आम्हां आपल्या बैठकी सावरल्या. आणि सोनोपंतांच्या गांभीर्याला शोभेल असा विषय सुरू करण्याच्या तजविजींत होतों. तोंच श्री. स. आ. जोगळेकरांनीं 'प्रसाद' मासिकाचा विषय काढला आणि अशी कल्पना मांडली कीं, सोनोपंतांनीं आतां मासिकांत कोणता तरी एक अभंग घेऊन त्याची चर्चा करावी–लोकांना ती फार आवडेल. त्यावर आमची चर्चा चालू झाली आणि सोनोपंत लगेच म्हणाले "आतां हाच अभंग पाहा :

देव पाहों देव पाहों। उंच ठाई उभे राहों॥
देव देखिला देखिला। तो नाहीं कोणा भ्याला–॥"

या अभंगावर सोनोपंतांचें प्रवचन सुरू झाल आणि आमच्या खोलींतलें वातावरण एकदम बदलल्याचा मला भास झाला. खोलींतील आळसलेलें आणि थट्टेचें वातावरण नाहींसें झालें. सर्वजण उत्सुकतेनें ऐकत होते–सोनोपंतहि रंगले होते. घड्याळाचे काटे सरकत होते–म्हणूनच वेळ जात होता हें आमच्या लक्षांत आलें–पण आम्ही सर्व रंगलों होतों, तल्लीन झालों होतों. सोनोपंतांनीं चर्चा संपविली आणि मानेनेंच 'जातों' असें सांगून ते निघून गेले. आणि ते खोलीबाहेर पडतांच आमची आम्हाला जाणीव झाली–पण सर्वांचीं मनें भारलेलींच होतीं. 'जातों' असें शब्दांनेंही न सांगतां आम्ही एकमेकांकडे पहात आपले आपले मार्ग आक्रमिले. निदान माझ्या मनाला तरी त्या दिवशीं अलौकिक शांततेचा आणि तन्मयतेचा भास झाला.

सांगण्याचें तात्पर्य येवढेंच कीं, व्यावहारिक माणसापेक्षां प्रा. सोनोपंत दांडेकर निराळे आहेत. ते तत्त्वज्ञानाचे प्रोफेसर आहेत. तत्त्वज्ञान पुष्कळच लोकांना कळतें. अगदीं इतकें तत्त्वज्ञान इतक्या लोकांना कळलें नसतें तरी बरें झालें असतें, असें वाटण्याइतकें अनेकांना कळतें; पण त्या तत्त्वज्ञानाचा त्या ज्ञानी माणसांच्या प्रत्यक्ष जीवनावर कांहीं परिणाम झालेला दिसत नाहीं. धान्य दळायला नेण्याकरितां आपण डबे वापरतों–त्या डब्यांत धान्य ठेवतो–तसे अनेक मानवी डब्यांत तत्त्वज्ञानाचे धान्य आहे. पण जें तत्त्वज्ञान जाणींत आहेत आणि जगत आहेत असे प्रा. दांडेकरच आहेत येवढें मी खास म्हणूं शकेन.

सोनोपंत दांडेकरांना आळसलेले, कंटाळलेले, संतापलेले मीं कधीं पाहिलेले नाहीं. आपल्या ताकदीनें आणि जाणिवेनें अथांग जलाशयांत पोहणीला पडणारा माणूस जसा परतीर गांठण्याकरितां पोहत जावा, तसें प्रा. सोनोपंत दांडेकरांच्या आयुष्याकडे पाहून मला वाटतें. एखाद्या वाक्यापुढें टाकलेलें उद्गारचिन्ह–त्या उद्गारचिन्हामागच्या वाक्याच्या अनुरोधानें, आपली किंमत मर्यादित करते. माझ्या दृष्टीनें पाठीमागें कोणतेहि वाक्य नसलेलें आणि म्हणून अमर्याद अर्थ दर्शविणारें असें सोनोपंतांचें आयुष्य म्हणजे एक सुंदर, अर्थगंभीर, आकर्षक आणि आदरणीय असें उद्गारचिन्ह आहे!

खरें पाहिलें तर मी एक साधासुधा लघुकथालेखक. पण माझ्याबद्दल अनेकांना मोठमोठे भ्रम आहेत. वाद्‌विवेचन मालेचा एक प्रकाशक म्हणून मला लोक विद्वान् समजूं लागले आणि त्यामुळें "बौद्धिकें" घेण्याकरितांहि मला अनेक आमंत्रणें येऊं लागलीं. अर्थात् अशा बोलवण्याला मी जात नाहीं हा माझा समजुतदारपणा—आणि आतां प्रसाद मासिकावर प्रा. सोनोपंत दांडेकरांच्या नांवाशेजारीं संपादक म्हणून माझें नांव येत असल्यामुळें, सोनोपंतांच्या प्रांतांतहि माझा कांहीं अधिकार असावा असेंहि पुष्कळांना वाटूं लागलें आहे. कांहीं लोक माझ्याहि दर्शनाला येतात—पण त्याच वेळीं आमच्या "मामांच्या" मासिकाची आम्हाला वर्गणी भरायची आहे—असेंहि ऐकायला येतें—त्यामुळें त्यांना दर्शन देण्याइतकें मला धीट व्हावें लागतें—त्याला माझाहि केवळ नाइलाज आहे! प्रा. सोनोपंत दांडेकरांच्या 'छापील' शेजारामुळें माझ्या व्यक्तित्वाला लोकांच्या दृष्टीनें एक निराळा रंग-सुगंध चढला आहे. यालाच म्हणतात योगायोग!

एक दिवस सहज मी माझ्या घराच्या अंगणांत उभा होतों. सोनोपंत सावकाशपणानें माझ्या घराची वाट चालत होते. सदा आनंदी पण गंभीर असे त्यांचा सात्त्विक चेहरा—निराळेपणानें चमकणारे त्यांचे ते डोळे—साधासुधा पोषाख, अंगावरचे ते जाडेभरडे उपरणें, तो जाडाभरडा कोट, चालण्याची ती धिमी पद्धत, कॉलेजकडे वळले कीं प्राध्यापक आणि आळंदीकडे वळले की वारकरी, दोन्हीकडेहि शोभणारा पोषाख—सहजासहजीं आकाशांत इंद्रधनुष्य पहावें आणि मनाला निर्भेळ आनंद वाटावा तशी माझ्या मनाची स्थिति झाली! आकाशांत इंद्रधनुष्य कां उगवतें? कशामुळें तें दिसतें ही जिज्ञासा जशी माझ्या मनाला कधींच लागत नाहीं, तसेंच सोनोपंतांच्या विषयीं मला आदर कां वाटतो याचीही छाननी मी माझ्या मनाशीं सुद्धां कधीं करीत नाहीं—करणार नाहीं! मला वाटतें नयनरम्य असें इंद्रधनुष्य—आणि त्यांत आपल्या मनाला आनंद होत असतांना—त्या आनंदाची चिकित्सा आणि चिरफाड हवीच कशाला?

जयाचिये द्वारीं सोन्याचा पिंपळ। ... ...

तुका म्हणे तेथें सुखा काय उणें। राहे समाधानें चित्ताचिया॥

आणि हाच माझा सोनोपंतांबद्दलचा अभिमान आहे. माझ्या द्वारीं सोन्याचा पिंपळ नसेल कदाचित्—पण प्रसाद मासिकाच्या कामाकरितां आणि आतां निर्माण झालेल्या ऋणानुबंधामुळें माझ्या घरीं चालतां बोलतां "सोन्याचा पिंपळ" असून-मधून दिसतो हें समाधान काय थोडें आहे?





प्रा. सोनोपंत दांडेकर आणि बहुजनसमाज

लेखक— श्री. वा. ग. जगताप



इंग्रज सरकारचा कारभार हिंदुस्थानांत सुरू झाल्यावरोबर सर्वत्र ज्ञानाचा प्रसार कसा करतां येईल, हा प्रश्न सरकारपुढें उभा राहिला. मेकॉलेसाहेबांनीं सुचविलें कीं, समाजाचे वरच्या थरावर जीं माणसें आहेत त्यांना अगोदर शिकवा, म्हणजे त्यांचेकडून ज्ञान आपोआप खालचे थरावर जाईल व त्यायोगें ज्ञानाचा प्रसार होईल.

हिंदुस्थानचें भलें व्हावें या हेतूनें जरी हा विचार सुचविण्यांत आला असला तरी त्यापासून योग्य तें ध्येय साध्य झालें नाहीं. जे लोक शिकले, त्यांनीं आपल्या खालच्या समाजांत आपल्या ज्ञानाची वाटणी न करतां, ते साहेबाकडे पाहून त्यांचें अनुकरण करूं लागले. यामुळें आम्हां शिकलेल्या माणसांमध्यें व आमच्या न शिकलेल्या बंधूंमध्यें जें अंतर पूर्वी होतें त्यापेक्षां जास्त अंतर दिसून येऊं लागलें. खेड्यांतील आपल्या शेतकरी वडिलांस चार चौघामध्यें 'वडील' म्हणून संबोधण्यास देखील आम्हां सुशिक्षितांना लाज वाटूं लागली. शहरांत राहणाऱ्या सुशिक्षितांना पूर्व आणि पश्चिम यांच्यांतील भेद दिसूं लागला. समाज-सुधारणा अगोदर कीं राजकारण अगोदर, असले निष्कारण वाद निर्माण झाले. सत्ता हातीं आली म्हणजे सर्व कांहीं होईल, अशी पुष्कळांची कल्पना. उदार इंग्रज सरकारनें राज्य परत आपल्या हवालीं केलें. पण शिवाजीला पकडण्याकरतां निघालेले मुसलमान शिपायी ज्याप्रमाणें एकमेकाला धरून 'शिवाजी पकडला' म्हणून स्वतःचा गैरसमज करून घेऊं लागले, त्याचप्रमाणें आज जो तो स्वराज्य आले म्हणून मुठी आवळून घेऊं लागला, परंतु मूठ उघडून आंत पाहातो तों काय? निराशा! आपली कांहीं तरी भूल होते आहे, असें आतां शहाण्यांना वाटूं लागलें आहे व स्वराज्याचें सुराज्य कसें करतां येईल म्हणून विचार होऊं लागला आहे.

शहरांत शिकलेल्या मूठभर लोकांना वाटलें, आपल्याला राज्य चालवितां येईल. त्यांच्यांत तरी एक विचार कोठें आहे! कोणी म्हणतो इंग्लंडसारखी लोकशाही पाहिजे; कोणी म्हणतो, छे! हिंदुस्थानाला लोकशाही कधीं मानवणार नाहीं. येथें उदार अंतःकरणाचा शास्ताच पाहिजे; तिसरा म्हणतो, तसें कांहीं नको, रशियाचा

कम्युनिझमच येथें आला पाहिजे. टागोरसारखीं माणसें ओरडून सांगतात कीं बाबा, नुसतें यंत्र बदलून भागणार नाहीं, तर माणसें बदललीं पाहिजेत. पण त्यांच्याकडे लक्ष कोण देतो !

या प्रश्नांचा विचार आमच्याकडेही संतांनीं केला. 'आपण सर्व एका शरिराचे अवयव आहांत, येथें भेदभाव करणें अमंगळ आहे' असें त्यांनीं घसा फोडून सांगितलें आहे, परंतु आम्हीं त्यांच्याकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. 'जीवनाचीं मूल्यें' आतां बदललीं पाहिजेत, असें पाश्चिमात्य म्हणूं लागले तेव्हां आमचे डोळे उघडले. आमच्या खालच्या समाजांत शिरलें पाहिजे, त्याला ज्ञान दिलें पाहिजे, त्यांचे ठिकाणीं आत्मविश्वास निर्माण केला पाहिजे, हें आतां थोडें वाटूं लागलें आहे. सरकारही आतां विद्यालयांना समाज-शिक्षण सुरू करा म्हणून म्हणूं लागलें आहे. समाज-शिक्षण म्हणजे काय हें समजून घेण्याची वेळ कित्येक प्राध्यापकांना आली आहे.

आम्ही शाळांतून कॉलेजांतून मुलें शिकवून समाधान मानून घेऊं लागलों. चार भिंतींच्या बाहेर पसरलेला अंधःकार आम्हाला दिसला नाहीं. माझ्या खोलींत विजेच्या दिव्याचा झगझगाट आहे, तसाच तो सर्वत्र असेल, अशी आम्हीं स्वतःची खोटी समजूत करून घेतली. आम्ही मुलें शिकविलीं, समाज शिकविला नाहीं.

प्रा. सोनोपंत दांडेकरांनीं मुलेमुलीच शिकविल्या नाहींत तर त्यांनीं समाज शिकविला. केवळ स्पेन्सर काय म्हणतो म्हणून सांगितलें नाहीं, तर ज्ञानेश्वर-तुकाराम काय म्हणतो व त्यांचें म्हणणें पाश्चिमात्य तत्त्ववेत्त्यांशीं किती जुळतें, हें सांगितलें. यांत प्रा. सोनोपंत यांचें वैशिष्ट्य आहे. त्यांना शहरांतील माणसें जेवढीं ओळखतात, त्यापेक्षां खेड्यांतील जनता जास्त ओळखते. ज्यावेळीं आमचे शिक्षक खालच्या समाजाकडे पाहूं लागतील, आपल्याला मिळालेलें ज्ञान त्याला वाटूं लागतील, त्याच वेळीं खऱ्या अर्थानें ते शिक्षक होतील. प्रा. सोनोपंतांचे चरित्रावरून एवढा जरी बोध आम्हां शिक्षकांना घेतां आला तरी देशाची केवढी कामगिरी आम्हांला करतां येईल !

कीर्तनें शुद्ध केलें लोकां । दूर कलंकापासूनी ॥ १ ॥
टाळिया हरिनामाच्या घोषें । पळतीं आगें कलिमल ॥ २ ॥
स्वानुभवें घेतल्या सुखें । श्रोतादि दोन्ही चतुर्भुज ॥ ३ ॥
निंदा नाणें कीर्तन सुखें । हरिली दुःखें बहुतांची ॥ ४ ॥

सन्मित्र दांडेकर

लेखक— प्रा. द. के. केळकर, रामनारायण रुइया कॉलेज, माटुंगा

प्राचार्य दांडेकर सेवानिवृत्त होणार आहेत हें जेव्हां मीं प्रथम वाचलें तेव्हां मला त्याचा प्रारंभीं अर्थ लागेना. जनसेवेलाच ज्यांनीं आजवरचें अखंड आयुष्य वाहून घेतलेलें आहे ते जनसेवेंतून आतां निवृत्त होतील ही कल्पना पटावीच कशी? तेव्हां प्राचार्य सेवानिवृत्त होत आहेत याचा अर्थ मी एवढाच समजतों, कीं ते शिक्षण प्रसारक मंडळी व स. प. महाविद्यालयांतून निवृत्त होत असून, अखंड जनता-सेवेला ते यापुढें सर्वस्वीं वाहून घेतील.

प्रा. दांडेकर वयपरत्वें निवृत्त होत आहेत हें वाचूनही आश्चर्य वाटलें तर नवल कसलें? आज त्यांच्या हिशोबीं वयाच्या दृष्टीनें ते पंचावन्नावी ओलांडत असले तरी त्यांचा तेजःपुंज गोरापान चेहरा, शांतपणें चमकणारे डोळे, व खणखणीत वाणी हीं तरुणालाही लाजवतील अशीं आजही आहेतच ना? यामुळें शिक्षण प्रसारक मंडळींतून ते आतां निवृत्त होत असल्यानें त्यांच्या सेवेचा किंवा मार्ग-दर्शकत्वाचा लाभ आपल्या मंडळींना यापुढें पूर्वींइतका मिळणार नसला तरी तो बहु-जनसमाजाला मिळणार आहे, नव्हे पूर्वींपेक्षां अधिक प्रमाणांत मिळणार आहे, ह्यांतच आपण समाधान मानूं या! प्राध्यापक या नात्यानें ते आपल्या संस्थेची गेलीं कित्येक वर्षें अविरत सेवा करीत असले, तरी उरलेल्या वेळेचा एक क्षणही फुकट न घालवितां ते जनतेला शिक्षण देत आलेलेच आहेत. गेल्या कित्येक वर्षांत सबंध आठवड्यांत एकदां तरी त्यांनीं कीर्तन किंवा व्याख्यान यांनीं श्रोत्यांना झुलविलें नाहीं असा एखादा आठवडा तरी मोकळा गेला असेल कीं नाहीं याची मला शंकाच आहे.

जनसेवेच्या वृत्तीचा हा अंकुर बाळपणांतच जोरानें उमटूं लागला होता. पुण्यां-तील नूतन मराठी विद्यालयामध्यें प्रा. दांडेकर व मी एकाच वर्गांत व एकाच तुक-डींत असून सदाशिव पेठेंतील आमच्या रहाण्याच्या जागाही जवळच होत्या. यामुळें प्रा. दांडेकर यांचा माझा परिचय व स्नेह आज बऱ्याच वर्षांचा आहे. शाळेंत ते शिकत असले तरी त्यांचे खरे गुरुजी ह. भ. प. जोग हे त्यांच्या घरीं नेहमीं येत असलेले आम्ही पाहात असूं. वारकरी संप्रदायाला जीवन वाहून घेण्याचें प्रा. दांडेकर

यांनीं या बालपणांतच ठरवून टाकलें असावें. कारण अभ्यासाच्या उरलेल्या वेळांत ते पुष्कळ वेळां घरीं मृदुंग वाजवीत बसलेले आम्हांला आढळावयाचे. आपले सर्व जीवित मृदुंगाला व कीर्तनाला ते वाहून घेतील असें त्यावेळीं आम्हाला कोणीं सांगितलें असतें तर ती कविकल्पना मात्र वाटली असती. पण वीणा हातीं घेऊन व साथ करणारे अनेक शिष्य पाठीशीं घालून ते कीर्तनांत रंगलेले आज पाहिले म्हणजे ती कल्पना नसून भविष्यवाणी होती असें वाटूं लागतें.

अशीच एक दुसरीही भविष्यवाणी त्यांच्या तोंडून ऐकली. आम्ही शाळेंत असतांना आजन्म ब्रह्मचारी राहून वारकरी संप्रदायाला सर्व आयुष्य अर्पून घ्यावयाचें असें प्रा. दांडेकर आम्हां मित्रांना सांगत असत. त्या वयांत आम्ही सर्वच ध्येयाच्या स्वप्नांत रंगलेलों होतों. आम्हां बाकीच्यांचीं तीं स्वप्नेंच ठरलीं. पण प्रा. दांडेकरांनीं मात्र तें प्रत्यक्ष कृतींत उतरविलेलें आपण पाहातच आहोंत. आम्ही संस्कृत शिकावयास लागल्यानंतर त्यांना थोडासा मुद्दाम चिमटा घेण्याकरितां म्हणत असूं कीं, तुम्ही ज्ञानोबा तुकाराम होऊन टाळ पिटणार असलांत तर आम्ही शंकराचार्यांची गादी विभूषित करणार आहोंत! एक दिवस त्यांनाही अवसान चढलें आणि त्यांनीं आम्हांला बजावून सांगितलें कीं "पाहा बरं! मीही एक दिवस शंकराचार्य होणार आहें." आणि हेंही भविष्य कांहीं अंशीं खरें ठरलेंच ना? म्हणजे आज ते प्राचार्यस्थानारूढ आहेत, इतकेंच नव्हे तर, ज्या विषयाचें अध्यापन करितात तो विषयही वेदान्त हाच होय! या विषयावरील त्यांचें ईश्वरवाद हें वादविवेचन मालेंतील पुष्प तजेलदार व सुवासिक आहे. त्यांचा वेदान्तपर स्वतंत्र ग्रंथही लवकरच प्रसिद्ध होईल असें ऐकतों. त्यांच्या विवेचनांतील गूढवादाशीं मला समरस होता येत नसलें तरी, त्यांच्या आकर्षक वक्तृत्वाची छाप मनावर पडल्याशिवाय थोडीच राहणार? त्या वक्तृत्वानें जनतेला मार्गदर्शन करण्याचें त्यांचें काम अखंड चालो, यापेक्षां याप्रसंगीं आणखी काय म्हणणार?

एक निवृत्त प्रवृत्त

लेखक— डॉ. शं. गो. तुळपुळे, पुणे विद्यापीठ

देखें प्राप्तार्थ जाहले। जे निष्कामता पावले।
तयांही कर्तव्य असे उरलें। लोकांलागीं ॥ ज्ञाने. ३।१५५

मी तत्त्वज्ञानाचा विद्यार्थी नसल्यानें विद्यार्थिदशेंत प्रा. सोनोपंत दांडेकरांना प्रत्यक्ष भेटण्याचा फारसा संभव नव्हता. परंतु एम्. ए. च्या परीक्षेसाठीं आम्हांला

कै. प्रि. भाटेकृत 'तीन तत्त्वज्ञानी' हें पुस्तक नेमलेलें होतें, व त्या पुस्तकावर प्राः सोनोपंतांनीं कांहीं व्याख्यानें द्यावीं अशी विनंती आम्हीं कांहीं विद्यार्थ्यांनीं त्यांना केली. आणि त्यांनींही ती तत्परतेनें मान्य करून आस्थापूर्वक त्या पुस्तकावर ७।८ अत्यंत सुंदर अशीं व्याख्यानें दिलीं. हाच त्यांचा आणि माझा प्रथम परिचय. पुढें मी मुंबईस सिडनहॅम कॉलेजांत असतांना प्रा. दांडेकर हेही त्याच वेळीं रामनारायण रुईया कॉलेजांत होते. आणि ते व मी दोघेही ठाण्यासच राहत असल्यानें एकाच गाडीनें मुंबईस जाण्याचा अनेकदां प्रसंग येई. त्यामुळें आमचा परिचय अधिक दृढ झाला आणि पुढें तो उत्तरोत्तर वाढतच गेला.

प्रा. दांडेकर आतां सेवानिवृत्त होऊन आपल्या अंगीकृत कार्यास सर्वस्वीं वाहून घेणार आहेत हें एका दृष्टीनें योग्यच आहे. तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून त्यांचा लौकिक फार थोर असून, अजून कांहीं काल त्यांच्या शिकविण्याचा लाभ जर विद्यार्थिवर्गाला झाला असता तर तें हवेंच होतें; परंतु या कार्याहून अधिक व्यापक असें लोकशिक्षणाचें कार्य ते आजवर 'सेवितों हा रस, वाटितों आणिकां' या बुद्धीनें करीत आले आहेत. वारकरी संप्रदायासारख्या एका मोठ्या संप्रदायाचे ते अध्वर्यु असून, एकनाथाप्रमाणें कीर्तनभक्तीचा उदो उदो ते अखंड करीत आले आहेत. 'नौकरी शर्यतसे' करण्याचें व्रत त्यांनीं प्रपंच आणि परमार्थ या दोन्ही क्षेत्रांत सारख्याच निष्ठेनें पाळलें आहे; आणि नोकरी करीत असतांही गेल्या वीस पंचवीस वर्षांत त्यांनीं पंढरीची वारी एकदांही चुकविली नाहीं. सर्व लौकिक व्यवहार करीत असतांही मनांतून ते निवृत्त आहेत. मनांत निवृत्त आणि जनांत प्रवृत्त असें त्यांचें वर्णन करतां येईल. या दृष्टीनें पाहतां ते एक आदर्श कर्मयोगी वाटतात. या विशिष्ट अधिकारामुळें त्यांचा संबंध समाजांतील सानथोर अशा सर्वांशीं येतो, आणि सर्वांशीं ते सारख्याच प्रेमभावानें वागतात. त्यांच्या आप्तवर्गांत पंतप्रधान श्री. खेर, फलटणचे राजेसाहेब, डॉ. बाबासाहेब जयकर इत्यादि थोर थोर लोक आहेत. तसेच असंख्य भोळे-भाळे वारकरीही आहेत. म्हणूनच वाटतें कीं, प्रा. दांडेकर जसे लोकशिक्षक आहेत तसेच लोकसंग्राहकही आहेत. त्यांचें ज्ञानेश्वरीवरील प्रभुत्व अनन्यसाधारण असून पौर्वात्य आणि पाश्चात्य तत्त्वज्ञानांचा त्यांचा व्यासंगही सर्वश्रुत आहे. त्यांचा हा तौलनिक अभ्यास कांहीं दिवसांपूर्वी 'प्रसाद' मासिकांत प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या 'अध्यात्मशास्त्राचीं मूलतत्त्वें' या लेखमालेंत चांगला दृष्टोत्पत्तीस येतो.

प्रवचनकार म्हणून ते समाजांतील सर्व थरांत प्रिय असून त्यांचीं प्रवचनें भाविक व बुद्धिवादी, अशिक्षित व सुशिक्षित, विद्यार्थी व वृद्ध हे सारख्याच आस्थेनें ऐकतात. याचें एक कारण म्हणजे त्यांच्या कीर्तन-प्रवचनांतून व्यक्त होणारें त्यांचें असामान्य व्यक्तिमत्व हें होय. 'अंतरी निर्मळ आणि वाचेचा

रसाळ' अशा या आधुनिक कीर्तनकाराच्या मागें लोकगंगा वाहात गेली तर त्यांत कांहींच नवल नाहीं. एक निष्ठावंत कर्मयोगी आणि प्रेमळ भक्त म्हणून त्यांची थोरवी फार मोठी आहे. आणि इतकें असूनही त्यांचें अमानित्व अपूर्व आहे. ब्रह्मचर्याचें व्रत त्यांनीं आजन्म कठोर निष्ठेनें पाळलें असलें तरी त्याचें त्यांनीं कधींही स्तोम माजविलेलें नाहीं. किंबहुना त्यांच्याकडे पाहिल्यास ते प्रापंचिकच वाटतील. ते ज्ञानी असूनही रुक्ष नाहींत, भक्त असूनही अंध नाहींत किंवा कर्मयोगी असूनही कर्मठ नाहींत. त्यांना असें म्हणणें कदाचित् रुचणार नाहीं, पण ते वारकऱ्यांतील 'रामदासी' आहेत असें मला नेहमीं वाटत आलें आहे. तात्पर्य, त्यांचे विद्यालयीन गुरु प्रा. रामभाऊ रानडे आणि त्यांचे पारमार्थिक गुरु कै. विष्णुबुवा जोग या दोघांनाही अभिमान वाटावा असेंच कार्य प्रा. दांडेकरांच्या हातून आजवर होत आलें आहे व यापुढेंही होत राहील यांत तिळमात्र शंका नाहीं.

लाभोत तुझ्यासम संत सदा सांगाती

कवि— रा. ग. जाधव साहित्यविशारद, इंटर. आर्ट्स

नयनांत तुझ्या आर्तता दिसे संतांची
वाणींत तुझ्या प्रेमळता या मातेची
'हें विश्वचि माझें घर' ऐसी तव नीति भली
वसनांत धवलता मूर्त मानसामधली ॥ १ ॥
वाटते पहावी चाल पद्मसुरींची
पावित्र्य तयांचें, प्रीत सकल विश्वाची
बघतांच तुला ही पूर्ण आस हृदयाची
क्षणभरी पाहता मूर्ति वात्सल्याची ॥ २ ॥
वाटते आम्हांला ज्ञानेशच तूं होई
रखरखल्या जीवा तुमची गुरुसावली
ही एक ओढ मम आर्त मानसीं पुरती
लाभोत तुझ्यासम संत सदा सांगाती ॥ ३ ॥

ता. १२-३-६१

वारकरी प्राचार्य
गु. शंकर वामन दांडेकर

लेखक— रघुनाथ हणमंत कोटणीस,
"कैवल्यधाम" संत तात्यासाहेब कोटणीस पथ, सांगली.

परीपूर्ण ज्ञानी खरा ब्रह्मचारी । तत्त्वज्ञ जो मालधारी विचारी ॥
हरीनाम रंगीं तदाकार झाला । नमस्कार त्या धन्य श्रीशंकराला ॥ १ ॥

सुशिक्षित व अशिक्षित सर्व समाजांत प्रा. दांडेकर या नांवानें किंवा सोनोपंत अगर मामा या नांवानें प्रसिद्ध असलेले प्राचार्य शंकर वामन दांडेकर हे सर परशुरामभाऊ महाविद्यालयांतून प्राचार्यपदावरून सेवानिवृत्त होत असतांना, कॉलेजनें त्यांचेसंबंधीं विशेषांक काढून त्यांच्या इष्टमित्र-प्रेमीजनांनाही त्यांचे पवित्र चरणीं सुमनांजलि वाहण्याची या कृतीनें सुसंधि दिली ही गोष्ट अत्यंत आनंददायक आहे.

प्रा. गु. सोनोपंत यांनीं मुंबईच्या 'रामनारायण रुईया महाविद्यालयांत व पुणें येथें सर परशुरामभाऊ महाविद्यालयामध्यें प्राचार्यपदावर आरूढ होऊन अधिकारानें तत्त्वज्ञानाची बहुमोल सेवा केली व अनेक सुसंस्कृत शीलवान् विद्यार्थी निर्माण केले हें तर विशेष आहेच; परंतु प्रो. गु. रामभाऊ रानडे यांच्यासारख्या सुप्रसिद्ध तत्त्वज्ञांच्या सहवासानें व पुणें येथील सुप्रसिद्ध संत कै. विष्णुबुवा जोगमहाराज यांच्या अत्यंत प्रभावी निरूपणशैलीस मोहित होऊन, त्यांचें शिष्यत्व संपादून, आजन्म खडतर ब्रह्मचर्यव्रताचें आचरण पूर्ण निःस्वार्थपणें करून, त्यांनीं आपल्या शिक्षणक्रमांत मिळविलेलें तत्त्वज्ञान आपल्या कृतींत पूर्णत्वानें उतरविलें, आणि आपल्या रसाळ ज्ञानेश्वरीच्या प्रवचनानें व निरूपणानें पंढरीच्या वारीचें व्रत नेमनिष्ठेनें चालवून असंख्य वारकरी निर्माण केले, हें सर्वांत विशेष आहे. श्रीजोगमहाराज यांचे पश्चात् वारकरी सांप्रदायाची धुरा मानेवर घेऊन त्यांनीं सांप्रदायाची सेवा अपूर्वच केली आहे.

॥ नम्र झाला भूतां तेणें कोंडिलें अनंता ॥ अशा कोटींतले प्रा. गु. सोनोपंत असल्यानें गाढ विद्वत्ता अंगीं असूनही ते आपल्याला अत्यंत नम्रच दिसतील. ॥ तुका म्हणे संतपूजा । बहु आवडे गरुडध्वजा ॥ या न्यायानें निरूपणाचें योगानें संतांचे गुणानुवाद गाऊन ते कांहीं कांहीं ठिकाणीं प्रतिवर्षी संतपूजा करतात, व त्या ठिकाणीं संतकृपेचें परिमळ निरूपणद्वारा दरवळून सोडून अनेक लोकांना गुंगवून हरिभक्तीचें वेडच लावितात. अशा रीतीनें असंख्य लोकांना त्यांनीं दुर्व्यसनांतून मुक्त करून हरिनामाचें व्यसन लावलें आहे.

प्रतिवर्षी ज्या ठराविक ठिकाणीं प्रा. सोनोपंत हे आपल्या रसाळवाणीनें निरूपणद्वारा संतसेवा करतात, अशांपैकींच आमचें "कैवल्यधामां" त होणारें प्रतिवर्षाचें त्यांचें निरूपण ते श्रीतात्यासाहेबांची सेवा म्हणून सर्व नडी बाजूस ठेवून करतात. हे उपकार आम्हांस या जन्मांत आम्हीं त्यांचेकरितां कांहींही केलें तरी फिटणारे नाहींत. कैवल्यधामाची कोनशिला त्यांनींच बसविली असल्यानें तें त्यागाचे धारणेवरच तळपतें आहे. म्हणूनच कैवल्यपुरुष श्रीतात्यासाहेबांचें "कैवल्यधाम" होऊं शकलें हें निःसंशय सत्य आहे. माझ्या पाहाण्यांत पुष्कळ तत्त्वज्ञ संत आले. पण "जें संतातें पाहतां गिवसावें" या श्रीज्ञानेश्वरमहाराज यांच्या उक्तीप्रमाणें, दृष्टीमध्यें हातोहात अध्यात्म उतरविणारे एकमेव तत्त्वज्ञ संत आढळले, ते म्हणजे प्रा. गु. सोनोपंत दांडेकर हे होत. श्रीतात्यासाहेबांचे पश्चात् वडील बंधुत्वानें आम्हांला त्यांचा प्रत्येक कार्यांत पुरेपूर पाठिंबा मिळत गेल्यानें त्यांचे कृपाशिर्वादानें आम्हांस सर्व कार्यांत यशस्विताच प्राप्त होत गेली.

श्रीपांडुरंगानें उत्तरोत्तर असेंच त्यांचेकडून पारमार्थिक कार्य करून घ्यावें व त्यांचे हातून घरोघरीं सुशिक्षित वारकरी निर्माण होऊन भागवत धर्माचा सुगंध सर्वत्र दरवळला जावा एवढें मागणें मागून, व त्याकरितां प्रभूनें त्यांना उदंड आयुष्य व आरोग्य द्यावें एवढी मनःपूर्वक प्रार्थना करून, श्रीतात्यासाहेबांचे कृपेनें स्फुरलेली ही सुमनांजली गु. प्रा. सोनोपंत दांडेकर यांचे चरणीं सादर समर्पण करीत आहे.

"निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव, तुकाराम" या परंपरेंतील

प्रा. दांडेकर

लेखकः—श्री. केशव नारायण शिरोळे

१९४५ चें साल असेल. श्रीक्षेत्र आळंदीस कार्तिकी एकादशीनिमित्त मी गेलों होतों. इंद्रायणीच्या कांठी वसलेला हा टुमदार गांव त्या दिवशीं लाखों लोकांच्या आगमनानें सारा गजबजून गेलेला दिसत होता. इंद्रायणीच्या तीरीं, धर्मशाळांतून, [illegible], ठिकठिकाणीं हरिनामाचा गजर अखंड चालू होता. टाळमृदुंगाच्या आवाजांत भगव्या पताका खांद्यावर घेऊन हजारों वारकरी "ज्ञानोबा तुकाराम" म्हणत

इकडे तिकडे गांवभर फिरत होते. हा सोहळा पाहाण्याचें भाग्य मला त्या दिवशीं लाभलें.

मुंबईचे लोकप्रिय कार्यकर्ते व बहुजनसमाजाचे निष्ठावंत समाजधुरीण श्री. भाऊसाहेब राऊत यांच्या आळंदी येथील बंगल्याच्या प्रशस्त परिसांत त्या दिवशीं ह. भ. प. सोनोपंत दांडेकरांचें कीर्तन होतें. यापूर्वी मीं त्यांच्याबद्दल नुसतें ऐकलें होतें व सर परशुरामभाऊ कॉलेजचे एक नामवंत प्राध्यापक म्हणून मी त्यांना ओळखीत होतों. त्यांच्या कीर्तनाचा लाभ मला त्या दिवशीं प्रथम झाला. डोक्याला पांढरा शुभ्र फेटा, भालीं पांढरें उभें गंध, गळ्याभोंवतीं पांढरें शुभ्र उपरणें, अंगांत करड्या रंगाचा खादीचा गळेबंद कोट आणि मुखावर एक प्रकारचें तेज आणि प्रसन्नता. ज्ञानदेव एकनाथाचे मिश्रित स्वरूप मी पुढें पाहातों आहे कीं काय असा मला भास झाला. एका मोठ्या नामवंत विद्यालयाचे प्राचार्य, आवतींभोंवतीं जमा झालेल्या त्या खेडूत स्त्री-पुरुषांना हरिकीर्तनांत गुंगवून स्वतः त्यांत दंग झालेले पाहून मला त्यांच्याबद्दल आदर आणि आपुलकी वाटूं लागली. अज्ञान अंधःकारांत पिचत पडलेल्या पददलितांच्या उद्धाराचें कार्य गेलीं ७०० वर्षे ज्या संतांनीं भागवत-धर्माची स्थापना करून आरंभिलें, आणि सारा बहुजन समाज जागृत करण्याचे अटोकाट प्रयत्न केले, त्यांच्याच कार्याची धुरा शिरावर घेऊन आजच्या अडाणी समाजाला तारण्याचें पवित्र कार्य श्री. सोनोपंत करीत आहेत हें पाहून, बहुजनसमाजाचा खराखुरा कर्मवीर अडाणी जनतेला हरिभक्तीचें खरें स्वरूप पटवून देऊन सुखाचा संसार दाखवीत आहे असें मला वाटूं लागलें.

खेडुतांच्या सहवासाचा विटाळ मानणारा आमचा आजचा सुशिक्षित ज्या मातृविद्यालयांत तयार होतो, त्याच मातृविद्यालयाचे प्रधान प्रमुख खेडुतांच्या मध्यें बसून 'एकमेकां साहाय्य करूं। अवघे धरूं सुपंथ' हा लोकशिक्षणाचा पवित्र महामंत्र स्पष्ट करून सांगत असतांना त्यांच्याबद्दल आदर कोणाला वाटणार नाहीं ? निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव, तुकाराम ही नामावलि वारकरी संप्रदायाची परंपरा आहे. बहुजनसमाजाला कीर्तनाच्या द्वारां, भजनाच्या मार्गानें हरि, हरिनाम आणि हरिभक्तीची गोडी लावून जीवन आनंददायी व सुखाचें करण्यास त्यांनीं आपल्याला दृष्टि दिली. लोकजागृति, लोकशिक्षण, लोकसंग्रह, लोकसंघटना व लोककल्याण करून या थोर परंपरेनें बृहन्महाराष्ट्रांतील बहुजनसमाज जागृत केला. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून ह. भ. प. सोनोपंतांनीं महाराष्ट्रांत आपल्या अमृत वाणीनें बहुजनसमाज आपल्याकडे खेंचला. एका बाजूला उच्च शिक्षणाचें कार्य राष्ट्राच्या भावी आधारस्तंभांना देतां देतां, दुसऱ्या बाजूला भागवत धर्माची पवित्र शिकवण देण्याचें मौलिक कार्य त्यांनीं केलें, व महाराष्ट्राचे एक आदर्श प्राचार्य, निष्ठावंत धर्मप्रचारक, नेकीचे समाजसुधारक म्हणून बहुमानाचें स्थान मिळविलें.

आमच्या साधुसंतांनीं लिहिलेल्या मौलिक साहित्याची आमच्या कांहीं इंग्रजी शिकावू पंडितांकडून आजही उपेक्षा केली जाते. संत वाङ्मयाची आतांपर्यंत आमच्याकडून व्हावी तशी सेवा व संशोधन झालेलें नाहीं, आम्हीं त्याचा अभ्यास केलेला नाहीं. गबाळग्रंथी टाळकुटयांचें वाङ्मय म्हणून आमच्या पैकीं अनेकांनीं त्या साहित्याकडे पूज्य भावनेनें कधीं पाहिलेलें नाहीं. मात्र अभ्यासाविना निष्कारण अवहेलना करून व टीकेची झोड उठवून या लोकोपयोगी वाङ्मयाला आम्ही आजपावेतों पारखे झालों. संतवाङ्मयाचा अभ्यास करून जर आम्ही त्यांतला गोडवा चाखूं तर त्यांतील मर्म आम्हाला सहज कळेल. या दृष्टीनें पुणें विद्यापीठाचे कोर्टाचे सभेंत ज्यवेळीं अंदाजपत्रकावर चर्चा झाली त्या वेळीं, इतिहास संशोधन कार्याबरोबरच महाराष्ट्रांतील संत वाङ्मयाचेंही संशोधन होऊन आज माहीत नसलेल्या संतांच्या जीवनकार्याची ओळख, व ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, रामदासादि संतांची अमोल जनसेवेची माहिती आमच्या तरुणांना करून द्यावी म्हणून मीं प्रस्ताव मांडला. कोर्ट चहापानासाठीं सुटल्यानंतर प्राचार्य दांडेकर मजकडे आले. त्यांनीं माझी पाठ थोपटली आणि म्हणाले, "केशवराव तुमचा मुद्दा मला फार आवडला." प्राचार्य सोनोपंतांनीं मला दिलेलें हें प्रोत्साहन मी संताशीर्वादच मानतों. संतांनीं उपदेशिलेला मार्ग प्रत्यक्ष आचरणांत आणणारे फारच थोडे. मात्र तोंडपाटिलकी करणारे पुष्कळ. गेल्या महिन्यांत ते व मी अशाच एका शिक्षण संस्थेंत कांहीं निमित्तानें एकत्र आलों असतांना हल्लींच्या राजकारणावर एकाएकीं एकानें चर्चा सुरू केली. वेळकाळ बघून त्याप्रमाणें टोपी बदलणाऱ्या व स्वतःचा स्वार्थ साधून घेणाऱ्या संधिसाधूंना त्यांनीं एक समर्पक दाखला दिला कीं, वारकऱ्यांत जसे बारशीवाले, तसे अलिकडे गांवांत कांग्रेसवाले झाले आहेत. एकादशी करणाऱ्यांना बारशीला थोडें चमचमीत चवदार द्वादशी सोडतांना दिलें जातें. क्षेत्राचे ठिकाणीं भाविक भक्त अशा एकादशी करणाऱ्यांना जेवणावळ देतात. अशा भोजनावळींना लाग फुकटांत पदरीं पाडणाऱ्या दिखाऊ हरिभक्तांच्या भुतावळीला त्यांनीं बारशीकर म्हटलें, व अशाच प्रकारचा वैयक्तिक स्वार्थ साधण्यासाठीं देशभक्तीचीं खोटीं आवरणें घालणाऱ्यांनाही त्यांनीं तो समर्पक शब्द योजिला.

जनताजनार्दनाची पिळवणूक करणाऱ्यापासून त्यांचें संरक्षण करण्यासाठीं ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकारामादि संतांनीं जिवापाड श्रम केले; तेंच पवित्र जीवनकार्य ह. भ. प. दांडेकरांनीं आज महाराष्ट्रांत अंगिकारलेलें आहे.

अंतरीं निर्मळ वाचेचा रसाळ । त्याचे गळां माळ असो नसो
आत्म-अनुभवीं चोखाळल्या वाटा । त्याचे माथा जटा असो नसो
परद्रव्या अंध निंदेसी जो मुका । तोचि संत देखा तुका म्हणे.

या दृष्टीप्रमाणें प्राचार्य सोनोपंत हे आपल्या महाराष्ट्रांतील आधुनिक संत
५

आहेत. ज्ञानदेव-तुकारामाचें नांव जसें आज आपल्या महाराष्ट्रांत लहानथोरांचे मुखीं आहे, तसेंच पंडित ईश्वरचंद्र विद्यासागरांचें नांव बंगाल्यांत सर्वांमुखीं आहे. एकोणिसाव्या शतकांतलि या एकनाथाची आठवण प्राचार्य सोनोपंत दांडेकरांना मी ज्या ज्या वेळीं पाहतों त्या त्या वेळीं मला होते. प्राचार्य दांडेकरांची विद्यासागरांप्रमाणेंच सारा महाराष्ट्र मान तुकवील अशींच अभिनव कामगिरी आहे. लोकशिक्षण, लोकजागृति आणि लोककल्याण हें माझ्या समजुतीप्रमाणें त्यांचें अंगिकृत कार्य आहे. पददलितांचे उद्धारक, गरिबांचे कैवारी, दुःखितांचे आधार आणि विद्यार्थ्यांची कामधेनु अशा ह्या विसाव्या शतकांतील थोर संताला माझे शतशः प्रणाम.

प्राचार्य दांडेकरांचें व्यक्तिमत्त्व

लेखिकाः— सौ. मुक्ताबाई दीक्षित


प्रो. दांडेकरांच्या व्यक्तिमत्त्वांतलि 'ऊनसावली'चा खेळ पाहतांना मौज वाटे. त्यांच्या अंतरंगांतला क्वचित् प्रसंगीं दृश्य होणारा खेळकरपणा आल्हाददायी वाटे. पण एकदां मनानं घेतलेली आदरयुक्त भीति — धास्तीच म्हणाना — त्या कॉलेजमधल्या दोन वर्षांत कधींच कमी झाली नाहीं. आणि आज? सोळा वर्षांपूर्वीच्या दृष्टिकोनांतून प्रो. दांडेकरांच्याकडे पाहातांना—नव्हे आपल्याच खुळ्या कल्पनांची छाननी करतांना इतकी मौज वाटते! प्रो. दांडकर तेच आहेत, अंतरंगाला शुद्ध अध्यात्माची तळमळ, भोंवताली खडतर कठोर व्यवहाराचा सावळागोंधळ, पण त्या दोहोंची यशस्वी सांगड घालतांना, त्यांच्या बावनकशी ध्येयवादाची दीप्तिमान् कांति यत्किंचितृहि मलिन झाली नाहीं. दैनिक आयुष्याला धकाधकीची मुरड घालतांना अंतिम ध्येयाला कधीं दृष्टिआड करावं लागलं नाहीं. आषाढी—कार्तिकीला पंढरीची वारी जितक्या श्रद्धेनें अगदीं तितक्याच चिकाटीनें सीनेटमधील जागेकरतां खटपट. ज्ञानेश्वरीवर प्रवचन जितक्या विनाकष्ट व आस्थेनें, तितक्याच आस्थेनें नातेवाईकांचीं लग्नें वगैरे मामुली व्यवहारांत लक्ष घालणें. दिंडीबरोबर पंढरीला जातांना टाळ वाजविण्यांत जी तन्मयता, तीच तन्मयता शि. प्र. मंडळीचा मार्ग सुकर व्हावा म्हणून खटपट करण्यांत.

गेल्या सोळा वर्षांत आम्हांला क्रमाक्रमानें प्रतीत झालेलं दांडेकरांचं व्यक्तिमत्त्व हें अशा प्रकारचं आहे. त्यांच्यांत साधेपणा तर आहेच आणि त्याचा फारसा शोध करण्याचं कारण पडत नाहीं. पण त्याबरोबरच वेळ राहूनहि भोंवतालच्या समाजाशीं

समरस होण्याची पात्रता, खेळकरपणा, बऱ्याच प्रमाणांत मिस्कीलपणाहि आहे. मात्र हे सर्व व्यक्तिविशेष गांभिर्याच्या व श्रद्धाळूपणाच्या अशा कांहीं आवरणाखालीं दडलेले आहेत कीं त्यामुळें वरवर पाहणाराला प्रथमदर्शनीं त्याचा चटकन् कयास लागत नाहीं.

वाङ्मयाच्या भाषेंत मानवी वैशिष्ट्याचं वर्णन करावयाचं झालं तर मी म्हणेन कीं, दांडेकरांचे गुणविशेष हे आर्नोल्ड बेनेटनें वर्णन केलेल्या अक्षरवाङ्मया-(Classic) च्या गुणविशेषाप्रमाणें आहेत. प्रथमदर्शनीं यांच्या वैशिष्ट्याची तुमच्यावर छाप पडणार नाहीं, त्यांच्याबद्दल वाटावा तितका आपलेपणा वाटणार नाहीं; पण जास्त सहवासानंतर त्यांच्याबद्दल वाटूं लागणारा आदर हा मात्र चिरस्थायी स्वरूपाचा असल्यावांचून राहणार नाहीं.

अक्षरवाङ्मया (Classic) च्या शैलीचं वर्णन करतांना बेनेट म्हणतो, " As a rule, the people whom you have come to esteem communicated themselves to you gradually; they did not begin the entertainment with firework." आणि त्याच्या बहुमोल अन्तरंगाबद्दल म्हणतो, " The beauty of a classic is not at all apt to knock you down. It will steal over you rather." दांडेकरांच्या व्यक्तित्वाला हें वर्णन किती यथार्थतेनें लागू पडेल ? '*



उदबत्त्यांचा मधुर सुवास सगळीकडे दरवळला आहे, विजेच्या दिव्यांच्या लखलखाटानं सारं आसमंत सुशोभित झालं आहे, जुन्या काळच्या हंड्या झुंबरांमध्ये तेवणाऱ्या मेणबत्त्यांनी जागेची शोभा चित्तवेधक केली आहे, देवळांत जमलेल्या माणसांची आपापसांत कुजबूज चालली आहे; लोक आंत येत आहेत, बाहेर जात आहेत; मध्यभागावरील विठोबाची मूर्ति आपल्या भक्तांचा तो अपूर्व सोहळा डोळ्यांत

* सन १९४१ मध्ये सर परशुरामभाऊ कॉलेजच्या [illegible] विद्यार्थिनींच्या संमेलनांत [illegible] केलेल्या [illegible] उतारा.

सांठवीत उभी आहे, अंगावर घातलेली फुलांची माळ आपल्या एका महान् भक्ताच्या गळ्यांत घालण्यासाठीं विठोबा उतावीळ झाला आहे... आणि अशा प्रकारच्या या मंगलमय वातावरणांत एकदम टाळांचा खणखणाट होऊन "पुंडलीक वरदे हरि विठ्ठल" असा जयघोष मोठ्या उत्साहानं सर्वत्र निनादूं लागला आहे...

एखाद्या स्वप्नांतून खाडकन् जाग यावी त्याप्रमाणं मीं एकदम दचकून समोर पाहिलं. माझ्या डोळ्यांवर माझा विश्वास बसेना. इतर कीर्तनकारांप्रमाणें विशिष्ट पद्धतीचा पोषाख करून दांडेकर कीर्तन करीत असतील या समजुतीनंच मी त्यावेळीं देवळांत शिरलें होतें, आणि माझ्या मनांतलि त्या भावनेमुळेंच सभोंवतालच्या वातावरणांतून माझी नजर भिरभिरत होती. पण आमच्या कॉलेजांत येतात त्याच पोषाखांत दांडेकरांना कीर्तनासाठीं उभे राहिलेले बघून मला कमालीचं आश्चर्य वाटलं. बसल्याजागेवरून एकवार उठून मीं त्यांच्याकडे पाहिलं आणि मनाची खात्री करून घेतली हे कीर्तनकार म्हणजेच आमचे प्राचार्य दांडेकर आहेत. फक्त नजरेंत भरणारा फरक त्यावेळीं त्यांच्यांत दिसला असेल तर तो आम्हाला शिकवीत असतांना हातांत असणाऱ्या पुस्तकाऐवजीं त्यांनीं हातांत धरलेल्या तंबोरीवरून !

उजव्या हातानं घट्ट धरून कानाशीं भिडलेल्या तंबोरीच्या साथीवर जेव्हां दांडेकरांनीं विठ्ठलनामाचा गजर सुरू केला आणि त्यांच्या साथीदारांनींहि त्यांना विलक्षण आपुलकीची साथ दिली तेव्हां मात्र,

" नामदेव कीर्तन करी । पुढें देव नाचे पांडुरंग
जनी म्हणे ज्ञानदेवा । बोला अभंग "

या जनाबाईच्या अभंगाची मला आठवण झाली. क्षणार्धांत मराठीच्या बालपणच्या काळांत माझं मन खेचलं गेलं. माणुसकीचा महान् धर्म बहुजनसमाजाला शिकवावा म्हणून टाळमृदंगांच्या निनादांत आपल्या विठ्ठलनामाच्या संकीर्तनानं अखिल महाराष्ट्राचं हृदय काबीज करणाऱ्या थोर ज्ञानदेव नामदेवांचा पुन्हां आज दांडेकरांच्या रूपानं साक्षात्कार झाल्याची कल्पना मनाला चाटून गेली. त्यामुळं थोडं ऐसपैस बसून घेऊन आजूबाजूंच्या श्रोत्यांकडे पाहात आणखी एकदां काळजीपूर्वक आमच्या प्राचार्यांकडे पाहिलं.

तुकारामाच्या एका अभंगावर आपलं भाष्य करीत असतांना मधून मधून प्राचार्यांचे साथीदार खड्या आवाजांत अभंग गात होते. दांडेकर लोकांना अर्थ समजावून देत असतांनाच "विठ्ठल ऽऽ विठ्ठल ऽऽऽ करीत पुढं जात होते. यावेळीं तिथं जमलेले सगळे लोक तोंडानं विठ्ठल नामाचा गजर करतांना कानावर येतांक्षणींच त्या माणसांप्रमाणं " विठ्ठल विठ्ठल " असं कांहीं न म्हणतां—

" विठ्ठल टाळ विठ्ठल दिंडी
विठ्ठल तोंडीं उच्चारा।
विठ्ठल अवघ्या भांडवला
विठ्ठल बोला विठ्ठल।
विठ्ठल नाद विठ्ठल भेद
विठ्ठल छंद विठ्ठल।
विठ्ठल सुखा विठ्ठल दुःखा
तुकयामुखा विठ्ठल। "

हा तुकारामाचा अभंग न कळत ओठांवर घोळूं लागला! ... आणि त्याच क्षणाला माझ्या मनानं असा निर्णय घेतला कीं, काय वाटेल तें झालं तरी आपण दांडेकरांनाच ज्ञानेश्वरीचा तेरावा अध्याय शिकवा असं सांगायचं. पण तें जमणार कसं असा मोठा प्रश्न मनांत उभा राहिला. दांडेकर आमच्या कॉलेजचे प्राचार्य असले तरी त्यांचा तो आम्हाला शिकवायचा कॉलेजमधला नेमलेला तास नव्हता! त्यामुळं दांडेकरांना शिकवायला कसं सांगायचं हा खरोखरच विलक्षण कठिण प्रश्न होता! तरीपण दांडेकरांचं त्यावेळचं कीर्तन ऐकतांना, जेव्हां तंबोरी खालीं ठेवून त्यांनीं अंगावरचं उपरणं खांद्यावरून बाजूला काढून, कमरेभोंवतीं बांधून कीर्तनकाराच्या भूमिकेंत रंगभरणी करायला सुरवात केली, तेव्हां निश्चितपणं मनाला असं वाटलं, एवढ्या लोकांना आपलं तत्त्वज्ञान समजावून देणारी व्यक्ति आपल्या विद्यार्थ्यांना तास नाहीं म्हणायची नाहीं!

आणि दुसऱ्या दिवशीं जेव्हां दांडेकरांच्या खोलींत भीतभीत पाऊल टाकून आम्ही कांहीं विद्यार्थ्यांनीं 'शिकवाल का' म्हणून त्यांना विचारलं तेव्हां मनापासून हंसून त्यांनीं होकार दिला. त्यावेळीं मला कल्पनातीत आनंद झाला. तेराव्या अध्यायांतील गुरुभक्तीचा अपार महिमा ज्ञानदेवाच्या एका महान् भक्ताकडून आपणाला ऐकायला मिळणार या भावनेनं मन आनंदानं भारून गेलं. "गुरु म्हणजे केवळ शिक्षक नव्हे, केवळ आचार्य नव्हे. शिक्षक किंवा आचार्य त्या त्या विशिष्ट ज्ञानाशीं आपला थोडाफार परिचय करून देत असतात. त्यांचा हात धरून आपण ज्ञानाच्या अंगणांत येतों. परंतु गुरु आपणांस ज्ञानाच्या गाभाऱ्यांत घेऊन जातो. त्या त्या ध्येयभूत ज्ञानाशीं गुरु आपणांस एकरूप करून टाकतो. ज्ञानाशीं तन्मय झालेला गुरु शिष्याचीहि समाधि लावतो." पूज्य साने गुरुजींच्या या वाक्याची मला याच वेळीं त्यावेळीं आठवण झाली. त्या कल्पनेनें आणखी आनंद झाला. ज्ञानेश्वरांवर अत्यंत प्रेम करणारे दांडेकर खरोखरच आपली समाधि लावूं शकतील याची मनाला खात्री पटली. पण त्याच वेळीं जेव्हां दांडेकरांनीं "तुम्ही मला कांहीं प्रश्न विचारा म्हणजे मी एखादा तास घेईन." असं मला उद्देशून म्हटलं तेव्हां [illegible] मात्र [illegible] ! त्यांनीं प्रश्नाचं नांव काढतांच मन गोंधळून गेलं. तरीपण [illegible],

करांसारखे प्राचार्य ज्या कॉलेजमध्यें आहेत तेथील आपण विद्यार्थी निदान या संत वाङ्मयाच्या बाबतींत तरी चोख असायला हवेत, अशी उगाचच फुशारकी मनांत आल्यामुळं कसलीच भाडभीड न बाळगतां मी चटकन् त्यांना एक प्रश्न विचारला, " ज्ञानेश्वरी लिहिण्यांत ज्ञानदेवांचा काय हेतू होता ? " माझा हा प्रश्न कानावर पडतांच दांडेकर मोठ्यांदा हंसले आणि म्हणाले, " त्यापेक्षां मग सगळंच पाहिजे असं म्हणाना ! " त्यावर आम्हालाहि हंसूं आलं. तेवढ्यावरूनच आमचा मनोदय त्यांना कळला असावा. कारण त्यानंतर क्षणभर विचार करून त्यांनीं सांगितलं, " पुढच्या आठवड्यांत तास घेईन मी. पुन्हां एकदां भेटा मला म्हणजे नक्की वेळ ठरवूं."

आणि सुदैवानं घडलंहि तसंच. जानेवारीच्या २१ तारखेस (१९४७) दांडेकरांनीं " **आणि माझें तंव आघवें। ग्रंथन येणेंचि भावें। जे तुम्ही संतीं हो आवें। सन्मुख सदा।** " या ओवीनं आम्हाला शिकवायला सुरुवात केली. आमच्या *पहिल्या प्रश्नापासूनच आरंभ झाला ! त्यामुळं आणखी पांच सात प्रश्न मीं त्यांच्याकडे* घायचा मोठ्या कसोशीनं प्रयत्न करायचा बेत मनांत आंखला. कसें कोण जाणें पण त्यावेळीं भराभर प्रश्न सुचले आणि क्षणाचाहि विलंब न करतां मीं प्रश्नांचा कागद टेबलावर ठेवून दिला. दांडेकरांना तें बघून कमालीचं समाधान वाटलं असावं असं त्यांच्या चेहऱ्यावरून दिसलं. विद्यार्थ्यांच्या अंतःकरणांतील ज्ञानार्जनाची तळमळ गुरूच्या चरणीं रुजूं झाल्याचा मला भास झाला.

" साहित्य सोनियाचिया खाणी।
उघडवीं देशियेचिया क्षोणी।
विवेक वल्लीची लावणी।
हों देईं सैंघ॥ "

ज्ञानदेवांची ही ओवी दांडेकरांच्या तोंडून त्यावेळीं ऐकली खरी, पण अजूनहि ती ओवी म्हणतांना दिसून आलेली त्यांची प्रसन्नता आणि दर शब्दागणिक प्रकट झालेला स्वाभिमान नजरेसमोरून हलत नाहीं. या ओवीची आठवण आली कीं, दांडेकरांच्या घरांतील त्यांच्या टेबलावरील ज्ञानदेवाची तेजोमय मूर्ति नजरेसमोर येते ! ज्ञानदेव आणि त्यांचे हे भक्त या दोघांच्याहि एकमेकांवरील निस्सीम प्रेमाचा हेवा वाटायला लागतो !...अशा वेळीं ज्ञानदेवानं दांडेकरांवरच इतकं प्रसन्न कां व्हावं असं मनांत आल्याविना राहात नाहीं. आणि आमच्या या प्राचार्यांना हरघडी दर्शन देणाऱ्या ज्ञानदेवाची गांठ पडली तर पाहावी म्हणून आळंदीच्या आसमंतांत मन भिरभिरायला लागतें.

एका तासांत आम्हाला पाहिजे तें सांगायचा बेत आमच्या प्राचार्यांनीं केला होता खरा. पण त्यांनीं त्यावेळीं एक सोडून ओळीनें सात तास घेतले ! आणि आम्ही

कधींहि विसरूं शकणार नाहीं इतक्या आपुलकीनं ज्ञानदेवांच्या विद्यावंशाची आम्हाला ओळख करून दिली. एवढेंच नव्हे तर "तेथ हरू म्हणे नेणिजे। देवी जैसे कां स्वरूप तुझें। तैसें हें नित्य नूतन देखिजे। गीतातत्त्व॥" या ज्ञानदेवांच्या कल्पनेबद्दल मनांत आत्मविश्वास निर्माण झाला.

एम्. ए. ची परीक्षा झाल्यानंतर "तुम्ही शिकवलंत म्हणून निदान मला तरी या जुन्या काळच्या प्रश्नपत्रिकेंत पहिल्या प्रतीचे गुण मिळाले" असं जेव्हां दांडेकरांना मीं सांगितलं तेव्हां ते नेहमींप्रमाणं मनापासून हंसले आणि म्हणाले, "खरं सांगूं का, तुम्ही चांगल्या रीतीनं पास झालांत हें उत्तम झालं...पण मला असं मनापासून वाटतं कीं, या पुस्तकी ज्ञानापेक्षां अगर केवळ परीक्षेंत यश मिळवून त्या वेळेपुरतं चमकण्यापेक्षां, माझ्या विद्यार्थ्यांनीं आपल्या अंगच्या गुणांचा विकास करून देशाची व धर्माची सेवा करावी. आणि या दृष्टीनं मी असं म्हणेन कीं, यापुढं तुम्ही आपल्या लेखनगुणाचा कसोशीनं विकास करावा..."

दांडेकरांचे हे विचार ऐकून क्षणभर आश्चर्य वाटलं मला. आणि तें एवढ्यासाठींच कीं, एम्. ए. ची परीक्षा जवळ आली असतां माझ्या हाताला रायटर्स क्रॅम झाल्यामुळें, परीक्षेला बसूं नका असा डॉक्टरांनीं सल्ला दिला असतांहि, "तुम्ही ड्रॉप मुळींच घ्यायचा नाहीं" असं आग्रहानें सांगणारे दांडेकर, मीं चांगलें यश मिळविलें असतांहि कौतुक करण्याच्या भानगडींत न पडतां असं कां बोलले? माझ्या हातासाठीं औषधोपचारापासून तों स्वतः मुंबईस येऊन मी पेपर लिहितांना चौकशी करून विद्यार्थ्याची काळजी घेणारे आमचे हे प्राचार्य, पेपर उत्तम रीतीनं लिहून उत्तम प्रकारचें यश मिळविलं म्हणून माझं कौतुक करतील, या भावनेनंच मी त्यांना भेटायला गेलें होतें. पण त्यांचं तें म्हणणं ऐकल्यावर अजून आपली परीक्षा संपली नाहीं, एवढेंच नव्हे तर आपणाला एका नव्या परीक्षेंत यशस्वी व्हायचं आहे यानी मात्र मनाला जाणीव झाली... आणि त्याचवेळीं खऱ्या गुरूचं दर्शन घडल्याचं मनस्वी समाधान मनाला मिळालं व त्यांना आदरानें नमस्कार करतांना त्यांचीच आवडती ओंवी आठवली "हें सारस्वताचें गोड। तुम्हींच लाविलें जी झाड। तरी आता अवधानामृतें वाड। सिंपोनि कीजे॥ आपल्या आवडत्या कलेची (प्रवचन कीर्तनाची) अहर्निश सेवा करणाऱ्या गुरूनं केलेला उपदेश क्षणाक्षणाला अजूनहि आठोनी स्थिरं अंतःकरणांत पसरवीत असतो.



एका रात्रीची गंमत!

कवि:—ग. रा. कवीश्वर, बी. एस्सी.

असाच गेलों एका रात्रीं ग्रंथकुटीमधिं अभ्यासा
परमाणूंच्या गुंतागुंती विषय काढला बहु खासा ॥ १ ॥

ब्रह्मानंदीं लागे टाळी, डोळे मिटुनी घेई जरा
चिंतन आणि मननाला हा आसन प्रकार उचित खरा ॥ २ ॥

समाधि उतरे, ऐकूं आला मृदंग, चिपळ्या टाळांचा
घोष कुठेंसा ध्वनिक्षेपकीं 'विठ्ठल विठ्ठल' नामाचा ॥ ३ ॥

अनुरोधानें ध्वनिच्या आलों विद्यार्थीगृहसमीप जरा
दिङ्मूढ झालों अती हर्षलों पाहुन आंतिल दृश्य पुरा ॥ ४ ॥

पार्शी फॅशन कोट पांढरा, शुभ्र उपरणें त्यावरती
अलग ठेउनी कर्णांना त्या फेटा बांधियला वरती ॥ ५ ॥

हास्याची ती अखंड ज्योती तेवत गौरमुखावरती
प्राचार्यांची सुंदर मूर्ती, कीर्तनरंगीं डोले ती ॥ ६ ॥

मधुरस्मितासह वाक्-गंगेचा श्रोत्यांवरती ओघ वळे
अमृताचा शिडकावा होउनी मी माझ्या जागींच खिळे ॥ ७ ॥

परमाणूंचा गोंधळ सरला झालों उन्मन आणि स्वतंत्र
"कर्मांचा तो यज्ञ करावा" देती दिव्य महामंत्र ॥ ८ ॥

गौरव गातां गुणगानाचा गाथा होइल सांगुं किती।
दिव्यत्वाची जेथ प्रचीती तेथें कर माझे जुळती ॥ ९ ॥



माझ्या मतें 'मामा'

लेखक—श्री. रामचंद्र गणेश जोग, M. A., M. ED.

गेल्या जवळजवळ दीड तपाच्या कालावधींत मला जें प्राचार्य दांडेकरांच्या जीवनाचें दर्शन घडलें तेंच त्यांच्या जीवनाचें सत्यदर्शन होय, असा आग्रह धरण्याचें मला मुळींच कारण नाहीं. माझ्यासारख्या सामान्य संसारी माणसाला दांडेकरांची आध्यात्मिक भूमिका संपूर्णांशानें समजेल हेंच मुळांत असंभवनीय. म्हणून प्राचार्य दांडेकरांचें व्यक्तित्व कशांत आहे हें ठाम स्वरूपांत सांगण्यापेक्षां, माझ्या दृष्टीला ते कसे दिसतात हेंच सांगणें योग्य वाटल्यावरून 'माझ्या मतें मामा' हें शीर्षक या लेखाला दिलें आहे. 'प्राचार्य दांडेकर' यापेक्षां कॉलेजबाहेरील जगांत ते 'मामा' याच नांवानें परिचित असल्याचें पुष्कळांना माहीत आहेच.

मी मामांना सामान्य व्यक्ति समजत नाहीं. असामान्य बुद्धिमान् व्यक्तींना जें जमलें नाहीं, सश्रद्ध सनातन्यांना जें साधलें नाहीं, भाविक भक्तांना जें लाभलें नाहीं, तें त्यांना जमलें आहे, तें त्यांनीं साधलें आहे, तें त्यांना लाभलें आहे; आणि म्हणूनच बुद्धिमान् व्यक्तींना त्यांचा सहवास हवाहवासा वाटतो. सश्रद्ध सनातन्यांना ते आपले आहेत असें वाटतें, आणि भाविक भक्तांची तर त्यांच्याच जीवनदर्शनानें भगवंताविषयीं श्रद्धा वाढावते. पण त्यांच्या जीवनाला जी ही एक असामान्यता प्राप्त झाली आहे, ती कांहीं सहजासहजीं नाहीं. त्याकरतां त्यांना फार मोठी तपश्चर्या करावी लागली आहे. त्यांनी ज्या आश्रमाचें पालन करून समाजाला 'नैष्ठिक ब्रह्मचर्य' ही कांहीं कविकल्पना नाहीं अगर सांगोपांगीची गोष्ट नाहीं, तर अगदीं शक्य गोष्ट आहे, हें सिद्ध करून दाखविलें आहे, तो ब्रह्मचर्याश्रम किती कठिण आहे याची कल्पना सिवाय गृहस्थाश्रमी जे लोक आहेत त्यांना खास येईल. आजच्या वैज्ञानिक व विकारी आणि भौतिकवादी युगांत 'क्षुरस्य धारा निशिता दुरत्यया दुर्गं पथस्तत् कवयो वदन्ति ।' असा जो परमार्थ पंथ तो त्यांनी [illegible] आक्रमिला आहे, असें त्यांच्या [illegible] [illegible] भग्न होतो.

विकारांचा खळखळाट त्यांना अस्थिर करीत नसला, तरी एका काळीं, चुकूनहि या कामक्रोधादि विकारांनीं आपणांवर विजय मिळवूं नये, व: आपल्या ध्येयांत अडथळा आणूं नये म्हणून त्यांनीं फार कडक रीतीनें यमनियमांचें पालन केलें आहे. भंडाऱ्या-वर जाऊन एकान्तवासांत त्यांनीं श्रद्धेनें ज्ञानेश्वरी व तुकारामाचा गाथा यांचीं पारायणें केलीं आहेत. स्त्रीविषयक वार्ता शक्य तितक्या कमी कानीं पडतील असा प्रयत्न तर ते करीत यांत नवल नाहीं, पण कांहीं एक काळ स्त्रीजवळ चुकूनहि एक शब्दहि बोलावयाचा नाहीं अशा व्रतानें ते राहिले आहेत. शरिराचे चोजले, जिभेच्या चवी परमार्थांत व्यत्यय आणतात म्हणून त्यांनीं त्यावर कडक निर्बंध घालून त्यांना आपल्या ताब्यांत आणलें आहे. वाचेनें विकारयुक्त शब्द जाऊं नयेत, मनानें विषय-चिन्तन होऊं नये म्हणून अहर्निश सद्‌ग्रंथांचें वाचन, ईशचिन्तन आणि कीर्तन-प्रवचन यांत स्वतःला गुंतवून घेतलें आहे. पण हें सर्व करीत असतांनाहि कोणत्याहि प्रकारची जाहिरात अगर बुवाबाजी त्यांनीं केली नसल्यानें त्यांच्या या तपश्चर्येची कल्पना तितकीशी नीट लोकांना येत नसावी. गीता ग्रंथ, व त्यावरील टीका ज्ञानेश्वरी, यांना जीवनग्रंथ कल्पून त्यांतील तत्त्वांचें आचरण करण्याचा कटाक्षानें प्रयत्न ते आजहि करींत असतात. त्यांनीं गाथा-गीता यांचीं केवळ भाविकतेनें नुसतीं पारायणें केलीं नाहींत तर त्यांतील रहस्य समजण्यासाठीं त्यांचा अभ्यास केला. त्यावरील भाष्यें अभ्यासलीं. त्याला अनुषंगानें असणारे वेदान्त ग्रंथ वाचले. त्यावरील पाश्चात्य लोकांनीं लिहिलेल्या टीका वाचल्या आणि बुद्धि व आत्मानुभव यांच्या आधारानें गीतेविषयीं आपलें असें एक निश्चित मत बनविलें आहे. मामांचीं ज्ञानेश्वरीवरील प्रवचनें ज्यांनीं ऐकलीं आहेत त्यांना मामा किती मोठ्या प्रमाणांत बुद्धिवादी गीताभ्यासू आहेत हें कळून येणें कठिण नाहीं. आणि म्हणूनच कर्म, भक्ति आणि ज्ञान यांचा उत्कट समन्वय त्यांच्या आजच्या जीवनांत आपणाला सहज दिसून येतो.

गीतेंतील कोणत्या श्लोकांत मामांच्या जीवनाचें यथार्थ जीवन आढळेल असें मला कुणीं विचारलें तर मी त्याच्या पुढें दोन श्लोक ठेवीन. त्यांपैकीं एक निर्मानमोहा' व दुसरा 'प्राप्यपुण्यकृतान् लोकान् योगभ्रष्टोऽभिजायते' हा. त्यांच्या जीवनाचें हें असामान्य दर्शन त्यांचे विविध प्रकारच्या माणसांशीं व संस्थांशीं जे व्यवहार चाललेले असतात, त्यांतील कर्तव्यबुद्धि, निर्ममत्व व नैष्कर्म्यता ज्यांच्या लक्षांत आली असेल त्यांनाच होईल.

आपली तत्त्वप्रणाली श्रोत्यांचा गळीं उतरविण्यासाठीं जसे इतर वक्ते नवे नव दृष्टान्त अभिनव पद्धतीनें मांडतांना आढळतात त्याप्रमाणें मामांच्या व्याख्यानांत फारसें कांहीं आढळेल असं नाहीं. तरी सुद्धां त्यांच्या व्याख्यानांत श्रोते रंगतात. कांहीं काळ अगदीं देहभान विसरतात. आपल्या जीवनांत मामा सांगत असलेलें

तत्त्वज्ञानं आणण्याच्या शपथाहि मनांतल्या मनांत ते घेत असावेत इतके ते तन्मय होतात हें अगदीं खरें. याला माझ्या दृष्टीनें दोन महत्त्वाचीं कारणें आहेत. एक म्हणजे त्यांचें अत्युज्ज्वल चारित्र्य व दुसरें प्रतिपाद्य विषयाबद्दल जबर आत्मविश्वास. त्यांच्या निर्मल चारित्र्याचा परिणाम एवढा मोठा आहे कीं, ते नुसते बोलायला उभे राहिले कीं, श्रोत्यांना कांहीं तरी विशेष ऐकायला मिळणार याबद्दल अगोदरपासूनच खात्री वाटूं लागते. आणि हे श्रोते म्हणजे त्यांचे भाविक (लोकदृष्ट्या भोळसट) भगत नव्हेत तर अगदीं पक्के तर्ककर्कश. त्यांच्या भाषेंत ओज आहे. एक प्रकारचें आत्मविश्वासाचें तेज आहे त्यांच्या वाणींत. ज्ञानेश्वरीवर आज सतत तिसापेक्षां अधिक वर्षे प्रवचनें करून त्यांची भाषा, त्यांची विवेचनपद्धति, त्यांची मांडणी इतकी पक्की झाली आहे कीं, अगदीं अक्षरशः झोंपेंतून उठवून त्यांना प्रवचन करायला सांगितलें तरी त्यांना त्यांत कोणतीच अडचण येणार नाहीं. हा अनुभव अगदीं अचानक रीत्या ज्या वेळीं ते प्रवचन करतात त्यावेळीं सहज पाहायला मिळतो. शुद्ध व स्पष्टोच्चार, निसर्गतः मोठा पण मधुर आवाज, त्यांत अनुभवाचा ओलावा, विषयावरील प्रभुत्व आणि सदाचरणाचें सामर्थ्य, इतक्या गोष्टींचें संपूर्ण पाठबळ त्यांना असल्यानें त्यांच्या भाषेंत Melody, Diction, Rhythm हीं आहेत कीं नाहीं याचा विचारहि लोकांच्या मनांत येत नाहीं. भाषेच्या सौंदर्यासाठीं त्यांना प्रयास पडत नाहींत. मात्र इतक्या वर्षांच्या प्रवचन पद्धतीचा परिणाम त्यांच्या व्याख्यानावर झालेला आहे हें नाकबूल करून चालणार नाहीं.

व्याख्यानाच्या बाबतींत जी गोष्ट तीच त्यांच्या लेखनाबाबत म्हणतां येईल. माझ्या मतें त्यांच्या 'ज्ञानदेव' चरित्राच्या भाषेइतकी 'ईश्वरवादा'ची भाषा राहिली नाहीं. कदाचित् मधल्या १२।१३ वर्षांच्या काळांत लिखाणापेक्षां कीर्तन-प्रवचनांतच त्यांचा काळ गेल्यानें बोली भाषा हीच त्यांची लेखी भाषा ठरली. आणि म्हणूनच त्यांच्या लिखाणांत आटोपशीरपणा, वाक्यांत विवक्षित ठिकाणीं येणारी लय वगैरे गोष्टी फारशा आढळत नाहींत. क्वचित् ती अतिशय लांबी वाटते. प्रवचनांतील विस्तृत वर्णन लेखनांत थोडक्यांत आणूनच तें अधिक चांगलें शोभतें. पण मामांच्या लेखनांत त्या गोष्टी, ते संवाद पुनरुक्त येतां तसेच उतरतात आणि म्हणून त्यांचा लेख वाचीत असतां आपण एखादें प्रवचन ऐकत आहोंत असा भास होतो. त्यांना लिखाणाच अगोदर [illegible]. त्यांनीच ईश्वरवादाच्या प्रस्तावनेंत 'प्रस्तुत लेखक लेखणीचा नव्हे' असें म्हटलें आहे. शिवाय लेखनापासून प्राप्त होणाऱ्या प्रतिष्ठा, प्रसिद्धि व पैसा या गोष्टींची थोडीही अपेक्षा त्यांना नाहीं. आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे कॉलेजमधें काम, पुणें विद्यापीठ, दर्शन प्रवचन, पंढरपुरच्या [illegible] व [illegible] [illegible] त्यांना [illegible] नाहीं, [illegible] नाहीं [illegible].

कुठें गाडींत वेळ मिळाला व ओळखीचें माणूस त्याच डब्यांत सुदैवानें नसलें, तरं पाठकोऱ्या कपट्यावर विषयावरील विचार उतर, रिकाम्या वेळांत एखादा परिच्छेद लिही, अगदीं उद्यां 'प्रसाद'ला लिखाण पाहिजेच असें झालें म्हणजे जरुर तर पहाटे उठून लिही, अशा स्थितींत त्यांचें लिखाण झालेलें आहे: ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे त्यांतील उणीवा कां आढळतात तें कळून येतें. त्यांचें 'ज्ञानेश्वरचरित्र' व 'ईश्वरवाद' हीं दोन्हीं पुस्तकें बाजारांत उपलब्ध नाहींत. अध्यात्मशास्त्राचीं मूलतत्त्वें ही त्यांची लेखमाला पुष्कळांना महत्त्वाची वाटून त्यांनीं मामांना तशीं पत्रें पाठविल्याचेंहि मला माहीत आहे. मामांना माझी एक नम्र विनंती आहे कीं स्वानंदासाठीं त्यांनीं कीर्तनें केलीं व ते करतात, पारमार्थिक जीवनाचा अनुभव यावा म्हणून ब्रह्मचर्याश्रम पत्करला, तशीं इतरांसाठीं त्यांनीं ग्रंथनिर्मिति करावी.

मामांना सन्त म्हणून संबोधण्यांत थोडी अतिशयोक्ति होण्याचा संभव असला, तरी त्यांना केवळ सज्जन म्हणून थांबणें यांत त्यांची योग्यता माझ्या दृष्टीनें फार कमी केल्यासारखी वाटते. संत आणि सज्जन यांत केवळ गुणांचाच नाहीं तर जातीचा फरक आहे. सन्त आणि सज्जन यांचे व्यवहार ज्या भूमिकेवरून चाललेले असतात त्यांत जमीनअस्मानाचें अन्तर असतें, सज्जनाला सत्याचें दर्शन, आत्मविषयक अनुभव असतोच असें नाहीं, पण सन्त मात्र आत्मानुभवी असतो. सन्त हा जगांतील विविध सुखदुःखादि व्यापारांकडे जितक्या निरिच्छतेनें व निर्भयतेनें पाहातो, जितकी अनासक्ति त्याला या जगांतील जीवनाबद्दल वाटते तितकी सज्जनाला वाटत नाहीं, किंबहुना तशी वाटण्याइतकी त्याची भूमिकाहि नसते. मामांच्या जीवनाकडे बारकाईनें पाहाणाराला मी म्हणतों त्याचा प्रत्यय येईल. 'हें विहित कर्म पांडवा। आपुला अनन्य ओलावा। आणि हेंच परम सेवा। मज सर्वात्मकाची।" या भगवद् उक्तीवर संपूर्ण श्रद्धा ठेवून कर्तव्य म्हणून कांहीं गोष्टी करायच्या, पण फळाबद्दल पूर्ण अनासक्ति ठेवावयाची, ही वृत्ति त्यांची विवेक वैराग्याच्या तपश्चर्येनें बनली असल्यानें सुखदुःखादि कोणतेच विकार त्यांना बेचैन करूं शकत नाहींत. पण दुःखप्रसंगांत त्यांचें आगमन दुःख हलकें करतें, व आनंदाच्या प्रसंगीं त्यांचें अस्तित्व त्या आनंदांत निश्चित एक विशेष प्रकारची भर घालतें ही गोष्ट पुष्कळांनीं अनुभविलीहि असेल. लग्नसमारंभाला त्यांनीं नुसतें हजर तरी रहावें अशी अतीव इच्छा कित्येकांच्या मनांत जी वास करते, त्याचें कारणहि दुसरें तिसरें कांहीं नसून त्यांचें अस्तित्वच इतकें आनंददायी असतें. 'दर्शनें प्रशस्तीसि ठावो।' हें जें ज्ञानेश्वरींत वर्णन आहे त्याची आठवण मामांच्या दर्शनानें होते असें मला तरी वाटतें. जीवनमरणाचें तत्त्वज्ञान आत्मसात् केल्यामुळें, मानवी मर्यादा पूर्ण ओळखल्यामुळें त्यांचें जीवन आनंदमय झालें आहे. तुम्ही केव्हांहि त्यांच्याकडे जा, ते उद्विग्न स्थितींत कधींहि सहसा दिसणार नाहींत.

वेदान्ती आणि रडका, भगवद्भक्त आणि अश्रु ढाळणारा (देवासाठीं नव्हे), मग तो वेदान्तीच नाहीं, तो खरा भगवद्भक्तच नाहीं असें ते नेहमीं कीर्तनांत सांगतात; आणि त्यांच्या जीवनाला याच कसोट्या लावून त्यांना सन्तांच्या समीप गेलेले असें मी म्हणतों.

मानवाला मृत्यूसारखी दुसरी कोणतीच गोष्ट भयंकर वाटत नसेल. मृत्यु ही ईश्वरसृष्टींतील एक ठरीव गोष्ट आहे. प्रयत्न करून जीव जगवणें हें मानवाचें काम आहे. ज्याचें तिकिट ज्या क्षणीं संपेल त्या क्षणीं तो ही भूमि सोडणार ही निश्चित गोष्ट आहे, वगैरे तत्त्वज्ञान पुराणांत कीर्तनांत याहिपेक्षां खुलवून सांगणें पुष्कळांना जमतें. पण प्रत्यक्ष व्यवहारांत घरांतील नातेवाईकाचा मृत्यु हा हें त्यांचें तत्त्वज्ञान केव्हांच ढांसळून पाडतो. पण मामांची या बाबतींतील वृत्तिही पक्की स्थिर झालेली आहे. मानवी कर्तव्याची मर्यादा संपली. ईश्वरी सत्तेंत आपला हात नाहीं हें पटून त्याप्रमाणें मन बुद्धि समतोल राखणें हें केवळ सज्जनाला तितकेंसें जमेल असें मला वाटत नाहीं. गीतेंत अनासक्ति योग आहे का, असें कुणी मामांना विचारलें तर त्याचें उत्तर निराळें येईल. पण त्यांच्या जीवनाचें जें एक विशेष वैशिष्ट्य म्हणून दाखवतां येईल तें मात्र त्यांच्या अनासक्तींतच आहे. आणि म्हणूनच त्यांना कुठून कुठेंहि जाण्याचा प्रसंग आला तरी त्यांच्या वृत्तींत, आनंदांत कसलीच चलबिचल अगर कमतरता येत नाहीं. त्यांचा आनंद त्यांच्याच जवळ असल्यानें नवीन जागेचें अगर वातावरणाचें त्यांना कांहींच वाटत नाहीं. पुण्याहून मुंबईच्या कॉलेजमध्यें ते आले तरी वृत्ति तीच, आणि परत गेले तरी वृत्ति तीच. 'सातारच्या पोलिसांकडून प्राचार्य दांडेकरांना त्रास' या बातमीनें त्यांच्या चाहत्यांना, त्यांच्या बद्दल आदर असणाऱ्यांनाच खेद वाटला. त्या एकदोन दिवसांत रस्त्यांत त्यांच्याजवळ चार तरी लोकांनीं माझ्यासमोर त्याबद्दल आपला भाव प्रगट केला. पण त्यासंबंधीं मामांना स्वतःला कांहींच वाटलेलें नाहीं. कारण आदल्या रात्रींच इतर गमतींपैकी ही 'एक गंमत' म्हणूनच त्यांनीं आम्हाला सांगितली होती. परमेश्वरी सत्तेवरील अनुभवाचा तो एक नमुना एवढाच त्यांच्या दृष्टीनें त्याचा अर्थ.

मामा पक्के प्रचारक आहेत. त्यांनीं जो प्रचार आज तीस वर्षें कीर्तनप्रवचन-द्वारा चालविला आहे व जो ते पुढेंहि हयातभर चालवतील असा माझी खात्री आहे, तो प्रचार सत्याचा आहे, तपाचा आहे, सत्प्रवृत्तीचा आहे, आत्मज्ञानाचा आहे, [illegible] आहे, सत्संगतीचा आहे, आणखी थोडक्यांत सांगायचें तर [illegible] प्रचार आहे तो. आज ज्या पद्धतीनें [illegible] तमाशा [illegible] थोर थोर आहेत त्यांत मामांना मी धरतों. मामांची [illegible] पण [illegible] मतें [illegible]. तो आज [illegible] धार्मिक [illegible] सोडून [illegible], [illegible]

नाहीं, राजकारणी लोकांना त्यांच्या कार्यांत व्यत्यय आणायचा नाहीं, आणि समाजसेवकांचा बुद्धिभेद करावयाचा नाहीं. ते स्वतः मात्र अनुभवानें ठरलेल्या मताप्रमाणेंच वागण्याचा प्रयत्न करतील. त्यांना कीर्तनांत स्वतःलाच एक अनुपम आनंद अनुभवायला मिळतो म्हणूनच ते प्रायः कीर्तनें पत्करतात. केवळ कीर्तनें ऐकून लोक शहाणे होतील, सदाचरणानें वागतील ही गोष्ट फारशी खरी नाहीं, हें त्यांच्यासारख्या बुद्धिमान व्यक्तीला केव्हांच कळलेलें आहे.

मामांच्या मतें 'समाजसेवा म्हणजे देवसेवा, देशसेवा हीच ईश्वरसेवा' असलीं विधानें पूर्णांशानें खरीं नाहींत. आज देशसेवा आणि देवसेवा, समाजसेवा आणि ईशसेवा यांची जी गल्लत केली जाते, समाजसेवकाला देवसेवेसाठीं अगर देवप्राप्ती-साठीं निराळा वेळ काढण्याची जरुरी नाहीं, जनताजनार्दनाची सेवा हाच मोक्ष-मार्गाचा सोपान, ही जी लाट आज उसळली आहे त्याबाबतींत मामांचें मत त्यांच्या-हून निराळें आहे. समाजसेवकाला परमात्म्याचा अनुभव प्राप्त होणार नाहीं. 'जग अवघें देव' हें तो तोंडानें सांगत सुटेल, बुद्धीलाहि कदाचित् तें पटेल अगर तो तें पटवील, पण तें अनुभवायला ईशचिन्तनाचीच जरुरी आहे, त्याला भगवत्भक्ति हाच एक उपाय आहे. साहित्य आणि चारित्र्य याबद्दलाहि त्यांचीं मतें निराळीं आहेत. मानवी जीवनांत नीतीला असलेलें स्थान आजच्या वाङ्मयसेवकांनीं लक्षांत घेतलेलें नाहीं. आणि ज्यांनीं 'नीतीला' अधिष्ठान मानून आपल्या जीवनाचा मार्ग आंखला व आक्रमिला, इतकेंच नाहीं तर, त्यांच्याविषयीं बरें मत नसणाऱ्यांकडून आपल्या निर्मल चारित्र्याविषयीं धन्योद्‌गार काढायला लावले आहे, अशा मामांचा, उत्तम साहित्यिक हा चारित्र्यवान असलाच पाहिजे, हा दंडक असावा यांत आश्चर्य काय!

कोणत्याहि परिस्थितींत स्वतःच्या कामासाठीं कोर्टाची पायरी चढायची नाहीं व वर्तमानपत्री लिखाणाला उत्तर द्यायचें नाहीं, या दोन गोष्टी मामांच्या अगदीं ठरून गेलेल्या असाव्यात. आणि त्यामुळें त्यांचें नुकसानहि झालेलें आहे. प्रत्येक बाबतींत आपलेंच बरोबर असूनहि तें सिद्ध करण्याच्या खटाटोपांत अट्टाहासानें काळ फुकट दवडण्यापेक्षां, तेवढाच वेळ ईशचिन्तनांत अगर सत्कार्यांत घालविणें त्यांना अधिक पसंत असावें. प्रतिपक्षाला पटवून देण्यांत आपली आध्यात्मिक उन्नति ती काय साधणार, असांहि त्यांचा भाव असेल. एकच उदाहरण दिलें म्हणजे पुरें होईल. पंढरपूरच्या हरिजन मंदिरप्रवेशाच्या वेळीं सानेगुरुजींनीं एका लेखांत प्राचार्य दांडेकरांना, वेदान्त शिकवूनहि तो स्वतःला मुळींच समजलेला नाहीं, असें थोडें धाडसी (माझ्या दृष्टीनें) विधान केलें होतें. खरें म्हणजे वेदान्त हेंच ज्यांचें जीवन आहे व तें व्हावें हाच ज्यांचा आग्रह, त्यांना तो समजला नाहीं, हा आरोप करणारे साने गुरुजी हे ख्यातनाम समाजसेवक त्यागी, साहित्यिक म्हणून प्रसिद्ध; शिवाय पंढरपूरचा त्यांचा दिव्य उपवास! साहजिकच अशा माणसानें केलेल्या विधानांत कांहींतरी अर्थ

असला पाहिजे असें सामान्य माणसाला वाटणें अगदीं योग्य होतें. पण तरीहि मामांनीं त्याला कांहींच उत्तर दिलें नाहीं. त्यांनीं तें शांतपणें वाचलें व आपल्या ठराविक पद्धतीप्रमाणें ते वागले. या उलट सानेगुरुजींच्या दुःखद निधनाची वार्ता ज्यावेळीं त्यांच्या कानावर आली त्यावेळीं त्यांनीं पुढील उद्गार माझ्याच जवळ काढले. "एक निरलस कार्यकर्ता व चांगला साहित्यिक गेला, वाईट गोष्ट झाली" व आपल्या अधिकारांत, कॉलेजचे ते विद्यार्थी होते म्हणून कॉलेजला सुटी दिली. मतभेद प्रामाणिक असूं शकतात पण त्यामुळें व्यक्तीचें सर्वच जीवन कुचकामाचें आहे असें मामांना कधींच वाटत नाहीं.

माझ्या मतें मामा बुद्धिवाद्यांना जितके भावनाप्रधान आहेत असें वाटतें तितके ते भावनाप्रधान खास नाहींत. उलट भावनावाद्यांना जितके ते बुद्धिजीवी वाटतात तितके ते बुद्धिवादीहि नाहींत. एकदोन उदाहरणें पुरें होतील. ज्ञानेश्वरी हा त्यांचा जीवनग्रंथ आहे, आणि म्हणून त्यांना त्याच्याबद्दल मूर्तिपूजका इतका आदर असणें अगदीं स्वाभाविक आहे. त्यासाठीं इतर ग्रंथांची लोक जशी पूजा करतात तशी त्यांनीं ज्ञानेश्वरीची प्रत देव्हांत ठेवून त्याची पूजा केली असती तरीहि त्यांत विशेष कांहीं वाटण्यासारखें नाहीं. पण टेबलावर पडलेल्या अनेक पुस्तकांप्रमाणेंच ज्ञानेश्वरीची प्रत टेबलावर असली व त्यांना कांहीं लिहिण्यासाठीं खालीं धरायला हवें असलें तर ते ती प्रत खालीं धरणार नाहींत. दुसरें कांहीं धरण्यासारखें टेबलावर असलें तर उठून ते घेतील, पण ज्ञानेश्वरीचा उपयोग पुष्टिपत्रासारखा ते कधींहि करणार नाहींत. अचानक प्रवचनाच्या वेळीं कांहीं नसलें, तर निदान आपलें उपरणें तरी ज्ञानेश्वरी खालीं धरून ती ते जमिनीवर ठेवतात, हें तर पुष्कळांना माहितच आहे. बुद्धिवादी माणूसहि भावनाप्रधान असूं शकतो याचेंच हें उदाहरण नाहीं का? पुस्तकें हीं पुस्तकांतील ज्ञानासाठीं आहेत. तें झाल्यावरही त्यांची किंमत [illegible] ज्ञानेश्वरीच्या बाबतींत त्यांच्याजवळ आहे, ही गोष्ट त्यांच्या भावनेचीच द्योतक नव्हे काय? इतर वेळीं चुकूनहि वाणींतून अश्लील शब्द जाणार नाहीं इतकी संयम ठेवून घेतलेल्या मामांनीं कीर्तनांत 'जोग महाराजांचें वाक्य म्हणजे आम्हाला वेद-वाक्य' असें म्हणून त्यांच्या टीकेंतील थोडें अश्लील असलें तरी तें [illegible] उच्चारावें, यांत गुरुनिष्ठा व्यक्त होत असली तरी तिचें अधिष्ठान बुद्धि म्हणतां येईल का?

या उलट त्यांनीं 'दिनरजनीं हाचि धंदा गोविंदाचे पवाडे।' या तुकारामोक्ती-प्रमाणें भाळेभोळे कीर्तनप्रवचनें, दिंडीबरोबर पंढरपूरची वारी वगैरे, या गोष्टीमुळें [illegible] पंढरपूर यात्रा, दर्शनासाठीं मामा उत्सुक असतात असें कुणाला वाटणें स्वाभाविक आहे. पण तसें मुळींच नाहीं. पंढरपूरला दोनदा [illegible] निदान आठवडाभर मुक्काम असतो. पण [illegible] दिलें व दर्शन घेतलें. [illegible] एकादशीलाहि [illegible] ते नाहींत.'

दर्शनासाठीं दुसऱ्याचे उपकार घेणें, त्याला त्रास देणें, पोलिसपहाऱ्यांत तें गर्दीचें दर्शन, या व असल्या गोष्टीमुळेंहि असेल, त्यांना तसल्या दर्शनाबद्दल एकप्रकारची किळस येत असेल. पण ते एकादशीलाहि देवळांत जाण्याचा आग्रह धरीत नाहींत ही सत्य गोष्ट आहे. बुद्धिवादी मनुष्यच आपल्या प्रिय दैवताची मानसपूजा करून आषाढी कार्तिकी एकादशीच्या दिवशीं दर्शन न करतां समाधानी राहूं शकेल. भावनाप्रधान माणसाला तें खास जमणार नाहीं. 'मनवाचातीत तुझें हें स्वरूप' हें जसें ते बुद्धीच्या डोळ्यानें अनुभवतात, तसेंच 'भक्तीचिया मापें मोजितों अनन्ता।' हेंही भावनेच्या सामर्थ्यानें सहज शक्य आहे याची त्यांना जाणीव आहे.

मोठ्यांच्या जीवनांतलि छोट्या गोष्टींचेंहि सामान्य जनांत एक प्रकारचें कुतूहल असतें. मामा जीवनांतील सामान्य माणसाला कराव्या लागणाऱ्या गोष्टी कशा करीत असतील, हा एक कौतुकाचा भाग पुष्कळांना वाटण्याचा संभव आहे, आणि म्हणूनच पुढील कांहीं गोष्टी नमूद कराव्याशा वाटतात. मामा चित्रपटाचे शोकी असणें हें त्यांच्या जीवनाशीं संपूर्ण विसंगत असलें तरी तो त्यांना अजिबात वर्ज नाहीं. आधुनिक विज्ञान शास्त्रांतील होत असलेले महत्त्वाचे बदल जाणून घेण्याची त्यांची इच्छा असल्यामुळें त्यांनीं कांहीं चित्रपट पाहिले आहेत. अर्थात् ते चित्रपट हे कोणत्या स्वरूपाचे असतील हें लिहिण्याचें कारण नाहीं. ते खाणावळीला व उपाहारगृहाला जरूर पडल्यास आश्रय देतात व सलूनमध्यें जायलाहि त्यांनीं स्वतःला मज्जाव केलेला नाहीं. अर्थात् तशी जरूर पडली तरच हें आहे. ते मराठी वाङ्मय, विशेषतः ललितवाङ्मय, फारसें वाचीत नसले तरी तत्त्वज्ञानाच्या ग्रंथांव्यतिरिक्त त्यांच्या टेबलावर Lost Horizon, Razor's Edge, Dragon's Teeth सारखीं इंग्रजी पुस्तकें पाहायला मिळतील. चहा ते घेत नाहींत, पण कॉफी अगर इतर पेयें त्यांना वर्ज नाहींत. अलिकडे क्वचित् ते विनोदानें म्हणतात 'आम्ही चहा पीत होतों त्यावेळीं डॉक्टर चहापेक्षां कॉफी चांगली असें म्हणत, आणि चहा न पिण्याची शपथ घेतल्यावर अलिकडे डॉक्टर चहा कॉफीपेक्षां बरा असें सांगतात.' नाटक ते तत्त्वासाठीं पूर्वी बिलकूल पाहात नसले (तसा उल्लेख कॉलेजाच्या सिल्व्हर ज्युबिली अंकामध्यें त्यांच्या शब्दचित्रांत एका लेखिकेनें केला आहे) तरी अलिकडे कॉलेज अगर शाळासम्मेलनाला अध्यक्ष म्हणून असतांना ते नाटकाच्या वेळीं कटाक्षानें गैरहजर राहात नाहींत. त्यांनीं क्रिकेटचे चौरंगी सामने पाहिले आहेत. इतकेंच नाहीं तर वेळ पडल्यामुळें रुइया कॉलेजचे प्रिन्सिपॉल असतांना ते 'प्राध्यापक वर्गाविरुद्ध विद्यार्थि' या क्रिकेटच्या सामन्यांत क्रिकेटहि खेळले आहेत. पहिल्याच चेंडूला त्यांचा झेल उडून ते बाद झाले ही गोष्ट वेगळी. आज ते सायकलवर बसत नसले तरी वारकरी शिक्षण-संस्थेंतील मुलांना शिकविण्यासाठीं ते सायकलवरून दोन दोन चकरा दिवसाला आळंदीला मारीत असत. एम्. ए. होऊन कॉलेजमध्यें शिकवीत असतांनाहि ते तालमींत कुस्त्या खेळले आहेत. ते उत्तम पोह-

णारे आहेत हें त्यांच्या विद्यार्थ्यांना माहीत आहे. जरूर पडली तर जेवण करतां येईल एवढें पाकशास्त्र त्यांना माहीत आहे. रुइयामध्यें ते असतांना, माटुंग्याच्या ब्लॉकमध्यें आम्ही हातानें जेवण करीत असतांना त्यांनीं पोळ्याहि भाजल्या आहेत. सुताच्या गुंड्याप्रमाणें सोन्याचीं वळणें त्यांना नवीन नाहींत. आणि पानांच्या पत्रावळीपासून चांदीच्या ताटापर्यंत सर्व त्यांनीं अनुभवलें आहे. पण त्यांची अशी जी एक विशिष्ट मनाची बैठक असते ती हिरहिरीची नाहीं, त्यांत अभिनिवेश नाहीं, तर ती 'करून अकर्ता' असणाऱ्या तत्त्वज्ञान्याची असते आणि म्हणूनच त्यांच्या जीवनाचें दर्शन अधिक रमणीय वाटतें. पैशांनीं मिळणार नाहीं, प्रतिष्ठेत असणार नाहीं असलें समाधान त्यांच्या निकट सहवासांत आहे.

त्यांच्या बसावयाच्या खोलींतील कपाटाकडे जर नजर गेली तर तिथें वस्तुसंग्रहालयच पाहायला मिळेल. चंदनाची पेटी, देवांच्या मूर्ति, निरनिराळ्या सुंदर दैनंदिन्या, क्वचित् कुणी आग्रहानें काढून घेतलेल्या फोटोच्या प्रती, गंधगोळ्या, तुळशीच्या माळा, एक ना दोन, कितीतरी वस्तू गुण्यागोविंदानें तिथें पडलेल्या आहेत. अगदीं याचप्रमाणें विविध क्षेत्रांतील माणसें सकाळपासून तों रात्रीं क्वचित् अपरात्रींहि त्यांच्या बैठकीवर एकत्र बसलेलीं आढळतील. कर्मठ सनातन्याइतकाच सुधारक, सिनेमा नट, तर्कट वेदान्त्याइतकाच पक्का व्यवहारी, उत्कृष्ट खेळाडू इतकाच बुद्धिमान् व्यासंगी, दरिद्रीनारायणाप्रमाणेंच गर्भश्रीमंत, विश्वविद्यालयीन तरुणीप्रमाणेंच भाविक वारकरीण–ही सर्व मंडळी निरनिराळ्या कार्यासाठीं त्यांच्याकडे आलेली असतात. हीं माणसें कित्येक वेळां स्वतःची सोय पाहून आलेलीं असलीं तरी त्यावेळीं मामांची गैरसोय होत आहे कीं काय याचाहि फारसा विचार करीत नाहींत. पण या सर्व लोकांना मामांच्या मिटस्त स्वभावामुळें म्हणा अगर 'दत्तार्णव प्रवर्ती गृहें' म्हणून म्हणा, प्रवेश मिळतो ही गोष्ट खरी. व या सर्वांशींच मामांनीं वागणें इतकें मोकळेपणाचें असतें कीं प्रत्येकाला परत जातांना एकप्रकारचें समाधान लाभत असावें असें त्यांच्या चेहऱ्यावरून दिसतें. गमतीची गोष्ट मात्र अशी कीं, यांपैकीं बहुतेक कोणीहि न आले तरी मामांच्या आनंदांत कणभरीहि कमतरता नाहीं. आपल्या आनंदासाठीं दुसऱ्याकडे जाऊन त्याचा वेळ घेण्याची कल्पनाहि त्यांच्या मनाला शिवत नाहीं. त्यांना आनंद स्वयंसिद्ध आहे. तुम्ही आलांत तरी आनंद, न आलांत तरी आनंद ही वृत्ति जिथें माणसांबद्दल, तिथें त्यांना नवी [illegible] दिलेल्या वस्तूंबद्दल आसक्ति [illegible] असणार! अर्पण करणाऱ्यांचे [illegible] ते आभार मानतील. पण [illegible] दिसतील ती [illegible] वस्तु त्या [illegible] पडलेली आढळेल.

[illegible]

[illegible]

यांची त्यांना आवड आहे. त्यांच्या बाह्यरूपावरून ते विनोदी नसावेत असें वाटण्याचा संभव आहे. पण त्यांच्याजवळ राहणाऱ्यांना ते किती विनोदी आहेत हें ते घरांतील लहान मुलांना ज्या नांवानें हाका मारतात, त्यांच्याशीं ज्या गोष्टी करतात त्यावरून कळणारें आहे. बैठकींतील मनमोकळें हास्यच मी म्हणतों याची प्रचीति इतरांनाहि आणून देईल. आंतबाहेर कांहीं नसल्यामुळें त्यांना दोन मिनिटांत गाढ झोंप येते ही गोष्ट त्यांच्या जवळच्यांना माहीत आहे. वस्तूंतील सौंदर्य शोधण्याची दृष्टि त्यांना आहे. त्याचें रसग्रहणहि ते करूं शकतील. पण त्याचा हव्यास मात्र नाहीं. त्यापेक्षां अधिक शाश्वत आनंद अमूप उपभोगायला मिळणाऱ्याला, या नश्वर वस्तूंबद्दल तितकेसें आकर्षण नसावें यांत आश्चर्य कसलें! त्यांच्या पोशाखांतील स्वच्छता, त्याकरतां मोकळ्या हातानें करीत असलेला खर्च, लागणाऱ्या आवश्यक गोष्टी जर कुणीं पाहिल्या असतील तर त्याला त्यांच्यांत सौंदर्य दृष्टि आहे अगर नाहीं हें सांगण्याची जरूरीच पडणार नाहीं. शुभ्र शालीन रंगाचे त्यांचे कपडे असतात, त्यांत भडकपणा नसला तरी पुरेसा आकर्षकपणा असतो. एकप्रकारें त्यांच्या जीवनांतील सात्विक रंगच त्यांच्या वस्तूंत उतरलेला असावा असें वाटतें. विमल चारित्र्याइतकाच त्यांचा सहज सुंदर पण साधा पोशाख त्यांच्या जीवनाला लौकिकदृष्ट्या पूर्णता आणतो असेंच म्हणावें लागेल.

त्यांनीं ज्यांना आपले जीवनग्रंथ मानलें आहे असे गाथा आणि ज्ञानेश्वरी हे दोन ग्रंथ आहेत. जेथें जेथें ज्ञान आणि ज्ञानी पुरुषाचें वर्णन आलेलें आहे किंवा दैवी संपत्तीचा विस्तार ज्ञानदेवांनीं आपल्या अमर मराठी ग्रंथांत केला आहे तें वर्णन वाचीत असतां, कित्येक वेळां मामांच्या जीवनाशीं तें ताडून पाहाण्याचा मोह होतो. आणि तें पुष्कळच अंशीं पटल्यामुळें मनाला एकप्रकारचा आनंद होतो, व चिरंतन मूल्यें प्रत्यक्षांत पाहण्याचा योग आल्यानें धन्यताहि वाटते. व त्यांच्या औदार्याचें, त्यांच्या निरंहकाराचें, त्यांच्या लीनतेचें, त्यांच्या जीवनांतील उदाहरणें देऊन वर्णन करणें हें अप्रस्तुत वाटतें. शरिराच्या अवयवाइतकेच हे गुण त्यांच्या आत्म्याला चिकटलेले आहेत, हेंच त्यांच्या गुणांचें योग्य वर्णन ठरेल. त्यांच्यांत इतक्या गोष्टी प्रकर्षानें वास करीत आहेत कीं त्यापैकीं एखादीहि त्यांना मोठेपणा मिळवून द्यायला पुरेशी आहे. मग विशुद्ध चारित्र्य, नैष्ठिक ब्रह्मचर्य, प्रखर बुद्धिमत्ता, परमेश्वरावर अपूर्व श्रद्धा, तत्त्वज्ञानाचा जबर व्यासंग, उदार अन्तःकरण, निर्गर्वी व त्यागी स्वभाव आणि सरतें पण शेवटचें नव्हे, त्यांच्या चेहऱ्यावरील अखंड आढळणारी आनंदी व आशावादी प्रसन्नता, इतक्या गोष्टी त्यांच्याजवळ असल्यावर त्यांच्या जीवनाचें दर्शन घडविणें किती कठिण काम आहे हें सहज कळण्यासारखें आहे. अशा या थोर आत्मानुभवी पुरुषाची यथार्थ ओळख होणें दुरापास्त असल्यानें त्यांना सादर प्रणाम हाच पूर्णविराम.

“हुतात्मा वसन्त दाते स्मारक–निधि” चे अध्यक्ष

प्रा. शं. वा. दांडेकर

लेखक— श्री. बाळकृष्ण नारायण दाते

प्रा. शं. वा. दांडेकर यांनीं ‘ हुतात्मा वसंत दाते स्मारक-निधीचें ’ अध्यक्ष या नात्यानें जें अमोल कार्य आजपर्यंत केलेलें आहे त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून त्यांचे हार्दिक आभार मानणें हें आमचें कर्तव्यच आहे. १९४२ चे स्वातंत्र्यसंग्रामांत भारताच्या ज्या ज्या सुपुत्रांनीं आपल्या प्राणांची आहुति दिली अशांपैकीं आमचा मुलगा वसन्त दाते हा स. प. कॉलेजमध्यें सीनियर बी. ए. च्या वर्गांत विद्यार्थी होता. तरुण पिढीपुढें स्वदेशप्रेमाचा व जाज्वल्य अभिमानाचा नमुनेदार आदर्श वारंवार डोळ्यांपुढें ठेवावयाचा एक मार्ग म्हणजे अशा सुपुत्रांचें कायम स्मारक करणें हा आहे; अर्थात्‌च स्मारकनिधि उभारण्याची कल्पना उगम पावली व प्रा. सोनोपंत दांडेकर यांची या कल्पनेला सहानुभूतिपूर्वक मदतीची साथ मिळाली. निधीचें अध्यक्षपद स्वीकारण्यास त्यांनीं मान्यता दिली. प्रा. दांडेकरांनीं स्वतःचा अमूल्य वेळ खर्च करून त्यांचे मित्रांच्या, नातलगांच्या व शिष्यवृंदांच्या गांठीभेटी घेतल्या, व स्मारकनिधीचें कामास सढळ हातानें मदत करण्याची विनंती केली. त्यांच्या परिश्रमाचें गोड फळ म्हणजे जरूर तेवढा स्मारकनिधि जमला, व त्यावरील व्याजाचे रकमेंतून हुतात्मा वसन्त दातेच्या नांवाची शिष्यवृत्ति व बक्षिसें सुरू करण्यांत आलीं. हा उपक्रम गेलीं तीन वर्षें चालू आहे. विद्यार्थ्यांनीं या उपक्रमांत अवश्य रस घेऊन शिष्यवृत्ति व बक्षिसें पटकाविण्यासाठीं आकांक्षेनें पुढें यावें व हुतात्मा वसन्त दाते यांच्या स्मृतीची ज्योत अखंड तेवत ठेवावी. या हेतूनेंच प्रा. दांडेकर यांनीं स्मारकनिधि उभारला. हा उपक्रम अव्याहतपणें चालू राहण्यास विद्यार्थ्यांचें तसेंच कॉलेजच्या आजी अधिकारीवर्गाचें हार्दिक सहकार्य मिळावें अशी विनंती आहे. निवृत्तीनंतरच्या काळांत प्रा. दांडेकरांना सुखशांति मिळो, तसेंच जनताजनार्दनाची सेवा करण्यास त्यांना उदंड आयुष्य लाभावें, अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करून हें निवेदन संपवितों.

प्रि. दांडेकर

लेखक–प्रो. श्री. द. भावे, व्हाइस–प्रिन्सिपॉल, स. प. कॉलेज

मी स. प. कॉलेजमध्यें जून १९२७ सालीं दाखल झालों. आल्यानंतर प्रथम पाहिल्याबरोबर ज्या कांहीं लोकांबद्दल मला आदर वाटूं लागला त्यांपैकीं श्री. दांडेकर हे आहेत. जसजसा त्यांचेबरोबर संबंध अधिकाधिक येऊं लागला तसा त्यांचेबद्दल वाटणारा आदर, त्यांचे ठायीं असलेल्या गुणांमुळें वाढतच गेला. या गुणांत प्रामुख्यानें त्यांची विद्वत्ता, त्यांचे सर्वांबरोबर–मग तो सीनीयर लाइफ मेंबर असो वा नवीन नेमलेला डेमॉन्स्ट्रेटर असो–खेळीमेळीनें वागण्याची पद्धति, त्यांचें सौजन्य व Character या गुणांचा मी उल्लेख करतों.

खरोखर मला त्यांनीं धाकट्या भावाप्रमाणें वागविलें. माझ्या आयुष्यांतला एक प्रसंग आठवतो. जेव्हां माझेविरुद्ध काहूर उठून मला insubordination या गुन्ह्याखालीं संस्थेंतून हाकलून देणार कीं काय अशी भीति उत्पन्न झाली, तेव्हां स्वतः राजीनामा देऊन जाण्याचा विचार ठरविला होता. परंतु या विचारापासून मला परावृत्त करून माझीच बाजू खरी आहे अशी खात्री पटल्यामुळें, प्रकरण शेवटपर्यंत तडीस नेण्यासाठीं ज्या कांहीं सहकाऱ्यांचा मला पाठिंबा होता त्यांत प्रा. दांडेकर हे एक होते. एवढेंच नव्हे तर यदा कदाचित् बाजू खरी असूनहि माझेवर संस्था सोडून जाण्याचा प्रसंग आला असता तर माझेबरोबर बाहेर पडण्यास तयार असलेल्या दोघांमध्यें प्रा. दांडेकर हे एक होते.

प्रा. दांडेकरांची इच्छा कीं शि. प्र. मंडळीचे सेवेंतून शक्य तितक्या लौकर म्हणजे २० वर्षें पूर्ण होतांच निवृत्त होऊन, त्यांचें खरें कार्य व ध्येय म्हणजे हरिभक्तीचा जनतेंत प्रसार करून लोकांस सन्मार्गास लावावे; व त्या दृष्टीनें त्यांनीं प्रा. करमरकर हे स. प. कॉलेजचे प्रिन्सिपॉल झाल्यानंतर एक वर्षानें पत्र लिहून सेवानिवृत्त होण्याची इच्छा प्रदर्शित केली. परंतु त्यांचेसारखा सहकारी जावा अशी कोणाचीच इच्छा नसल्यानें त्यांस येथेंच आणखी कांहीं वर्षें राहण्याचा आग्रह केला व त्याप्रमाणें ते राहिलेहि. यानंतर अशाच तऱ्हेचे १–२ प्रसंग मला आठवतात. परंतु दर वेळेस त्यांनीं इतरांचें मन मोडून आपला हट्ट तडीस नेला नाहीं. एवढेंच नव्हे तर संस्थेस जेव्हां जेव्हां जरूर पडली तेव्हां तेव्हां त्यांनीं झटून मेहनत घेऊन संस्थेचें कल्याणच केलें. उदाहरणच द्यावयाचें तर त्यांची स. प. कॉलेजमधून रुईया कॉलेजमध्यें

झालेली बदली. त्यांस विनंती करतांच ते अडचणी सोसूनहि मुंबईस जाण्यास लगेच तयार झाले, व तेथें जाऊन तेथील बिघडलेल्या परिस्थितींत पुष्कळच इष्ट असा फेरबदल घडवून आणला. त्यांचें स. प. कॉलेजमध्यें असतां जसें प्रा. करमरकरांस संपूर्ण साहाय्य झालें, तसेंच मुंबईस गेल्यावर कै. प्राचार्य भागवतांसहि झालें.


सहा वर्षांपूर्वी प्रा. करमरकर सेवानिवृत्त झाल्यानें स. प. कॉलेजचे प्राचार्य म्हणून प्रा. दांडेकर परत पुण्यास आले व प्राचार्य म्हणून त्यांनीं काय कामगिरी केली हें सर्वांस माहीत आहेच. ते स. प. कॉलेजचे प्राचार्य असतांना पुणें विश्वविद्यालय स्थापन झालें व त्या बाबतींतहि त्यांनीं केलेली कामगिरी प्रसिद्धच आहे. विशेषतः युनिव्हर्सिटी चांगली व्हावी व तशी होण्यासाठीं ती नुसती Affiliating (परीक्षा घेणारी) नसावी, तर teaching (शिक्षण देणारी) असावी अशासाठीं त्यांनीं केलेले प्रयत्न, व त्या मताचे इतर लोकांशीं केलेलें सहकार्य या गोष्टी प्रामुख्यानें सांगतां येतील.

प्रा. दांडेकर सेवानिवृत्त होत आहेत. यामुळें आपणांस दुःख होणें स्वाभाविक आहे. परंतु माणसानें केव्हांतरी सेवानिवृत्त व्हावयास हवेंच. आपल्यापोट्याप्रमाणें एकाच माणसाकडून सारखी सेवेची अपेक्षा करीत राहणें हें अन्यायानें होईल. शिवाय त्यांचे बाबतींत तर ही खरी सेवानिवृत्ति नव्हेच, तर त्यांनीं त्यांचें खरें उद्दिष्ट साध्य करण्यासाठीं, म्हणजेच जनतेची सेवा करण्यासाठीं या सेवेतून आपण त्यांना मुक्त करण्यासारखें आहे. तेव्हां त्यांचेकडून पुढें घडणाऱ्या महान् कार्याकडे बघून आपणांस समाधान मानून घेतलें पाहिजे. तरी ईश्वराजवळ प्रार्थना ही कीं त्यांस त्यांचे पुढील कार्यासाठीं भरपूर आयुष्य व आरोग्य मिळावें. शेवटीं प्रा. दांडेकर यांचें वर्णन करावयास मला सांगितलें तर तें मी असें करीन— निर्भीड पण मितस्त, [illegible] पण प्रेमळ, विद्वान् पण [illegible] [illegible] न [illegible], व [illegible] [illegible] व [illegible] [illegible] असा [illegible] पुरुष — व म्हणूनच कॉलेजचे बाहेर ते प्राचार्य दांडेकर म्हणून प्रसिद्ध नसून 'आपले सोनूमामा' म्हणून अधिक माहीत आहेत.



हरिभक्तपरायण प्राचार्य

लेखक — प्रो. [illegible]



[illegible]

म्हणतील 'होय मी सुशिक्षित आहें म्हणूनच मी अधिक श्रद्धावान् व भक्तिमार्गी आहें.' महाराष्ट्रीय समाजांत हें स्थित्यंतर बऱ्याच अंशीं घडून येण्यास कारणीभूत झालेल्या ज्या कांहीं व्यक्तींचीं नांवें लक्षांत येतात त्यांत कै. अण्णासाहेब पटवर्धन व वै. केशवराव देशमुख यांचेप्रमाणें प्रा. दांडेकरांचें नांव प्रमुख आहे.

प्रा. दांडेकरांचे हातून एक महत्त्वाचें कार्य घडून आलेलें आहे. इंग्रजी शिक्षणानें तयार झालेला सुशिक्षित वर्ग राहणीनें व बोलीनें अशिक्षितांपासून एवढा वेगळा होऊन पडला कीं, त्या वर्गास बहुजनसमाजाचें नेतृत्व करतां आलें नाहीं. प्राचार्य दांडेकर हे कीर्तनांत किंवा प्रवचनांत बहुजनसमाजाची भाषा बोलत नाहींत हें खरें; पण ते आपल्या भाषेतून त्या समाजाच्या भावना निःसंशय व्यक्त करीत असल्यानें लोक त्यांच्या शिकवणुकीशीं झटकन समरस होतात. सुशिक्षित मध्यमवर्ग व बहुजनसमाज यांच्यांतील अंतर आज झपाट्यानें कमी होत आहे याचीं दुसरीं अनेक कारणें असतील, पण हें कार्य संपूर्ण यशस्वी होण्यास सन्तांनीं चोखाळलेल्या मार्गानें जाणें अत्यावश्य आहे. प्राचार्य दांडेकरांच्या हातून हें कार्य होत आहे. वारकऱ्यांच्या फडांतून प्राध्यापकांच्या सभेंत प्रा. दांडेकर आले, व तेथून घरीं आपल्या निवडक प्रेमळ भक्त-मित्रपरिवारासमोर प्रवचन करीत असले तरी सर्वांस प्राचार्य दांडेकर किंवा सोनोपंत किंवा सोनूमामा हे आपलेच आहेत असें वाटतें. प्राचार्य दांडेकरांच्या प्रवचन व कीर्तनपद्धतीवर विस्तारानें लिहितां येण्यासारखें आहे. आळंदीच्या विस्तीर्ण पटांगणांत, ह. भ. प. विष्णुबुवा जोगांच्या समाधीसमोर उभय बाजूंस हजारों वारकरी दाटीवाटीनें बसले आहेत, समोर इंद्रायणीचा प्रवाह वाहात आहे, अशा स्थितींत टाळ मृदुंगाच्या तालबद्ध ठेक्यांत श्री. खिस्तुडांनीं गायिलेले अभंग, व त्यावर चाललेलें ह. भ. प. दांडेकरांचें निरूपण ज्यांनीं सहृदयतेनें प्रत्यक्ष पाहिलें आहे तेच त्याचें सुख अनुभवूं शकतील. पण तें इतरांस जसेंच्या तसें त्यांना देतां येणार नाहीं. साखरेची गोडी शब्दानें कशी वर्णन करतां येणार? ती कळण्यास प्रत्यक्ष साखरच खाल्ली पाहिजे. स्वतः प्राचार्य दांडेकरांना गाण्याचा आवाज नाहीं. पण तेथील अध्यानंदांत त्याची उणीव भासत नाहीं व श्री. खिस्तुडांसारखे त्यांचे छाया-सोबती ती भासूंहि देत नाहींत.

प्राचार्य दांडेकरांच्या कर्तृत्वास आज फारच मोठें क्षेत्र खुलें आहे. स्वतंत्र भारतांत नव्या दमानें समाजाची घडी बसविण्याचा यत्न चालू असतांना, प्राचार्य दांडेकरांच्या कीर्तन-प्रवचनांचा झुळझुळ वाहणारा प्रवाह अनेकांचीं मनें शांत व अंतर्मुख करील असा भरंवसा वाटतो.

परोक्ष विद्यार्थी

लेखकः—प्रा. रा. ना. गद्रे, एम्. ए.

१९३२ सालीं स. प. कॉलेजांत नांव दाखल करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनावर महिनापंधरवड्याच्या अवधींत कांहीं प्राध्यापकांच्या व्यक्तिमत्त्वाचे संस्कार उमटत असत. प्रा. नारळकरांची उंचीपुरी, कांहींसा अस्ताव्यस्त कोशा बांधलेली, छात्रगणांवर स्नेहाचा वर्षाव करणारी, शोधक दृष्टि असलेली मूर्ति; प्रा. करमरकरांची गबाळ्या वेषाची, पण मुखावरील करडेपणा व रुबाबदारपणा यांनीं छाप पाडणारी लष्करी शिस्तीची उग्र मूर्ति; प्रा. पोतदारांची हातांत पिशवी धारण करणारी, वेगानें ताठ पाईंमर्दीनें चालणारी, विचारमग्न पण मधूनच मुखावर स्मित विलसणारी इतिहास-संशोधकाची कार्यमग्न मूर्ति; यांच्याबरोबर प्रा. दांडेकरांची खादीधारी ब्राह्मणी पद्धतीचा रुमाल डोक्याला व्यवस्थित बांधणारी, ब्रह्मवर्चसानें युक्त, हंसतमुख, प्रेमळ आणि या गुरूचा सहवास आपल्याला लाभावा अशी आतुर उत्कंठा वाटावयास लावणारी तेजःपुंज मूर्ति डोळ्यांत भरत असे.

प्रा. दांडेकर भारतीय तत्त्वज्ञान हा विषय असामान्य कौशल्यानें प्रतिपादीत. माझा एक परम स्नेही तत्त्वज्ञानाचा विद्यार्थी; त्यामुळें प्रा. दांडेकरांच्या या विषयावरील व्याख्यानांचा लाभ घ्यावा असें मला वाटलें. प्रा. दांडेकरांच्या अनुज्ञेनें मी त्यांचीं व्याख्यानें श्रवण करण्याची संधि साधली. औपनिषद आणि भगवद्गीता यांतील तत्त्वज्ञानाचें प्रतिपादन ते तद्रूप–तन्मय होऊन करीत; उपनिषदें आणि गीता यांतील अवतरणांनीं ते विषय विशद आणि मार्मिक करीत. शिवाय दुसऱ्या एका अर्थानेंहि प्रा. दांडेकरांचें शिक्षण संस्कृतच्या विद्यार्थ्यांना अनायासें मिळत असे. प्रा. दांडेकरांची [illegible] निर्दोष, [illegible] आणि [illegible] वाणी, सुस्पष्ट, [illegible] [illegible] यामुळें [illegible] संस्कृतच्या [illegible] त्यांचें व्याख्यान [illegible] [illegible] वाटे. [illegible] विद्यार्थ्यांना प्रा. दांडेकरांचें परोक्ष [illegible] लाभत असे. [illegible] मुळें प्रा. दांडेकरांच्या [illegible] आणि [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible]

गुरुवर्य सोनोपंत दांडेकर

गु. सोनोपंत दांडेकर यांचा माझा फार दिवसांचा परिचय आहे. सन १९२५ सालापासून त्यांनीं आमचे येथें ज्ञानेश्वरीवर प्रवचन करण्यास सुरुवात केली. तो प्रसंग असा. कै. बंकटस्वामी हे गु. दांडेकर यांचे गुरुबंधु. कै. विष्णुबोवा जोग यांचे हे शिष्य. जोग महाराजांचे वाड्यांत राहाण्याचा सुयोग कै. डोंगरेमास्तर यांच्या कृपेनें मला लाभला. जोग महाराज १९२० सालीं वैकुंठवासी झाल्यानंतर, त्यांचे शिष्यमंडळींनीं कै. माधवराव देशमूख यांचे समवेत ज्ञानेश्वरीचा अर्थ लिहिण्याचें काम हातीं घेतलें. हें काम चारपांच वर्षें चालू होतें. कै. बंकटस्वामी ह्यांनीं, त्यांचे या पुण्याचे मुक्कामांत माझ्या विनंतीवरून माझ्याकरतां म्हणून ज्ञानेश्वरी सांगण्यास वाड्यांत सुरुवात केली. तिला लवकरच सार्वजनिक स्वरूप प्राप्त झालें. पुढें १९२५ सालीं ज्ञानेश्वरीचें काम पुरें झालें. परंतु कै. बंकटस्वामी यांनीं ज्ञानेश्वरी सांगण्याचें सुरू केलेलें कार्य संपलें नव्हतें. चवदा अध्याय पूर्ण झाले होते व चार अध्याय व्हावयाचे राहिले. आतां पुण्यांत मुक्काम करून राहण्याचें कै. बंकटस्वामीस कांहीं कारण नव्हतें. तेव्हां मीं त्यांस विचारलें "स्वामी अजून चार अध्याय तर ऐकावयाचे राहिले आहेत". तेव्हां त्यांनीं मला सांगितलें कीं, मी सोनूला (ते गु. दांडेकर यांस सोनू म्हणत असत) सांगतों. त्याप्रमाणें त्यांनीं त्यांस रोज संध्याकाळीं एक तास ज्ञानेश्वरी सांगण्यास सांगितलें. आपणांस या निमित्तानें गुरुसेवा करतां येत आहे या भावनेनें त्यांनीं तें पत्करलें व दि. ६-८-२५ पासून पंधरावा अध्याय सांगण्यास सुरुवात केली. सार्वजनिकरीत्या ज्ञानेश्वरीवर प्रवचनें त्यांनीं या वेळेपर्यंत फारशीं केलेलीं नव्हतीं. हीच त्यांची सुरुवात म्हणण्यास हरकत नाहीं.

शं. मो. बापट
(शि. प्र. मंडळी कचेरी)

* * *

'माझ्यावर तुमचा विश्वास आहे कीं नाहीं?' असे उद्‌गार त्या गृहस्थांच्या तोंडून निघतांच सगळा गोंगाट एकदम थांबला. गौर वर्ण, चेहऱ्यावर सात्त्विक तेज, डोक्यावर पांढरा रुमाल, गळ्याभोंवतीं उपरणें, तो रंगीत खादीचा लांब कोट, जुन्या पद्धतीनें परिधान केलेलें धोतर व पायांत चपला असे ते गृहस्थ होते. गोंगाट थांबतांच

ते पुढें म्हणाले, "आणि जर तुमचा माझ्यावर विश्वास असेल तर माझें ऐका. उद्यां सकाळीं दोन्ही पक्षांचें म्हणणें मी ऐकून घेईन. निर्णयाचें काम तुम्हीं माझ्यावर सोपवा. पण आतां तावडतोब चर्चा थांबवा." आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं जमलेल्या महाविद्यालयीन तरुणांनीं ती आज्ञा तंतोतंत पाळली. विद्यार्थ्यांनीं प्राचार्य सोनोपंतांवरील आपला विश्वास दाखविला, याचें कारण सोनोपंत प्राचार्य होते म्हणून नव्हे, तर त्यांचेविषयीं विद्यार्थ्यांना अतिशय आदर होता हें होय.

प्र. नी. नवरे, एम. एससी.

* * *

गुरुवर्य दांडेकर यांचें अध्यापनकौशल्य हें कीं आपण कांहीं तरी एक दुर्बोध, गंभीर विषय शिकवत आहोंत, असें त्यांनीं आम्हांस कधींहि भासूं दिलें नाहीं; उलटपक्षीं विषय कसाहि असो, तो अगदीं लीलेनें, सहजसुलभ, विनोदप्रचुर अशा पद्धतीनें हाताळण्याची त्यांच्याजवळ जी कांहीं एक वैशिष्ट्यपूर्ण कला आहे, त्या कलेच्या जादूमुळें भारावून जाऊन आम्हांस तो वेळ कसा चटकन गेला हेंहि कळत नसे; अशा तऱ्हेची एकाग्रता त्यांच्या त्या पद्धतीनें आपोआप निर्माण होत असे; पण त्यांचीं व्याख्यानें (lectures) ऐकण्याची आमच्यामध्यें जी एक प्रचंड उत्सुकता-तीव्रता-होती व अजूनहि आहे, तिचें-बीज केवळ त्यांच्या या कौशल्यपूर्ण शिकवण्याच्या पद्धतीतच सांठवलें आहे काय? या दृष्टीनें विचार करूं लागलें कीं नीतिशास्त्राच्या सत्त्वप्रमाणेंच —" We do not pass a judgment upon an action done, but upon a *person doing*" हा विचार मनांत डोकावून त्यांचें तेजस्वी व्यक्तिमत्व साक्षात् डोळ्यासमोर उभें राहतें......

श्री. पां. आकूत, बी. ए. (ऑनर्स)

गुरुवर्यांना जरी आतां तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून सर्वत्र [illegible] मानतात, तरी मुळीं त्यांनीं [illegible] कधींच होऊं नये [illegible] आणि गंभीर- [illegible] आम्हां विद्यार्थ्यांच्या पुढील [illegible] त्यांनीं [illegible] आहे. तत्त्वज्ञान आणि अध्यात्मज्ञान या [illegible] [illegible] [illegible] प्रतीति [illegible] एक महान् [illegible] आहे, [illegible] [illegible] त्यांनीं तत्त्वज्ञानाच्या [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible]

म्हणजे अध्यात्मवादांतील तात्त्विक भूमिका आणि दैनंदिन जीवनांतील प्रत्यक्ष आचरण यांचा यथायोग्य समन्वय करणें. या त्यांच्या शिकवणुकीमुळेंच ते तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकापेक्षांहि "जीवनाचे उद्गाते" म्हणून श्रेष्ठ वाटतात.

श्री. र. कावळे, सी. बी. ए.

*　　*　　*

प्राचार्य गुरुवर्य दांडेकर संतांची परंपरा पुढें चालू ठेवणारे एक विठ्ठलभक्त वारकरी आहेत, तरी पण त्यांचें खरें वैशिष्ट्य कांहीं असेल तर तें हेंच कीं, ते एक अभिजात प्रेमळ आणि अंतर्बाह्य विशुद्ध असे शिक्षक आहेत—'गुरुजी' आहेत. त्यांचें सारें जीवनदर्शन घडतें तें ते शिकवितात तेव्हां. गुरुवर्य दांडेकर यांना वर्गांत टेबलाजवळ बसून 'तत्त्वज्ञान' विषय शिकवितांना ज्यांनीं पाहिलें नसेल त्यांना त्यांचें जीवनरहस्य संपूर्णपणें उमगलेंच नाहीं, असें खुशाल म्हणावें ! प्रत्येक तासाला गुरुवर्यांच्या व्याख्यानांत एक प्रकारचें नाविन्य आढळतें, आणि मुख्य म्हणजे तत्त्वज्ञानाचा आणि जीविताचा अगदीं अविभाज्य संबंध आहे याचा प्रत्यही प्रत्यय येतो. अध्यात्मशास्त्राची आवश्यकताच नाहीं, असें म्हणणाऱ्या आक्षेपकांना उत्तर देतांना त्यांनीं स्पष्ट आणि विश्वासपूर्वक सांगितलें कीं, प्रत्येक मानवाला शाश्वत तत्त्वाचा विचार करण्याची पाळी येतेच, आणि आज या क्षणीं या शास्त्राची आवश्यकता न पटणाऱ्या बापड्यांनाहि, कांहीं काळानें तें शास्त्र 'शास्त्र' म्हणून आकलन झालें नाहीं, तरी निरर्थक खास वाटणार नाहीं. भगवद्गीतेसंबंधींहि ते नेहमीं जीवनोपयोगी अशी कल्पना सांगतात. गीतेंतील जीवनयोगाचा विचार करीत असतांना सामान्य मनुष्यासाठीं गीता काय सांगते यावर ते भर देतात. सारांश, गुरुवर्य प्रत्येक गोष्ट शिकवितांना तिचा प्रत्यक्ष जीवनाशीं किती व कसा संबंध आहे तें पटवून देतात. ते स्वतःला विसरून शिकवितात. त्यांच्या भाषणांतील प्रत्येक शब्द आत्मानुभवाच्या प्रकाशानें उजळून निघाल्यासारखा भासतो.

लीला द. गोळे, सी. बी. ए.

*　　*　　*

कोणत्याही अवघड परिस्थितींत मनःस्वास्थ्य टिकवणें हें सोनूमामांना चांगलें साधलें आहे. त्याकरितां त्यांना कांहीं नियम पाळावे लागतात. मनःस्वास्थ्य टिकवण्याचें त्यांचें रामबाण 'ध्यान' होय. सोनूमामांच्या जीवनांत सुद्धां पुष्कळ वेळां चमत्कारिक परिस्थिति उत्पन्न झाली, पण त्याला ते कधींच डगमगले नाहींत. ध्यानानें त्यांनीं आपलें मनःस्वास्थ्य कायम टिकवलें. सूक्ष्मदृष्टीनें पाहणाराला त्यांच्या वृत्तींत त्यांच्या कीर्तनानंतर, प्रवचनानंतर किंवा ध्यानानंतर जरूर फरक दिसेल. त्यांच्या मनाची उंची त्या वेळेला नेहमींपेक्षां वाढलेली दिसते. व ते उच्च व पवित्र वातावरणांत डुंबत असतात. त्यांचें हृदय त्यावेळीं दया, क्षमा व शांति

यांनीं भरलेलें असतें. त्यांच्या जीवनाचें सूक्ष्म दृष्टीनें अवलोकन करून, त्याप्रमाणें वागणाराला दुःखी होण्याची वेळ त्यांच्या आयुष्यांत कधींहि येणार नाहीं अशी माझी खात्री आहे.

रा. गो. जोशी, (स. प. कॉलेज ग्रंथालय)

* * *

प्राचार्य दांडेकर यांनीं आपल्या विद्यार्थ्यांना ज्ञान दिलें, ज्ञानदृष्टिहि दिली. तसेंच आर्थिक साहाय्यसुद्धां दिलें. कोणीहि विद्यार्थी त्यांच्याकडे जावो, पहिल्यानें कांहीं काळ तो गोंधळेल, पण जेव्हां तो आपली अडचण सांगूं लागेल, तेव्हां प्रा. दांडेकर त्याचें म्हणणें शांतपणें ऐकून घेतील व त्यांच्याकडून त्याचें तें काम होणें शक्य असल्यास ते त्यास तसें सांगतील; नाहीतर स्पष्ट त्यांच्याकडून तें काम होणार नाहीं असें सांगतील. नादारी, अर्ध-नादारीचा निकाल लागल्यानंतरहि व्यक्तिगत भेटून, आपली परिस्थिति पटवून देऊन प्राचार्य दांडेकरांकडून दोन दोन महिन्यानंतर नादारी घेतलेले विद्यार्थी कितीतरी सांपडतील. ज्यावेळीं त्यांना कॉलेजामार्फत मदत करणें अशक्य होईल, त्यावेळीं प्रा. दांडेकर स्वतःच्या खिशांतूनहि पैसे देण्यास पुढें मागें पाहणार नाहींत--

बा. रा. कुलकर्णी, बी. ए. (ऑनर्स) (कॉलेज कचेरी)

प्राचार्य दांडेकरांचा स्वभाव विनोदी आहे. त्यांचा विनोद हा सहजसुलभ व लवकर आकलन होणारा असतो. एकदां काय झालें! मला वाटतें तो ऑगस्ट महिना असावा; परंतु त्यांच्या खोलीतील कॅलेंडर अजून पहिल्या [illegible]प्रमाणें, [illegible] विशेष [illegible] न होतां, [illegible] प्रमाणें [illegible] प्रकार [illegible]. आणि हें जेव्हां प्राचार्य दांडेकरांनीं पाहिलें तेव्हां ते मला म्हणाले, " अरे अनंत, हे कॅलेंडर पाहा. आपण आपल्या मागें एक महिना राहिलों! असें मागें राहून आपणांस कसें चालेल?"

त्यांचें वर्तन किंवा [illegible] म्हणजे एक [illegible], त्यांच्या [illegible] असतें. सामान्य बुद्धीच्या [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible]. [illegible]

[illegible]

[illegible]

राष्ट्रभाषा के नेता—प्रा. दाण्डेकर

लेखक—प्रा. प्र. रा. भुपटकर

कहते हैं कि मनुष्य साठ वर्ष की उम्र का होने पर उसकी बुद्धि सठियाती है। यह सिर्फ़ कहावत ही है ऐसी बात नहीं। व्यवहार में भी क्षण प्रतिक्षण उसको चरितार्थ होते हम देखते हैं और मनोविज्ञान के सिद्धान्त भी इन प्रत्यक्ष प्रमाणों की हिमायत करते हैं। यही नहीं, मनोविज्ञान तो इससे भी आगे बढ़कर यह बतलाता है कि मनुष्य की बुद्धि के सठियाने के लिए साठ वर्ष इन्तज़ार करने की भी जरूरत नहीं है। उसके पहलेही सर्वसाधारण व्यक्ति की बुद्धि सठियाने लगती है। जैसे जैसे दिनपर दिन, महीनोंपर महीने और वर्ष पर वर्ष बीतने लगते हैं मनुष्य के आचारव्यवहार की पगडण्डियोंपर लीकें पड़ने लगती हैं और उन्हीं लीकोंको पीटते रहने में वह अपने जीवनकी सार्थकता तथा सफलता मानता है। लकीर का फकीर बनना न कोई चाहता है, न उसपर किसी को अभिमान हो सकता है लेकिन बिना लकीर का लकीर बने किसी से रहा नहीं जाता यह भी कठोर सत्य है। जीती मक्खी को कौन निगले? उसी प्रकार इस अप्रिय किंतु कठोर सत्यको निगलनेकी मानसिक सिद्धता जनसमाजमें नहीं होती और उपर्युक्त कठोर सत्यको स्वादु बनानेके लिए अपरिवर्तनशीलताको आदर्श गुण मानकर गिरगिट की तरह रंग बदलने या तोते की तरह आखें बदलने को हेय मानता है। मेरी अल्पमतिमें परिवर्तनशीलता जीवनका पर्यायवाची है बशर्ते कि परिवर्तनशीलता चंचलता का रूप धारण न करे।

मानने को तो हर कोई मानता है कि परिवर्तनशीलता ही मानवी जीवनकी चेतना है लेकिन इस चेतना के दर्शन गिने चुने व्यक्तियोंहीमें होते हैं। ऐसे ही व्यक्ति जो बढ़ती और ढलती उम्रमें भी किन्हीं खास विचारों, आदर्शों और सिद्धान्तोंसे आबद्ध नहीं रहते, उन्हीं में महानता के दर्शन होते हैं। मेरा यह सौभाग्य रहा कि मैंने इसी महानता के दर्शन हमारे प्रा. दाण्डेकरजी में किये और उनकी इस महानताके सामने नतमस्तक हूँ।

प्रा. दाण्डेकरजी से प्रथम परिचय हुआ तत्त्वज्ञानके वर्गमें। पहले तो दर्शन विषय एक पहाड सा तिसपर प्रा. दाण्डेकरजी की लुभावनी मनभावनी मूर्ति के होते हुए भी मुखांकित गंभीरताकी धाक। दो एक हफ्ते गांभीर्य का ही वायुमण्डल रहा। लेकिन ज्यों ज्यों हम प्रा. दाण्डेकरजी के निकट संपर्कमें आते गए, उनके महानु-

भवित्त्व, उनकी स्वभावगत मिलनसारी का परिचय प्राप्त होता गया। हमने उस बात का प्रत्यय पाया कि हम सत्संगमें हैं और विद्यार्थीजीवन को आकार देनेवाले शिल्पी के चरणों में बैठकर अध्ययन करनेका सौभाग्य हम लोगोंको प्राप्त हुआ है। वास्तवमें श्री. दाण्डेकरजी के जीवन, विचारव्यवहार तथा विद्यार्थियोंके जीवनविचार और व्यवहार में जमीनआसमाँ का अन्तर रहता है फिर भी वे विद्यार्थियोंके इतने अनुकूल बन जाते हैं कि किसी प्रकार दुराव या खिंचाव नाम तकको नहीं रहता। उनकी उपस्थिति विद्यार्थियोंकी उमंगोंपर पाला नहीं गिराती। उनका अस्तित्व विद्यार्थियोंके लिए किसी भी प्रकार Wet blanket नहीं बनता। इस रहस्य की कुंजी है उनकी नवीनताको सामह स्वीकार करनेकी मानसिक सिद्धता।

नवीनतासे मुँह न मोडने बल्कि जोर शोर के साथ नवीनता का पुरस्कार करने का ही प्रत्यय है कि जब १९४५ में आप सर परशुरामभाऊ कॉलेज के प्रिन्सिपल बने तब आपने कॉलेजके अध्ययन के विषयोंमें हिंदी को स्थान दिया। प्रश्न हो सकता है कि इसमें क्या सुरखाबका पर लगा है। उत्तर है कि अभीतक पूनेमें और किसी कॉलेजने यह प्रबंध नहीं किया है। हिंदी भारत की राष्ट्रभाषा बन गई है; हिंदी का हम लोगोंके जीवनमें भविष्यमें बडाही महत्त्वपूर्ण स्थान होनेवाला है। फिरभी अन्य संस्थाएं हमारे दुर्भाग्यसे उदासीन ही हैं। ऐसी अवस्थामें श्री. प्रा. दाण्डेकरजीने अपने कॉलेज में हिंदी की पढ़ाई प्रारंभ की, बी. ए. तकका प्रबंध किया यह कोई साधारण बात नहीं। जहाँ इंटरतक पढ़ाई का प्रबंध करनेका उत्तरदायित्व भी कॉलेजपर नहीं रहता वहां भी विद्यार्थियोंको अपनी जिम्मेवारीपर हिंदी लेनेकी छूट नहीं दी जाती यह हालत और स्थानों में है। इन बातोंपर गौर करने से श्री. प्रा. दाण्डेकरजी की कृतिका महत्त्व हमारे ध्यानमें आता है।

महाराष्ट्र के हिंदी प्रचारक्षेत्रमें एक समय कुछ धांधली उठी थी। अपने राजनैतिक सिद्धान्तों के प्रभाव में आकर हिंदी को अप्रकृत रूप देने की चेष्टा हो रही थी। महाराष्ट्रमें जो हिंदी का प्रचार अपनी जड़ जमाये बैठा था उसकी जड़ें खोखली करने के प्रयत्न कुछलोग के साथ हो रहे थे। उस समय स्वाभाविक, शिष्ट-समाज द्वारा अनुमोदित और भाषाविज्ञानद्वारा समर्थित हिंदी का प्रचार करने के लिये जो समिति बनी उसमें श्री. प्रा. दाण्डेकरजी थे। आपने उस समितिका जो मार्गदर्शन किया उसके लिए हम आप के कृतज्ञ हैं।

महाराष्ट्र के जीवन में और भी एक महत्त्वपूर्ण घटना आयी और वह है पूना विद्यापीठ का निर्माण। नवीन स्थापन होनेवाले विद्यापीठ में राष्ट्रभाषा हिंदी का समावेश अनिवार्य हो था। फिरभी उसके लिए प्रेरणा तथा प्रयत्नों की आवश्यकता थी। प्रा. दाण्डेकरजी ने प्रेरणा दी है, और प्रयत्न भी किये और उनके प्रयत्नोंसे [illegible] सफल हुए।

[illegible]

संपादकीय समारोप

प्राचार्य दांडेकर हे २१ एप्रिल १९५१ रोजीं शिक्षणप्रसारक मंडळींतून निवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्तीचें समयीं विविध क्षेत्रांतील त्यांच्या कार्याचा गौरव करण्याचे हेतूनें 'प्राचार्य दांडेकर सत्कारसमिती' ची स्थापना झाली. त्या समितीनें एक गौरवसमारंभ करण्याचें ठरविलें. व त्याचा एक भाग म्हणून, परशुरामियन या स. प. कॉलेजच्या नियतकालिकाचा खास प्राचार्य दांडेकर अंक कॉलेजच्या अधिकारीवर्गाच्या सहकार्यानें काढण्याचें योजिलें. त्याकरितां परशुरामियनच्या संपादक मंडळास मदत करण्यासाठीं, प्रा. श्री. गो हुल्ल्याळकर, प्रा. रा. वि. ओतुरकर व श्री. ना. वि. पटवर्धन, एम्. ए., यांचें साहाय्यक संपादक मंडळ नेमण्यांत आलें व अंकाच्या जुळवाजुळवीस सुरुवात झाली. सर परशुरामभाऊ कॉलेजच्या गेल्या पस्तीस वर्षांच्या आयुष्यांत निघालेला हा पहिलाच खास अंक होय.

लेख, आठवणी, कविता पाठविण्याविषयींचें संपादकमंडळानें एक खास विनंतिपत्रक काढून तें प्राचार्य दांडेकर यांचे वर्गबंधु, सहकारी, स्नेही व विद्यार्थी यांना पाठविलें व त्यास अनुसरून बरेच लेख आले. ते सर्व या अंकामध्यें समाविष्ट केले आहेत. त्यांमधून श्री. दांडेकर यांचें प्राचार्य, तत्त्वज्ञानी, प्रवचनकार, कीर्तनकार, शिक्षक, वारकरी, लेखक, व्याख्याते इत्यादि किती विविध प्रकारचें दर्शन झालें आहे, तें ठरविण्याचे आम्ही वाचकांवरच सोपवितों. प्राचार्य दांडेकरांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू या लेखांतून दृष्टोत्पत्तीस येतील अशी आमची खात्री आहे.

हें काम करीत असतां प्रा. दांडेकर गौरवांत आपला भाग असावा अशा वृत्तीनें अनेकांचें आपुलकीचें साहाय्य आम्हांस झालें. समारोपामध्यें त्याचें सविस्तर वर्णन करीत न बसतां, ज्या लेखकांनीं लेख लिहून हा अंक सजविण्याची आम्हांस मदत केली त्या सर्व लेखकांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतों. एकच नामनिर्देश करतों. श्री. वि. वा. ऊर्फ बाबासाहेब दांडेकर यांनीं प्राचार्य दांडेकरांचे लहानपणच्या हकीगतीचा लेख दिला व दांडेकर मंडळींचा फोटोहि दिला याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत ऋणी आहों. मुंबईचे गव्हर्नर सर महाराजासिंग, बिहारचे गव्हर्नर नामदार श्री. माधवराव अणे, मुंबई राज्याचे मुख्य मंत्रि ना. श्री. बाळासाहेब खेर, ना. गणपतराव तपासे, पुणें युनिव्हर्सिटीचे व्हाइस चान्सेलर डॉ. बाबासाहेब जयकर व मुख्यतः प्रा. दांडेकर यांचे विश्वविद्यालयीन गुरु श्री. रा. द. रानडे यांनीं आमचे विनंतीवरून प्रा. दांडेकर यांचेसंबंधीं आपला आदरभाव व्यक्त करणारे संदेश पाठवून

आम्हांस उपकृत केलें आहे. तसेंच ना. श्री. मालोजीराव नाईक निंबाळकर, मुंबई सरकारचे मुख्य सेक्रेटरी, श्री. म. द्वा. भट, आय. सी. एस. व श्री. मधुकरराव यार्दी, आय. सी. एस. यांनीं आपली हार्दिक सहानुभूति दर्शविली. या सर्व थोर व्यक्तींचे आम्ही आभारी आहों.

सर्वांच्या सदिच्छा, प्रा. दांडेकरांविषयीं सर्वांचें प्रेम एकवटून, त्यालाच या खास अंकाचे रूपानें मूर्तस्वरूप आलें आहे. आमचें कर्तृत्व त्यांत कांहींच नाहीं. कोणाचें असलेंच तर तें आमचे साहाय्यक संपादक मंडळाचें. या अंकाची जुळवा-जुळव, उभारणी व सजावट चालू असतां प्रा. कुल्याळकर, प्रा. ओतुरकर व श्री. ना. वि. पटवर्धन यांनीं वेळोवेळीं जें साह्य केलें त्याबद्दल त्यांचे खरोखर आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. यासेरीज अंकाची सजावट करण्यांत ज्यांनीं तत्परतेनें साहाय्य केलें, त्यांचे आभार मानतों. श्री. आगाशे (कला प्रेस) यांनीं मुखपृष्ठाचे दोन ब्लॉक, श्री. दीक्षित चित्रकार यांनीं मुखपृष्ठावरील चित्र, सनेरस फोटो स्टुडिओचे श्री. मोघे यांनीं प्राचार्य दांडेकरांचा फुलसाइज फोटो, अशा तऱ्हेचें साहाय्य कोणीहि त्याबद्दलचा मोबदला न घेतां केलें, तें केवळ प्रा. दांडेकरांविषयीं आदरभाव दर्शविण्याकरतांच. इतिहाससंशोधक श्री. वासुदेवराव येंडे यांनीं आळंदी व देहूचे फोटो मुद्दाम काढून दिले याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतों. तसेंच आर्यभूषण प्रेसचे व्यवस्थापक श्री. वि. अ. पटवर्धन यांनीं स्वतः लक्ष घालून अंक वेळेवर व सुंदर छापून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानतों.

प्रस्तुत लेखक परशुरामियनचा संपादक असतांना प्राचार्य दांडेकर गौरव अंक काढण्याचा सुयोग आला याबद्दल आपणास धन्य मानतो. या निमित्तानें प्राचार्य दांडेकर यांच्या जीवितकार्याविषयींच्या लेखांचें संपादन करीत असतां एका थोर व्यक्तीच्या गुणांचें अनायासें चिंतन झालें, व त्यामुळें माझा स्वतःचा मोठाच लाभ झाला. ज्ञानेश्वरांनीं म्हटलें आहे :

संतांतें निर्धारितां । लाभे आपुलीच शुद्धता ।
जैसी दृष्टि दिसे पाहतां । आपुली आपणु ॥

या अंकासाठीं श्री [illegible] व सौ. [illegible] [illegible], प्रा. [illegible], प्रो. कुल्याळकर यांचे [illegible] हें अंकाचें संपादन पूर्ण केलें.

[illegible]



ह. भ. प. प्राचार्य सोनोपंत दांडेकर यांस कीर्तनासाठीं येणारीं वार्षिक आमंत्रणें

तिथि	स्थळ	कीर्तन
चैत्र शुद्ध प्रतिपदा	आळंदी	श्रीज्ञानदेवांच्या समाधिपुढें
,, ,, द्वितीया ते नवमी	पुणें	शेडगे विठोबा मंदिर, रामनवमी उत्सव, निवडुंगा विठोबा, मुंबई इत्यादि बाहेरगांवीं
,, वद्य अमावस्या	,,	उद्यांचें कीर्तन (शेडगे विठोबा)
वैशाख अक्षय्यतृतीया	,,	निवडुंगा विठोबा.
,, वद्य	,,	ओंकारेश्वर मंदिर, उद्यांचें कीर्तन.
ज्येष्ठ वद्य एकादशी	,,	निवडुंगा विठोबा.
ज्येष्ठ वद्य एकादशी	,,	निवडुंगा विठोबा.
आषाढ शुद्ध एकादशी ते पौर्णिमा	पंढरपूर	नामदेव मंदिर, एकादशी, कुकुरमुंडेकर मठ, द्वादशी, साजगीवाले वाडा, त्रयोदशी, नारायण गडकरी यांचा फड, चतुर्दशी, नामदेव मंदिर, पौर्णिमा.
आषाढ वद्य नवमी	पुणें	पालखीपुढें, भवानी पेठ
,, द्वादशी व त्रयोदशी	मुंबई	सांवता व नामदेव पुण्यतिथि
श्रावण ,,	मुंबई	दर शनिवार, रविवार, गुरुवार
,, वद्य प्रतिपदा ते अष्टमी		गोकुळाष्टमीचा उत्सव मुंबई, पुणें व इतरत्र
भाद्रपद		गणपती उत्सवानिमित्त ठिकठिकाणीं ज्ञानेश्वरीवर प्रवचनें
आश्विन, दसरा	पुणें	निवडुंगा विठोबा
,, कोजागिरी पौर्णिमा		शेडगे विठोबा व इतर ठिकाणीं
कार्तिक शुद्ध दशमी ते पौर्णिमा	पंढरपूर	नामदेव मंदिर, एकादशी, धुंडीमहाराज मठ द्वादशी, साजगीवाले वाडा, त्रयोदशी.
,, वद्य दशमी	आळंदी	चाकणरस्त्यावर कऱ्हाडकरांचा फड
एकादशी	,,	
द्वादशी		सकाळीं सखारामबोवा कवाडकरांच्या पालखी-समोर. सायंकाळीं फुटवाले धर्मशाळा
मार्गशीर्ष वद्य दशमी	सासवड	सोपान महाराज मंदिर
पौष वद्य षष्ठी	सांगली	कोटणीस महाराज पुण्यतिथि
माघ शुद्ध दशमी	इगतपुरी	जोगमहाराज मठ
माघ वद्य एकादशी–द्वादशी	पुणें	अण्णासाहेब पटवर्धन पुण्यतिथि, ओंकारेश्वर
वद्य प्रतिपदा	आळंदी	वे. जोगमहाराज समाधिपुढें
नवमी		समर्थपुण्यतिथि दासनवमी
फाल्गुन शुद्ध द्वितीया	पुणें	रामकृष्ण परमहंस नवीपेठ मंदिर अगर शेडगे विठोबा.
,, वद्य ,,	देहु, सुदुंब्रें	तुकाराम महाराज पुण्यतिथि
,, षष्ठी	देहू	नाथ षष्ठी

दर महिन्याचे शुद्ध एकादशीस पुणें निवडुंगा विठोबा, व वद्य एकादशीस आळंदी अगर इतर मुक्कामाचे ठिकाणीं. याशिवाय प्रासंगिक कीर्तनें व नैमित्तिक प्रवचनें सर्व महाराष्ट्रभर चालूच असतात.

प्राचार्य दांडेकर यांचा लेखनसंभार

खालीं दिलेली प्रा. दांडेकर यांचे ग्रंथ व लेखांची सूचि शक्य तितकी पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. 'लेखणीचा जड' असें स्वतः प्रा. दांडेकर आपलें वर्णन करितात. त्यांचे विचार, लेखनापेक्षां कितीतरी पटीनें, गेल्या ३० वर्षांमध्यें त्यांनीं केलेल्या व्याख्यानें, प्रवचनें व कीर्तनें यामध्यें असंख्य श्रोत्यांना समोरासमोर 'वाङ्मय'-रूपानें ऐकावयास मिळाले आहेत. श्रोत्यांनीं ते जतन करून ठेविले असल्यास, ते तरोतर प्रासादिक वाङ्मयाचा आस्वाद देतील यांत शंका नाहीं. प्राचार्य दांडेकर हे यापुढें वाणीप्रमाणेंच लेखणीला तितक्याच जोमानें राबवतील अशी या ग्रंथांतील अनेक लेखकांनीं सदिच्छा प्रकट केली आहे, त्याचा आम्ही पुनरुच्चार करतों.

स्वतंत्र ग्रंथ—(१) ज्ञानदेव : चरित्र, ग्रंथ व तत्त्वज्ञान (लोकशिक्षणमाला–१९३[illegible]) — १२१ पानें

(२) ईश्वरवाद (वाङ्विवेचनमाला)

(३) वारकरी पंथाचा इतिहास (ज्ञानकोश—१९२७) — ६१ पानें

संपादित ग्रंथ:—(१) वै. [illegible]स्वामींची ज्ञानेश्वरी

(२) श्री तुकाराममहाराज यांचा गाथा (चित्रशाळा-१९२५) प्रस्तावना — ३२ पानें

(३) संतवचनामृत, ज्ञानेश्वरवचनामृत, तुकाराम-वचनामृत यांवरील टीपा

लेख:— (१) [illegible] महाराष्ट्र या ग्रंथामधील "[illegible] भागवत" हें प्रकरण — १० पानें

(२) '[illegible] तुकाराममहाराज [illegible]' ([illegible] १९[illegible]) — ७ पानें

(३) '[illegible]' ([illegible]) — १० पानें

(४) '[illegible]' ([illegible]) — १४ पानें

(५) '[illegible]' ([illegible]) — [illegible] पानें

(६) '[illegible]' ([illegible]) — १[illegible] पानें

(७) '[illegible]' ([illegible]) — ६ पानें

(८) '[illegible]' [illegible] — [illegible] पानें

(९) [illegible] — [illegible] — १० पानें

(१०) '[illegible]' — [illegible] — ४ पानें

(११) '[illegible]' — [illegible] — ४ पानें

(१२) [illegible] ([illegible]) — [illegible] पानें

(१३) [illegible] ([illegible] १९[illegible]) — [illegible] पानें

(१४) [illegible] ([illegible])

(१५) "श्रीमुक्ताबाईंचें समाधिस्थळ महत्‌ग्राम (मेहूण) होय, एदलाबाद नव्हे"–(आळंदी संस्थान ट्रस्टीतर्फे प्रसिद्ध केलेलें पत्रक) ८ पानें

(१६) 'प्रसाद' मासिकामधील लेख (१९४७ ते १९५१)
अध्यात्मशास्त्राचीं मूलतत्त्वें–प्रकरणें १६; ज्ञानेश्वरींतील नमनें (५ पानें); तुकारामाच्या अभंगाचा अर्थ लावण्याची एक दिशा (३ पानें); दैवाचें भवितव्य (३ पानें); श्रीमद्भगवद्गीता (८ पानें); भागवत धर्म (५ पानें); श्रीज्ञानदेवांचें जन्मस्थान आळंदी कीं आपेगांव (३ पानें); ज्ञानेश्वरींतील भक्तियोग (४ पानें); श्रीतुकोबांची शिकवणूक (३ पानें); धर्माचें शिक्षणांतील स्थान (४ पानें) संत नामदेव (३ पानें); ज्ञानेश्वरीचा आधुनिक जगास संदेश (१ पान)

(१७) 'हिंदुधर्म में त्याग का स्थान' कल्याण मासिक हिंदु संस्कृति अंक ४ पानें

(१८) 'नाम का साधन'– कल्याण–नामांक

प्रस्तावना, पुरस्कार व परीक्षण–व्हललिखित १९५० (ले. तांचे ३ पानें), श्री कैलासगाथा ले. श्रीएकनाथसुत १९४७ (३ पानें); संतश्रेष्ठ श्रीतुकाराममहाराज यांचें श्लोकबद्ध चरित्र–ले. कै. मा. गो. भिडे १९२९ (४ पानें), नामदेवरायांची सार्थ गाथा, सुबंध १९४९ (१ पान); सेनापति बापट वाङ्मय समग्र ग्रंथ–देव. १९३९ (७ पानें) श्री. कोटणीसमहाराज यांचें चरित्र–ले. साधुदास १९३७ (११ पानें) कांचनमृग–ले. प्रो. वि. स. गोगटे (१ पान); तुकारामाच्या अभंगाची चर्चा–परीक्षण (७ पानें–रत्नाकर–मार्च १९२८); 'ज्ञानदीप'–परीक्षण–लोकशिक्षण (५ पानें) प्रो. दे. द. वाडेकर यांच्या Ethics of Bhagavadgeeta याला प्रस्तावना.

न्यू पूना कॉलेज नियतकालिकामध्यें लिहिलेले इंग्रजी लेख

(1) The Katha Upanishad Feb. 1920 — 13 Pages
(2) Dnyanadev and his philosophy Jan. 1923 — 12 Pages
(3) Dnyaneshwari–a study. Oct. 1924 — 6 Pages
(4) नीतिशास्त्रविचार परीक्षण Oct. 1922 — 3 Pages
(5) On Yoga Feb. 1936 — 7 Pages

तत्त्वज्ञान परिषदांमधून वाचलेले निबंध

(1) Philosophy and Sadhana
(2) Dnyanadeva and Western philosophy
(3) Is Gaudapad a Buddhist ?

पुणें तत्त्वज्ञान मंडळापुढें वाचलेला निबंध

The Doctrine of Appearances in Bradley and Saṅkara.